



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, मंगळवार २६ मे २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


● सर्वसामान्यांचा खिसा रिकामा ● 10 दिवसांत चौथ्यांदा इंधन दरात मोठी वाढ

# पेट्रोल 112.61 तर डिझेल 99.28 रुपये

**मुंबई/प्रतिनिधी:** आंतरराष्ट्रीय बाजारातील घडामोडी आणि पश्चिम आशियातील तणावाचा थेट फटका आता भारतातील सर्वसामान्य नागरिकांच्या खिशाला बसू लागला आहे. तेल कंपन्यांनी इंधन दरांमध्ये पुन्हा एकदा मोठी वाढ केली असून गेल्या १० दिवसांतील ही चौथी दरवाढ ठरली आहे. या ताज्या दरवाढीमुळे देशभरात पेट्रोलने अखेर शंभरी पार केली असून डिझेलच्या किमतीतही २ रुपये ७१ पैशांची मोठी वाढ झाली आहे. लागोपाठ होत असलेल्या या दरवाढीमुळे बाजारपेठेत महागाईचा भडका उडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. सोमवारला इंधनाचा दर हा पेट्रोल ११२.६१ तर डिझेल ९९.२९ इतका होता.



पश्चिम आशियातील संघर्ष आणि खनिज तेलाच्या पुरवठ्यातील अनिश्चिततेमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर कच्च्या तेलाच्या किमती सातत्याने वाढत आहेत. याचाच परिणाम म्हणून भारतीय तेल कंपन्यांनी गेल्या १० दिवसांत तब्बल चार वेळा किमती वाढवून ग्राहकांना मोठा दणका दिला आहे. आज झालेल्या ताज्या दरवाढीमुळे आधीच वाढत्या उन्हाने होरपळणा-या जनतेचे आर्थिक बजेट पूर्णपणे कोलमडले आहे. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, लातूर, नांदेड आणि परभणी यांसारख्या प्रमुख शहरांमध्ये पेट्रोल आधीच शंभरीच्या पार होते, परंतु या नव्या वाढीमुळे आता डिझेलच्या किमतीही ९७ ते ९९ रुपयांच्या घरात पोहोचल्या आहेत.डिझेलच्या दरात एकाच वेळी झालेली २.७१ रुपयांची वाढ मालवाहतूक क्षेत्रासाठी अत्यंत चिंताजनक मानली जात आहे. डिझेल महागल्यामुळे ट्रक आणि इतर मालवाहू वाहनांचा वाहतूक खर्च थेट वाढणार असून, त्याचा थेट परिणाम भाजीपाला, दूध, अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमतींवर होणार आहे. आधीच बाजारात महागाई वाढलेली असताना, इंधनाच्या या नव्या भडक्यामुळे सर्वसामान्य नागरिक आणि शेतक-यांसमोरील अडचणी अधिकच वाढल्या आहेत. सरकारने या वाढत्या किमतींवर तातडीने नियंत्रण मिळवून जनतेला दिलासा द्यावा, अशी मागणी आता सर्वच स्तरांतून जोर धरू लागली आहे.देशात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती मार्च २०२४ पासून स्थिर होत्या. लोकसभा निवडणूक २०२४ च्या अगदी आधी सरकारने किमतीत २ प्रति लिटरने कपात करून जनतेला दिलासा दिला होता. तथापि, तांत्रिकदृष्ट्या भारतात इंधनाच्या किमती नियंत्रित आहेत आणि कंपन्या आंतरराष्ट्रीय कच्च्या तेलाच्या १५ दिवसांच्या सरासरी किमतीच्या आधारावर दररोज दर बदलू शकतात, परंतु राजकीय संवेदनशीलतेमुळे त्या दीर्घकाळ बदलल्या नाहीत.


### इंधनाचा वापर कमी करा



*पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी तेलंगणामध्ये एका कार्यक्रमादरम्यान पश्चिम आशियातील भू-राजकीय परिस्थिती लक्षात घेउन पेट्रोलियम उत्पादनांचा काळजीपूर्वक वापर करण्याचा सल्ला दिला होता. पंतप्रधानांनी म्हटले होते की, आज काळाची गरज आहे की पेट्रोल, गॅस आणि डिझेलचा वापर खूप संयमाने केला जावा. आपण आयात केलेल्या पेट्रो उत्पादनांचा वापर गरजेनुसारच करायला हवा.*

## कौटुंबिक वादातून 4 मुलांना विहिरीत फेकून पित्याने संपवले आयुष्य; 5 ठार

**बुलडाणा/प्रतिनिधी :** तालुक्यातील राजुरा शिवारात एका पित्याने आपल्या चार मुला-मुलींना विहिरीत फेकून स्वतःही उडी घेत आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना २५ मे रोजी उघडकीस आली आहे. या घटनेत पित्यांसह दोन मुले आणि दोन मुली अशा पाच जणांचा मृत्यू झाला असून, परिसरात एकच खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, विजय मुसा किराडीया (२७, रा. राजुरा ग्रामपंचायत उमापूर) यांनी घरगुती वादातून टोकाचे पाउल उचलल्याचे प्राथमिक तपासात समोर येत आहे. त्यांनी आपल्या प्रीत (७), प्राची (५), पूर्वी (३) व पीयूष (दीड वर्ष) या चौघांना विहिरीत टाकून स्वतःही विहिरीत उडी घेतली. ही घटना २४ तारखेच्या मध्यरात्री घडल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, २५ मे रोजी सकाळच्या सुमारास विहिरीत तीन मृतदेह तरंगताना काही ग्रामस्थांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच जळगाव जामोद पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा सुरू केला. पाचही मृतदेह बाहेर काढून शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. पती-पत्नीतील वादातून ही घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून, पोलिस अधिक तपास करीत आहेत.

## बाजारात हिट तयार आहे, इलाज केला जाईल

### कॉकरोच जनता पार्टीच्या वादावर कुमार विश्वास यांचा खोचक टोला

**डेहराडून/वृत्तसंस्था :** भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एका खटल्याच्या सुनावणीदरम्यान तरुणांविषयी केलेल्या काकरोच (झुरळ) आणि परजीवी या टिप्पणीवरून सध्या देशभरात नवा वाद पेटला आहे. या वक्तव्याच्या निषेधार्थ सोशल मीडियावर अचानक कॉकरोच जनता पार्टी नावाचे एक व्यंग्यात्मक डिजिटल आंदोलन उभे राहिले असून, त्याला कोट्यवधी तरुणांचा पाठिंबा मिळत आहे. या संपूर्ण प्रकरणावर आता प्रसिद्ध कवी आणि प्रखरे वक्ते कुमार विश्वास यांनी अत्यंत खोचक शब्दांत तंज कसला आहे. जर देशात कॉकरोच तयार झाले असतील, तर बाजारात हिट (झुरळ मारण्याचे औषध) देखील उपलब्ध आहे, या कॉकरोचचा इलाज केला जाईल, असे विवादित वक्तव्य कुमार विश्वास यांनी केले आहे.




उत्तराखंडमधील डेहराडून येथे आयोजित लेखक गाव या कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी कुमार विश्वास आले होते. यावेळी माध्यमांनी त्यांना सोशल मीडियावर वादळ निर्माण करणा-या कॉकरोच जनता पार्टी बाबत प्रश्न विचारला. त्यावर उत्तर देताना त्यांनी आपल्या नेहमीच्या उपरोधिक शैलीत या डिजिटल चळवळीवर आणि त्याशी जोडल्या गेलेल्या तरुणांवर कडाडून टीका केली.

कुमार विश्वास म्हणाले की, लहानपणापासून आपण ऐकत आलो आहोत की कॉकरोच हा एक कीटक असून तो केवळ घाणीत आणि सडलेल्या ठिकाणीच पैदा होतो. हा एक टाकाउ जीव आहे. मला कॉकरोचबद्दल पहिल्यांदा तेव्हा समजले जेव्हा मी मोठा झालो आणि माझ्या आईने सांगितले की, हे जीव नेहमी अंधारात राहतात आणि एकत्र गोळा होतात. कॉकरोच कोणत्याही चांगल्या आणि सुशोभित वस्तूवर आक्रमण करतात आणि आधीपासून तयार असलेल्या चांगल्या व्यवस्थांचा नाश करण्याचे काम करतात. पुढे बोलताना त्यांनी थेट इशारा देत म्हटले की, जर देशात अशा कॉकरोचची निर्मिती झाली असेल, तर त्यांचा नायनाट करण्यासाठी हिट देखील सज्ज आहे. मग ते बंगाल असो की पंजाब, अशा कॉकरोचचा इलाज वेळेवर केला जाईल. कुमार विश्वस यांच्या या विधानानंतर सोशल मीडियावर एकच खळबळ उडाली असून तरुणांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. ➪(पान २ वर)

## कॉकरोच जनता पार्टीविरुद्ध याचिका, जलद सुनावणीची मागणी

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी कॉकरोच जनता पार्टीशी संबंधित व्यक्तींच्या हालचालींची सीबीआय चौकशी करण्याच्या मागणीवर तात्काळ सुनावणी करण्यास नकार दिला. कॉकरोच जनता पार्टी हे एक सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आहे, जे भारताच्या सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अलीकडील कॉकरोच टिप्पणीनंतर समोर आले. सोमवारी दुपारी १२ वाजेपर्यंत CJP च्या इंस्टाग्रामवर २.२९ कोटी फॉलोअर्स झाले आहेत. न्यायालयात याचिकाकर्त्याचे वकील एनके गोस्वामी यांनी सांगितले की, कक्ष न्यायव्यवस्थेची प्रतिमा मलिन करत आहे. यानंतर सरन्यायाधीश आणि न्यायमूर्ती जायमाल्यस बागची आणि व्हीएम पंचोली यांच्या खंडपीठाने म्हटले, याला इतक्या भावनिकतेने घेउ नका. ही याचिका



ॲडव्होकेट राजा चौधरी यांनी दाखल केली आहे. त्यांनी आंदोलनाशी संबंधित व्यक्तींच्या बनावट वकिलांची आणि बनावट कायद्याच्या पदव्यांची चौकशी करण्याचीही मागणी केली आहे. याव्यतिरिक्त, त्यांनी सर्वोच्च न्यायालयासमोर अलीकडील कार्यवाहीदरम्यान दिलेल्या तोंडी न्यायालयीन विधानांचे व्यावसायिकीकरणकरण्याविरोधात कारवाई करण्याचीही मागणी केली आहे. यावर CJI यांनी उत्तर दिले की, सध्या अशी कोणतीही गंभीर आणीबाणीची परिस्थिती नाही. काय होते ➪(पान २ वर)

### CJP ची वेबसाइट अजूनही बंद

अभिजीत यांनी रविवारी सांगितले होते की, त्यांच्या पक्षाची वेबसाइट बंद करण्यात आली आहे. दीपके यांनी X वर म्हटले होते - सरकारने आमची वेबसाइट बंद केली आहे. त्यावर १० लाख लोकांनी नोंदणी केली होती. ६ लाख लोकांनी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करणा-या याचिकेवर स्वाक्ष-या केल्या होत्या मात्र, ही वेबसाइट अजूनही बंद आहे. ती उघडल्यावर 'दिस साइट कान्ट बी रीच्ड' (This site can't be reached) असा संदेश दिसत आहे.

## आंबेनळी घाटात स्कॉर्पिओ कार खोल दरीत कोसळून 8 ठार

**रायगड//प्रतिनिधी :** कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र जोडणा-या पोलादपूर महाबळेश्वर घाटात रविवारी रात्री उशिरा भीषण अपघात झाला आहे. आंबेनळी घाटात एक स्कॉर्पिओ काल खोल दरीत कोसळून झालेल्या या भीषण अपघातात तब्बल आठ जणांचा मृत्यू झाला आहे. सातारा जिल्ह्यातील



आजगाव येथील आठ युवक दापोली येथे पर्यटनाचा आनंद लुटून पुन्हा आपल्या गावाकडे निघाले असताना हा अपघात झाला. आंबेनळी घाटात दाभिळ गावच्या हद्दीमध्ये गाडीवरील नियंत्रण सुटल्याने कारला अपघात झाल्याची माहिती आहे. मिळालेल्या माहितीनुसार, प्रतापगड ट्रेकर्ससह भाटिया सर यांची महाबळेश्वर रेस्क्यू टीम, महाड येथील सिस्केप, पोलादपूर पोलिस प्रशासन आणि स्थानिक टीम यांनी घटनास्थळी धाव घेउन तब्बल १००० फूट दरीत कोसळलेल्या या युवकांना बाहेर काढण्याचे काम सुरू केलं आहे. सोम सकाळी ७ वाजेपर्यंत एका जणाचा मृतदेह बाहेर काढण्यात यश आले आहे. घटनास्थळी प्रतापगड, रायगड, महाबळेश्वर आदी आपत्कालीन बचाव पथके तैनात करण्यात आली असून पोलीस अधिकारीही घटनास्थळी आहेत. ➪(पान २ वर)

## काश्मीर- गुलमर्ग रोपवे अचानक थांबला

**श्रीनगर/वृत्तसंस्था :** जम्मू-काश्मीरमधील प्रसिद्ध गुलमर्ग रोपवे (गुलमर्ग गोंडोला) मध्ये सोमवारी मोठा तांत्रिक बिघाड झाला. यामुळे रोपवेच्या सर्व केबिन हवेतच थांबल्या. सुमारे ३०० पर्यटक अडकले. अनेक पर्यटक घाबरून रडू लागले आणि खाली उतरवण्यासाठी ओरडू लागले. प्रत्यक्षदर्शींच्या मते, लहान मुले आणि वृद्धांमध्ये सर्वाधिक भीतीचे वातावरण दिसून आले. घटनेची माहिती मिळताच श्रीनगरहून विशेष बचाव पथके घटनास्थळी पाठवण्यात आली आहेत. सेनाही उपस्थित आहे. सेना, पोलिस आणि प्रशासनाने मोठ्या प्रमाणावर बचावकार्य सुरू केले आहे.



गुलमर्ग रोपवे जगातील सर्वात उंच आणि लांब केबल कार प्रणालींपैकी एक आहे. हे जम्मू-काश्मीरमधील गुलमर्गला अफरवात शिखराशी जोडते. यात एकूण १०८ केबिन कार आहेत. एका वेळी एका केबल कारमध्ये ६ लोक बसू शकतात. या घटनेबाबत जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले- सरकार परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे. सर्व केबिन आणि त्यात अडकलेले पर्यटक सुरक्षित आहेत. लोकांना बाहेर काढण्यासाठी प्रशिक्षित पथके बचावकार्य करत आहेत. घाबरण्याची गरज नाही.जम्मू आणि काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा म्हणाले- केबल कारच्या केबिनमध्ये अडकलेल्या पर्यटकांच्या बचावकार्यावर माझे लक्ष आहे. मी डीजीपींना घटनास्थळी जाण्याचे निर्देश दिले आहेत. पोलीस, सेना, चक्डक् डीसी आणि एसएसपी यांचे संयुक्तपथक घटनास्थळी उपस्थित आहे.





### हवेत 300 पर्यटक अडकले: यांत लहान मुले-वृद्धही, अनेक लोक घाबरून रडू लागले

**गुलमर्ग रोपवे जगातील दुसरी सर्वात उंच केबल कार प्रणाली-**

गुलमर्ग रोपवे आशियातील सर्वात उंच आणि सर्वात लांब केबल कार प्रकल्प आहे, आणि ही जगातील दुसरी सर्वात मोठी आणि सर्वात उंच केबल कार प्रणाली आहे. हे दोन टप्प्यांत गुलमर्गच्या पायथ्यापासून काँगडोरी आणि नंतर अफरवत शिखरापर्यंत जाते. येथून बर्फाच्छादित शिखरांची विहंगम दृश्ये दिसतात. गुलमर्ग गोंडोला देशातील सर्वात लोकप्रिय पर्यटन स्थळांपैकी एक मानले जाते आणि उन्हाळ्यात येथे मोठ्या संख्येने पर्यटक येतात. मात्र, घटनेनंतर सुरक्षा मानके आणि देखभालीबाबत प्रश्न उपस्थित होउ लागले आहेत.

## रेल्वेगाडीवर आत्मघाती हल्ला; 24 सैनिकांचा मृत्यू

**क्वेटा (पाकिस्तान):** पाकिस्तानमधील अशांत प्रांत असलेल्या बलुचिस्तानची राजधानी क्वेटा येथे रविवारी सकाळी एक भीषण आत्मघाती बॉम्बस्फोट झाला. क्वेटा कॅन्टोन्मेंट (लष्करी छावणी) येथून निघालेल्या जाफर एक्सप्रेस या पॅसेंजर रेल्वेगाडीला लक्ष्य करून हा हल्ला करण्यात आला. प्राथमिक माहितीनुसार, या भीषण स्फोटात २४ हून अधिक जणांचा मृत्यू झाला असून, १०० पेक्षा जास्त प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. मृतांमध्ये मोठ्या संख्येने पाकिस्तानी लष्कराचे जवान असल्याचा दावा केला जात आहे. या भीषण हल्ल्याची जबाबदारी बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यासाठी लढणा-या बलुच लिबरेशन आर्मी या प्रतिबंधित संघटनेने स्वीकारली आहे.

## लळिंग घाटामध्ये तिहेरी अपघात 6 प्रवासी ठार तर 26 जखमी



**धुळे /प्रतिनिधी :** लळिंग घाट परिसरात पहाटेच्या सुमारास भीषण तिहेरी अपघात घडला. या दुर्घटनेत ६ जणांचा जागीच मृत्यू झाला असून तब्बल २६ जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुरुवातीला रेतीने भरलेला डम्पर आणि ट्रक यांच्यात जोरदार धडक झाली. अपघातानंतर टोल कर्मचारी व पेट्रोलिंग पथक घटनास्थळी पोहोचून जखमींना बाहेर काढण्याचे काम करत होते. दरम्यान, भरधाव वेगाने येणा-या ट्रॅव्हल्स बसने अपघातग्रस्त ट्रक आणि डम्परला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत ट्रॅव्हल्सच्या केबिनमध्ये बसलेल्या काही जणांचा जागीच मृत्यू झाला. अपघातात गंभीर जखमी झालेल्या २० ते २२ जणांना तातडीने धुळे जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. घटनास्थळी पोलिस व प्रशासनाकडून मदतकार्य सुरू असून अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. अपघातात गंभीर जखमी झालेल्या २० ते २२ जणांना तातडीने धुळे जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

# महाराष्ट्रातील आठ मान्यवरांना 'पद्म' पुरस्कार प्रदान

## अभिनेते धर्मेंद्र यांना मरणोत्तर पद्मविभूषण

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशातील महत्वाचे नागरी सन्मान असलेल्या पद्म पुरस्कारांचे वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आले. महाराष्ट्रातील आठ मान्यवरांना त्यांच्या विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले.

राष्ट्रपती भवनातील गणतंत्र मंडप येथे आयोजित या समारंभास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी , केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच अन्य केंद्रीय मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते.पहिल्या टप्प्यातील समारंभात महाराष्ट्रातील आठ मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांना कला क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांच्या पत्नी व खासदार हेमा मालिनी यांनी स्वीकारला. सहा दशकांहून अधिक काळ हिंदी चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे धर्मेंद्र यांनी ३०० हून अधिक चित्रपटांमध्ये भूमिका साकारल्या. गेल्या नोव्हेंबरमध्ये वयाच्या ८९ व्या वर्षी त्यांचे निधन झाले होते. दोन मान्यवरांना



पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यात कोटक महिंद्रा बँकेचे संस्थापक उदय कोटक यांचा समावेश आहे. त्यांनी एका छोट्या बिल डिस्काउंटिंग स्टार्टअपपासून देशातील अग्रगण्य खासगी बँक उभी करून भारतीय बँकिंग क्षेत्रात नवे मानदंड निर्माण केले. कार्पोरेट गव्हर्नन्स आणि आर्थिक धोरण क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना गौरविण्यात आले. जाहिरात क्षेत्रातील सर्जनशीलतेचे प्रतीक मानले जाणारे पीयूष पांडे यांना मरणोत्तर पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या पत्नी नीता जोशी यांनी हा पुरस्कार स्वीकारला. पाच मान्यवरांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यात जनार्दन बापुराव बोठे यांना सामाजिक कार्यासाठी सन्मानित करण्यात आले. ग्रामीण महाराष्ट्रात जलसंधारण आणि शिक्षण क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे. पाणी अडवा, पाणी जिरवा मोहिमेद्वारे अनेक गावांचा पाणीप्रश्न सोडवण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. रघुवीर खेडकर यांना कला प्रकारातील तमाशा लोककलेसाठी पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथील ज्येष्ठ तमाशा कलावंत कांताबाई सातारकर यांचे पुत्र रघुवीर खेडकर असलेले यांनी महाराष्ट्राची पारंपरिक लोककला तमाशा जागतिक स्तरावर पोहोचवली असून लोककलेच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधनाचे कार्यही त्यांनी केले आहे. श्रीरंग लाड यांना कृषी क्षेत्रातील कार्यासाठी पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. परभणीचे प्रयोगशील शेतकरी आणि भारतीय किसान संघाचे ज्येष्ठ



कार्यकर्ते असलेल्या श्री. लाड यांनी दादा लाड तंत्रज्ञान विकसित करून कापूस उत्पादन वाढीसाठी मोठे कार्य केले. लाल कंधारी गाईंच्या संवर्धनासाठीही त्यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. नागपूरस्थित उद्योजक सत्यनारायण नुवाल यांनी सोलर इंडस्ट्रीजच्या माध्यमातून संरक्षण क्षेत्र आणि खाणकाम उद्योगात मोठे योगदान दिले आहे. डिफेन्स एक्सप्लोझिव्ह क्षेत्रात भारताला आत्मनिर्भर बनवण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. या योगदानासाठी त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मायक्रो इलेक्ट्रानिक्स आणि सेमी कंडक्टर संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून देशाच्या वैज्ञानिक प्रगतीला चालना देणारे इंडियन इन्स्टिटयूट ऑफ टेक्नालाजीचे प्रा. जुझर वासी यांना पद्मश्री पुरस्कार देउन सन्मानित करण्यात आले.

**गोडबोले दाम्पत्याला संयुक्त पद्मश्री-** मूळचे पुण्याचे असलेले डॉ. रामचंद्र गोडबोले आणि डॉ. सुनीता गोडबोले या दाम्पत्याला संयुक्तपणे पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. गेली ३५ वर्षे त्यांनी महाराष्ट्र आणि छत्तीसगडमधील बस्तर आणि अबू झमाडसारख्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागांत आरोग्य सेवा पोहोचवण्याचे कार्य केले आहे.

ट्रस्ट फार हेल्थच्या माध्यमातून त्यांनी आदिवासी भागातील कुपोषण आणि बालमृत्यू कमी करण्यासाठी विशेष योगदान दिले असून, सुमारे एक लाख आदिवासींना मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली आहे. छत्तीसगड राज्यामधील योगदानाबद्दल त्यांना सन्मानित करण्यात आले.यंदाचे पद्म पुरस्कार वितरण दोन टप्प्यांत होत असून, टप्प्यात देशभरातील ६६ मान्यवरांना पुरस्कार प्रदान ➪(पान २ वर)



# देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम मागे घ्या अन्यथा जनआंदोलन

**महाराष्ट्र मंदिर महासंघाचा पत्रकार परिषदेत निर्धार**



अमरावती/प्रतिनिधीः- महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन प्रारूप अधिनियम मागे घ्या नाहीतर राज्यव्यापी जन आंदोलन करण्याचा इशारा महाराष्ट्र मंदिर महासंघ ने आज सोमवार २५ मे रोजी झालेल्या पत्रकार परिषद मध्ये दिला आहे. महासंघाचे पदाधिकारी अनुप जैस्वाल यांनी म्हटले की या अधिनियममुळे राज्यातील सहस्त्र हिंदू देवस्थानाचे अस्तित्व आणि त्यांच्या उत्पन्नाचे स्तोत्र मुळापासून उखडून जाणार आहे. या कायद्याच्या मसूद्यात अत्यंत गंभीर कायदेशीर त्रुटी असून तो हिंदू देवस्थानाच्या धार्मिक मालमत्ता अधिकारावर थेट घाला घालणारा आहे. या देवस्थान मालक हक्क विरोधी मसुद्याला आम्ही निषेध करत असून तो सरकारने विना शर्त मागे घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. सरकारने हा विरोधी कायदा रेटण्याचा प्रयत्न केला आहे. सार्वजनिक महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये कायद्यानुसार देवस्थानाची मालकी कायदेशीर व्यक्ती मानली जाते. भूमीची मालकी देवतेकडे असत. मात्र प्रस्तावित कायद्यानुसार ही सर्व इनामे रहित करून भूमी वहीवाटदार किंवा पुजारी यांची नावे मालक म्हणून वर्ग करण्याचा प्रयत्न चालू आहे. यामुळे मंदिराच्या सेवेसाठी वापरल्या जाणाऱ्या भूमीचे व्यापारीकरण होऊन भविष्यात मंदिरे परावलंबी होतील. मसुदासिद्ध करण्यापूर्वी सरकारने नैसर्गिक न्याय तत्वाचा विचार केलेला नाही. यात मंदिरांना बाजू मांडण्याची संधी देण्यात आली नाही. ज्यांनी देवस्थानांना इनाम म्हणून भूमी दिलेली आहेत, त्या मंदिराचा उदरनिर्वाह चालवावा म्हणून दिलेले आहेत. हा कायदा केवळ हिंदू मंदिरासाठी लागू केला नसून तो अन्य धर्मासाठी लागू नाही. त्यामुळे हे निधर्मी व्यवस्था देशात कशी घडू शकते हा प्रश्न आहे. हा कायदा लवकरात लवकर रद्द करण्यात यावा नाही, तर राज्यव्यापी जन आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आलेला आहे. पत्रकार परिषदेमध्ये सनातन संस्थेचे धर्मप्रचार अशोक पात्रीकर, अंबादेवी संस्थानचे अधिवक्ता एड.राजेंद्र पांडे, हिंदू जनजागृती समितीचे समन्वयक सचिन वैद्य, आशा मनीषा संस्थेचे विश्वस्त निलेश जटाळे, जहागीरपुरचे अध्यक्ष ओम प्रकाश परतानी, सावंगा विठोबाचे अध्यक्ष पुंजाजी नेमाडे आदि उपस्थित होते.

# रेल्वेने कटून अज्ञात युवकाचा मृत्यू

अमरावती/प्रतिनिधीः- रेल्वेने कटून अज्ञात युवकाचा मृत्यू झाल्याची घटना मालखेड रेल्वे लाईन वर समोर आली आहे. माहितीनुसार मालखेड रेल्वे लाईन वर रविवारी मृतदेह आढळला होता. रेल्वे अपघातात त्याचा मृत्यू झाल्याची माहिती आहे. त्याने निळ्या रंगाचा पट्ट्याची बनियान, निळ्या रंगाचा जीन्स, राखडी रंगाची अंडरवेअर घातलेली आहे. त्याचा रंग गोरा, उंची १६६ सेमी., डोक्याचे केस काळे, दाढी मिशी काळी व वाढलेली आहे. मृतदेहाच्या संदर्भात कोणतीही माहिती असल्यास बडनेरा पोलीस स्टेशन येथे मो. ७९७२०८०४१२,९५५२५६१०१९ वर संपर्क करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.



# नवरात्री उत्सवाच्या नावावर १८ लाखांनी फसवणूक

**अमरावती/प्रतिनिधीः-** टेक्नो क्राफ्ट टेक्स्टाईल इंडस्ट्रीमध्ये नवरात्री उत्सवाच्या नावावर १८ लाखांनी फसविण्यात आल्याचे प्रकरण समोर आले आहे. तक्रार करताना कंपनीच्या एका अधिकाऱ्यावर उत्सवाच्या नावावर पैसे गोळा करून त्याचा हिशोब न देता रक्कम हडपण्याचे आरोप आहे. कंपनीचे उपाध्यक्ष तुषार त्र्यंबक व्यवहारे (वय ५६) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी वैभव अभय बमरोटवार (वय ४०) विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

तुषार व्यवहारे यांनी दिलेल्या तक्रारीमध्ये म्हटले आहे की, गेल्या चार वर्षापासून टेक्नो क्राफ्ट टेक्स्टाईल इंडस्ट्रीज मुंबई मुरबाड मध्ये ते उपाध्यक्ष पदावर कार्यरत आहे. कंपनीची एक शाखा नांदगाव पेठ एमआयडीसी मध्ये पण आहे. येथे रेडीमेड कपड्यांचे उत्पादन केले जाते. कंपनीमध्ये कपडे आणि धागे बनविले जातात. वर्ष २०२२ ते २०२५ पर्यंत कंपनीमध्ये दरवर्षी नवरात्री उत्सव आयोजित करण्यात आले. उत्सवाचे आयोजन व खर्चासाठी आरोपी वैभव बमरोटवार जवळ वेगवेगळे अकाउंट होते. त्याच्याजवळ उत्सवाच्या खर्चाचा संपूर्ण हिशोब होता. वर्ष २०२४ मध्ये डोनेशनच्या रूपात ९ लाख १९ हजार ५७४ जमा झाले होते. आरोप आहे की या पैशांचा हिशोब आरोपी वैभवने सादर नाही केला. या व्यतिरिक्त २०२४ ते २०२५ मध्ये झालेल्या उत्सवाच्या खर्चाचे विवरण त्याने नाही दिले. कंपनीच्या खात्यात हे पैसे जमा करणे अपेक्षित होते पण त्यांनी नाही केले. १८ लाखांनी त्यांनी फसविले. अशी तक्रार त्यांनी वैभव बमरोटवार विरुद्ध दाखल केली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केलेला आहे.



## १ व १० वरिल उर्वरित

### बाजारात हिट तयार आहे,

अनेक नेत्यांनी आणि बेरोजगार तरुणांनी कुमार विश्वास यांच्या या वक्तव्याला देशातील सुशिक्षित तरुणांचा घोर अपमान म्हटले आहे. आम्ही हक्काचा रोजगार आणि पेपर लीक विरोधात आवाज उठवला तर आम्हाला किडा-मुंगी समजून मारण्याची भाषा केली जात आहे का? असा सवाल आता सोशल मीडियावरून विचारला जात आहे. हा सगळा वाद गेल्या आठवड्यात सर्वोच्च न्यायालयाच्या टिप्पणीनंतर सुरू झाला होता. राष्ट्रीय पातळीवरील NEET परीक्षा आणि इतर सरकारी परीक्षांच्या पेपर लीक प्रकरणांमुळे तरुण आधीच संतप्त असताना, सरन्यायाधीशांच्या एका वक्तव्याने आगीत तेल ओतण्याचे काम केले. त्यावरून हिंगोलीच्या अभिजित दिपके या तरुणाने सोशल मीडियावर काकरोच जनता पार्टी स्थापन केली, ज्याचे फॉलोअर्स अवघ्या काही दिवसांत थेट २ कोटींच्या पार गेले आहेत. आता या चळवळीला देशातील अनेक विरोधी पक्ष, बालिवूड सेलिब्रिटी आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा पाठिंबा मिळत असल्याने सरकार आणि प्रशासनाची चिंता वाढली असून, कुमार विश्वास यांच्या या नव्या वक्तव्यामुळे हा वाद अधिकच चिघळण्याची चिन्हे आहेत.

### कॉकरोच जनता पार्टीविरुद्ध

ते पाहू. **महाराष्ट्रात दीपके यांच्या घराबाहेर पोलीस तैनात**-तर, महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथील CJP संस्थापक अभिजीत दीपके यांच्या घरावर २४ तास पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. पोलीस उपायुक्त पंकज अतुलकर यांनी सांगितले की, ही तैनाती खबरदारीचा उपाय म्हणून करण्यात आली आहे. त्यांनी सांगितले की, सोशल मीडियावर CJP चा मुद्दा ट्रेंड करत आहे, त्यामुळे त्यांच्या घराबाहेर गर्दी जमू नये, हे लक्षात घेउन हे पाउल उचलण्यात आले. मात्र, त्यांना कोणत्याही प्रकारची अधिकृत धमकी मिळाल्याचे त्यांनी नाकारले.

### महाराष्ट्रातील आठ मान्यवरांना

करण्यात आले. यामध्ये दोन पद्मविभूषण, सहा पद्मभूषण आणि ५८ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. यंदाच्या पद्म पुरस्कार यादीत एकूण १३१ पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून, त्यामध्ये ५ पद्मविभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. एकूण पुरस्कारार्थीमध्ये १९ महिला असून, १६ मान्यवरांना मरणोत्तर सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

### दादा लाड यांना पद्मश्री प्रदान

परभणी जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय योगदानाबद्दल श्रीरंग देवबा लाड (दादा लाड) यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे आयोजित समारंभात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्कारामुळे परभणीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. दादा लाड यांनी शेती क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत केंद्र शासनाने त्यांची पद्मश्री पुरस्कारासाठी निवड केली होती. त्यांचा हा सन्मान परभणी जिल्ह्यासह मराठवाड्यातील नागरिकांसाठी अभिमानाची बाब ठरला आहे. या पुरस्कारासाठी दादा लाड यांच्यावर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### आंबेनळी घाटात स्कॉर्पिओ कार

घाटातील तीव्र वळणावर स्कॉर्पिओ गाडी थेट खोल दरीत कोसळली. रात्रीचा अंधार व घाटातील अतिशय दुर्गम भागामुळे प्रशासनाला अपघाताची माहिती मिळण्यास काहीसा उशीर झाल्याचे समजते. बचाव पथके घटनास्थळी दाखल झाल्यानंतर रात्रभर दोरांच्या सहाय्याने दरीत उतरून वाहनापर्यंत पोहोचण्याचा आणि अडकलेल्या प्रवाशांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. परंतु, अंधार, खोल दरी आणि कठीण भौगोलिक परिस्थितीमुळे कार्यात मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. घटनेची गंभीरता लक्षात घेउन उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) शंकर काळे, पोलादपूरचे तहसीलदार कपिल घोरपडे तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद रावडे यांनी घटनास्थळी भेट देउन बचावकार्याचा आढावा घेतला. विविध विभागांमध्ये समन्वय साधून शोधमोहीम अधिक वेगाने राबवण्याच्या सूचना यावेळी अधिका-यांकडून देण्यात आल्या आहेत.दरम्यान, आंबेनळी घाटात यापूर्वीही अनेक भीषण अपघात झाले आहेत. काही वर्षांपूर्वी दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातील कर्मचा-यांची बस दरीत कोसळल्याने तब्बल ३० जणांचा जागीच मृत्यू झाला होता. आता पुन्हा एकदा तरुणांच्या वाहनाला झालेल्या भीषण अपघातामुळे आठ ते दहा वर्षांपूर्वी झालेल्या अपघाताच्या काळ्याकुट्ट आठवणी पुन्हा एकदा जाग्या झाल्या आहेत.

### पहिल्याच दिवशी १६

आहे. शहराध्यक्ष-जिल्हाध्यक्ष निवडणूक वरून झालेल्या नाराजी नंतर आता पार्टी विधान परिषदसाठी प्रयत्न करत आहे. यामुळे आज डॉ.ओमप्रकाश झोड यांनी माजी आमदार वीरेंद्र जगताप यांच्यासाठी तीन नामांकन उचलले. तसेच अनिरुद्ध उर्फ बबलू देशमुख यांच्यासाठी ओम मेटकर यांनी तीन नामांकन उचलले आहे. या व्यतिरिक्त योगेश गावंडे यांनी २, संदीप बाबूलाल मेश्राम १, विनोद दिगंबर डोंगरदिवे १, मो.सिद्धीक मो.सादिक यांनी एक असे एकूण १६ नामांकन आज उचलण्यात आले आहे. यामुळे आता विधान परिषद निवडणुकीची रणधुमारी वाढताना दिसत आहे. विधान परिषद निवडणुकीसाठी नामांकन दाखल करण्याची अंतिम तारीख १ जून आहे. आता निवडणुकीचा रोमांच अजून वाढणार असे दिसत आहे.

### नाहरकत प्रमाणपत्रासाठी ६०

यांच्याकडे देण्यास सांगितल्याची माहिती समोर आली. अखेर रविवारी २५ मे रोजी पुन्हा सापळा रचण्यात आला. यावेळी ग्रामसेवकाने तक्रारदाराकडून ६० हजार रुपयांची लाच स्वीकारून ती लिपिक सरप यांच्याकडे दिली. तत्काळ पथकाने दोघांनाही रंगेहात पकडले. आरोपी सरप यांच्याकडून ६० हजार रुपयांची रक्कम पंचासमक्ष जप्त करण्यात आली.या प्रकरणी बाळापूर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ च्या कलम ७ व १२ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती.ही धडक कारवाई अमरावती परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक बापू बांगर व अपर पोलीस अधीक्षक सचिंद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सापळा अधिकारी म्हणून पोलीस उपअधीक्षक मिलिंदकुमार बहाकर यांनी नेतृत्व केले. तसेच पोलीस अंमलदार दिगांबर जाधव, अविनाश पाचपोर, संदीप ताले, असलम शहा, गोपाल किरडे आणि चालक नफीस शेख यांनी कारवाईत सहभाग घेतला. दरम्यान, कोणत्याही शासकीय अधिकारी किंवा कर्मचाऱ्याकडून शासकीय कामासाठी लाचेची मागणी होत असल्यास नागरिकांनी तत्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विभागाने केले आहे.

### केंद्र व राज्य सरकारच्या हुकूमशाही

गगनभेदी घोषणा देत कार्यकर्त्यांनी संपूर्ण परिसर डोक्यावर घेतला होता. पुतळा दहनाच्या या आक्रमक पवित्र्यामुळे काही काळ वातावरणात प्रचंड तणाव निर्माण झाला होता.

**छत्रपती शिवाजी महाराज चौक ते शास्त्री चौक...** या मोर्चाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून झाली. हातात काँग्रेसचे झेंडे आणि सरकारच्या निषेधाचे फलक घेऊन हजारो कार्यकर्ते रस्त्यावर उतरले होते. हा जनसागर केंद्र व राज्य सरकारच्या जुलमी कारभाराचा निषेध करत शास्त्री चौक येथे पोहोचला, **'या' ज्वलंत मुद्द्यांवरून सरकारला घेरले:** आंदोलनाचे नेतृत्व करणारे परीक्षित जगताप यांनी आपल्या भाषणातून सरकारवर अत्यंत बोचरी आणि धारदार टीका केली: पेट्रोल-डिझेल आणि खतांची दरवाढ (शेतकऱ्यांची लूट): आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चे तेल स्वस्त असतानाही देशात पेट्रोल-डिझेलचे दर वाढवून सर्वसामान्यांचे कंबरडे तोडले जात आहे. रासायनिक खतांच्या किमती वाढवून शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम हे सरकार करत आहे. हा अन्याय काँग्रेस कदापि सहन करणार नाही, असा इशारा देण्यात आला. 'नीट' पेपर फुटीचा काळा बाजार: नीट पेपर फुटीच्या घोटाळ्यामुळे लाखो तरुण विद्यार्थ्यांचे भविष्य या सरकारने अंधारात ढकलले आहे. हा केवळ पेपर फुटीचा प्रकार नसून विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा खून आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत दोषींना जेलमध्ये टाकण्याची मागणी केली. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी हीच आमची मागणी: खोके सरकारच्या काळात शेतकरी आत्महत्या करत असताना सरकार मात्र मश्गूल आहे. शेतकऱ्यांना तात्काळ संपूर्ण कर्जमाफी मिळालीच पाहिजे, हा हक्क आम्ही हिसकावून घेतल्याशिवाय राहणार नाही, असा आक्रमक पवित्रा आंदोलकांनी घेतला.

**संपूर्ण काँग्रेस संघटना एकवटली!-** या आंदोलनात तालुका काँग्रेस कमिटी, युवक काँग्रेस कमिटी, महिला काँग्रेस, सेवादल आणि काँग्रेसच्या सर्व सेलचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच हजारो शेतकरी आणि तरुण बांधव रस्त्यावर उतरले होते.

'हे सरकार फक्त आश्वासनांचे फुगे उडवणारे आणि सर्वसामान्यांना लुटणारे सरकार आहे. आज आम्ही पेट्रोलियम मंत्र्यांचा पुतळा जाळून फक्त इशारा दिला आहे, जर सरकारने पेट्रोल-डिझेलचे दर कमी केले नाहीत, नीट घोटाळ्यातील आरोपींना पाठीशी घालणे बंद केले नाही आणि शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली नाही, तर यापुढे काँग्रेस पक्षाच्या वतीने याहूनही अधिक तीव्र आणि हिंसक आंदोलन छेडले जाईल यावेळी जिल्हा बँकेचे संचालक श्रीकांत गावंडे, तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष पंकज वानखडे, शहर काँग्रेस कमिटी कार्याध्यक्ष चंदू डहाणे, बंडूभाऊ जगताप, सचिदानंद काळे,युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष मयूर डुबे, शहर काँग्रेस कमिटी अध्यक्ष आशिष शिंदे, अनुसूचित जाती सेलचे अध्यक्ष अजय तूपसुंदरे, शैलेश निस्ताने, राजूभाऊ भोगे,गजानन चवरे, समीर पाटील,नंदकुमार मानकर, सलीम पठाण, मुकेश राठी,मुकुंद माहोरे, मंगेश बोबडे, मनोज वेरुळकर, सुधीर शेळके,संदीप दावेदार, संजय शेंडे, संजय तायडे, मंगेश ढाले, संजय नन्नवरे, रमाकांत इंगोले, रुपेश गुल्हाने, अतुल वाघ, सुनील भोगे, संदीप भोगे, वैभव पावडे, निवृत्ती वैद्य, अनिस पठाण, गणेश धवणे, गिरीश गाडेकर, राहुल ठाकरे, अविनाश इंगळे, अविनाश दुधे, विजय माकोडे, वैभव पावडे, संजय इंगळे, डॉ प्रमोदराव रोंघे, नितीन देशमुख, अभिषेक खंडारे, बंडू मळापे,अनुप भोगे, अमोल भेंडे, अनुप मोहकार, संतोष पळसापूरे, महबूब भाई ठेकेदार, अर्जुन शिंदे, अक्षय मेश्राम, मुकेश गोफणे, गौरव जयस्वाल, सोनू शेख, नरेंद्र मस्के, राजकुमार माने, नरेंद्र बेराड, किशोर खुरपडे, संकेत उभाळ, विशाल बमनोटे, दामू चवरे, कैलास ऊईके, विशाल डुबे असंख्य कार्यकर्ते व शेतकरी बंधू उपस्थित होते

### अंजनगाव सुर्जी पालिकेच्या ढिसाळ

आगलागल्याचा अंदाज आहे.. या आगीत दोन्ही दुकानांचे व घराचे लाखोंचे नुकसान झाले असून, अंजनगाव सुर्जी नगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचा अत्यंत ढिसाळ कारभार समोर आला आहे असलेल्या तीन ड्रायव्हरपैकी एक ड्रायव्हर नगराध्यक्षाच्या गाडीवर गेल्याने जमालेल्या नागरिकानमध्ये रोष दिसून आला.

बंद असलेल्या दुकानाला आग लागल्याचे दिसताच.नागरिकांनी अग्निशमन विभागाशी संपर्क साधला. मात्र पालिकेकडे ड्रायव्हरच उपलब्ध नसल्याने आणी वेळेवर रात्रपाळीच्या ड्रायव्हरला पाचारण करावे लागल्याने जमलेला जमावा चा राग शिगेला पोहचला होता.

अग्निशमन दलाची गाडी तासभर उलटूनही न आल्याने स्थानिक नागरिकांनी लहान पाईप आणि बादल्यांनी पाणी मारून आग आटोक्यात आणली. आग पूर्णपणे विझल्यानंतर पालिकेची लहान अग्निशमन गाडी (गोरखा) घटनास्थळी दाखल झाली, मात्र तिथे पोहोचताच ती गाडीही बंद पडली. पालिकेच्या या अकार्यक्षमतेमुळे उपस्थित गर्दीचा संयम सुटला आणि संतप्त नागरिकांनी चालकाला ओढतान करत आपला रोष व्यक्त केला. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून अखेर पोलिसांना पाचारण करावे लागले.

या घटनेची माहिती मिळताच आमदार गजानन लवटे यांनी घटनास्थळाला भेट देऊन नुकसानीची पाहणी केली आणि पीडित दुकानदारांना आणि घर मालक यांना धीर दिला. दरम्यान, प्रशासनाच्या या ढिसाळ कारभारावर आरोग्य सभापती प्रवीण नेमाडे आणि सुयोग खाडे यांनी तीव्र शब्दांत संताप व्यक्त करत. अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले.

अंजनगाव पालिकेला वारंवार फोन करूनही गाडी आली नाही, मात्र शेजारील अचलपूर नगरपालिके ची अग्निशमन गाडी अवघ्या काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाली. दरम्यान, अंजनगाव सुर्जी पालिकेच्या अग्निशमन विभागातील तिन्ही चालक अप्रशिक्षित असल्याचीही माहिती समोर येत आहे. असे असले तरी, गाडी येण्यापूर्वी विभागातील काही कर्मचाऱ्यांनी स्वतःहून आग विझवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले.

आर्थिक नुकसानभरपाई देण्याची मागणी

या दुर्घटनेत घरा सहीत वृंदावन डेअरी आणि नियती सोलर सर्व्हिस या दोन्ही दुकानांचे लाखोंचे नुकसान झाले आहे. पालिकेच्या अक्षम्य चुकीमुळेच ही वेळ आल्याचा आरोप करत, अंजनगाव नगरपालिकेने या दोन्ही पीडित दुकानदारांना तात्काळ आर्थिक नुकसानभरपाई द्यावी, अशी जोरदार मागणी उपस्थितांनी केली.

**अग्निशमन वाहन चालक नगराध्यक्षाच्या गाडीवर-** पालिकेकडे तीन वाहनचालक असूनही वेळेवर एकही गाडी पोहोचू शकली नाही. त्यातील एक चालक आधीच दुसऱ्या ठिकाणी आग विझवण्यासाठी गेला होता, दुसरा चालक रात्रपाळी संपवून घरी विश्रांती घेत होता, तर तिसरा चालक थेट नगराध्यक्ष अविनाश गायगोले यांच्या गाडीवर गेला असल्याची धक्कादायक माहिती समोर आली असून ऊन्हाने यावर्षी उच्चाक गाठला असतांना या बेजाबदारपणाबाबत नागरिकानमध्ये नगराध्यक्षांच्या विरोधात रोष पहायला मिळाला.

### जनगणना कर्मचाऱ्यांच्या

त्यामुळे सुरुवातीला ते बाहेर गेले असावेत असा अंदाज व्यक्त करण्यात आला.

मात्र, प्रगणकांना घरातील लाईट व पंखे सुरू असल्याचे दिसून आले. संशय आल्याने त्यांनी घरात डोकावून पाहिले असता वृद्ध आजोबा जमिनीवर पडलेल्या अवस्थेत दिसले. त्यांच्या शेजारी आजीही बेशुद्ध अवस्थेत पडलेल्या होत्या. घरातून दुर्गंधीही येत होती.

यावेळी प्रगणकांनी तत्काळ शेजाऱ्यांना बोलावून घेतले तसेच जवळ राहणाऱ्या डॉक्टरांनाही घटनास्थळी पाचारण केले. डॉक्टरांनी तपासणी केली असता आजोबांचा दोन दिवसांपूर्वीच मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. त्यांना पाहून वृद्ध आजी बेशुद्ध पडल्या होत्या.

त्यानंतर संबंधित महिलेला तातडीने झीनत हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. डॉक्टरांच्या माहितीनुसार, महिलेची ऑक्सिजन लेव्हल व शरीरातील पाण्याची पातळी अत्यंत कमी झाली होती. थोडा जरी उशीर झाला असता तर त्यांचाही मृत्यू झाला असता, असे डॉक्टरांनी सांगितले.

दरम्यान, संबंधित वृद्ध दाम्पत्याचा एक मुलगा परदेशात राहतो तर दुसरा नागपुरात वास्तव्यास आहे. या घटनेची माहिती दोन्ही मुलांना देण्यात आली. तसेच मृत वृद्धाच्या पार्थिवावर आज सकाळी अंतिम संस्कार करण्यात आले.

जनगणना कर्मचाऱ्यांच्या सतर्कता, तत्परता आणि मानवतेच्या भावनेमुळे एका महिलेचा जीव वाचल्याने परिसरात त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

### मंदिरातील तळयाच्या वादातून

धर्मादाय आयुक्तांकडे प्रलंबित असल्याची माहिती आहे. शनिवारी रात्री मंदिर परिसरातील तळ्यातील गाळ व पाणी काढण्याचे काम सुरू असताना एका गटातील नितीन रामकृष्ण गायधनी हे साफसफाई करत होते. त्यावेळी चिखल झाल्याच्या कारणावरून विरोधी गटातील विनोद मोतीराम चौधरी यांनी त्यांना जाब विचारला. सुरुवातीला झालेला शाब्दिक वाद काही वेळातच चिघळला आणि दोन्ही गटातील ३० ते ४० जण एकमेकांसमोर उभे ठाकले.

यानंतर काठ्या, लाथाबुक्क्यांनी एकमेकांवर हल्ला करण्यात आला. या मारहाणीत साहिल गजानन धार्मिक, गणेश चंपतराव मते, राहुल मनोहर गायधनी, पवन शंकर ठवक्कर, अशोक रामभाऊ गायधनी, अमोल साहेबराव गायधनी, शुभम विजय बोडळे आणि सुनील साहेबराव यावले हे जखमी झाले. जखमींवर उपचार सुरू असून काहींना गंभीर दुखापती झाल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच मंगरूळ चव्हाळा पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. गावात पुढील अनुचित प्रकार टाळण्यासाठी अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. या प्रकरणी दोन्ही गटांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. दरम्यान, जुन्या वादातून पुन्हा हिंसाचार उसळल्याने गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### खल्लार पोलिसांचे पथसंचलन

अधिकारी,३ अंमलदार, पोलिस स्टेशन दर्यापूर येथील १ अधिकारी ४ अंमलदार २ सैनिक, पोलिस स्टेशन खल्लार येथील २ अधिकारी १४ अंमलदार असे एकूण ४ अधिकारी २२ अंमलदार ०२ सैनिक सहभागी झाले होते.

### जिल्ह्यात भीषण अपघातांची मालिका

मृत्यू झाला. याप्रकरणी रितेश प्रेम राजने (२०, रा. पाळा, ता. चांदूरबाजार) यांच्या तक्रारीवरून ट्रॅव्हल्स क्रमांक ८६५१ च्या चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसरी घटना मोर्शी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भांबोरा गावाजवळ तुळजापूरकडे जाणाऱ्या कच्च्या मार्गावर घडली. राजेश पावने (३८) हे दुचाकीने सातरगावकडे जात असताना भरधाव टिप्पर क्रमांक एमएच ३१ एफसी ९५९२ ने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात त्यांचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी उमेश शंकरराव पावने (४६, रा. सातरगाव) यांनी दिलेल्या तक्रारीवरून मोर्शी पोलिसांनी टिप्पर चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

तिसरी घटना अमरावती शहरातील फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नया सांगवा फाट्याजवळ घडली. राजकुमार प्रकाश कावस हे त्यांचे मामा विनोद हजरसिंग वनाके (३५, रा. केकाडी, ता. मोहखेड, जि. छिंदवाडा) यांच्यासोबत दुचाकीने जात होते. दरम्यान, रॉंग साईडने आलेल्या दुचाकीने त्यांच्या वाहनाला समोरून जोरदार धडक दिली. या अपघातात विनोद वनाके यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्यांचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी एमएच २७ एक्यू २१६२ क्रमांकाच्या दुचाकी चालकाविरुद्ध फ्रेजरपुरा पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

दरम्यान, जिल्ह्यात वाढत्या अपघातांच्या घटनांमुळे वाहतूक नियमांचे पालन, भरधाव वाहनांवर नियंत्रण आणि रॉंग साईड वाहनचालकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### १०० दिवसांचा ॲक्शन प्लॅन

जन्मदाखला उपलब्ध करून देण्याची व्यवस्था आणि स्वच्छ, सुरक्षित शहर उभारण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. मात्र प्रत्यक्षात नगरपरिषद परिसरातच घाणीचे साम्राज्य पसरल्याचे चित्र समोर येत आहे. नगरपरिषद इमारतीच्या विविध भागात कचऱ्याचे ढीग, अस्वच्छ भिंती, पानाच्या पिचकाऱ्या, कोपऱ्यात साचलेला कचरा आणि स्वच्छतेचा अभाव स्पष्टपणे दिसून येत आहे. शहराला स्वच्छतेचे धडे देणारी यंत्रणा स्वतःचे कार्यालय स्वच्छ ठेवण्यातच अपयशी ठरत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.

या संपूर्ण प्रकारात मुख्याधिकारी शुभम क्यातंमवार, आरोग्य विभाग आणि बाजार विभाग यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचा आरोप पुढे येत आहे. नगरपरिषदेच्या दैनंदिन स्वच्छतेची जबाबदारी असताना कार्यालयीन परिसरातच अस्वच्छता वाढत असल्याने संबंधित विभागांच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शहरात सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेतही दुजाभाव होत असल्याची ओरड वाढू लागली आहे. सर्वसामान्य छोटे व्यावसायिक आणि हातगाडीधारकांवर कारवाई होत असताना काही प्रभावशाली आणि राजकीय पाठबळ असलेल्या अतिक्रमणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप नागरिकांमधून होत आहे.

महिलांच्या सुरक्षेसाठी दामिनी पथकाला सक्षम करण्याच्या घोषणा करण्यात आल्या असल्या तरी अनेक भागांत या पथकाची गस्त कमी झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे महिला व मुलींच्या सुरक्षेबाबत निर्माण झालेली चिंता अद्याप कायम असल्याचे चित्र आहे.महिलांसाठी स्वच्छतागृह निर्मिती, सुरक्षित शहर, तक्रार निवारण यंत्रणा, स्वच्छता आणि विकासाच्या घोषणा प्रत्यक्षात कितपत उतरतात याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे. कारण १०० दिवसांचा आराखडा हा फक्त कागदी घोडे नाचविणारा कार्यक्रम ठरणार की शहराच्या वास्तवात बदल घडवणार, याची खरी परीक्षा आता प्रशासनासमोर आहे.

शहर विकासाच्या घोषणा एकीकडे आणि नगरपरिषद परिसरातील दयनीय अवस्था दुसरीकडे, यामुळे आता नागरिकांमधून एकच प्रश्न विचारला जात आहे.घरच स्वच्छ नाही, तर शहर स्वच्छ कसे होणार? असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहे.

### वारंवारच्या वीजखंडितचा संताप;

दरम्यान, आंदोलनकर्त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पोस्टरवर चिरे मारून संताप व्यक्त केला. या प्रकारामुळे परिसरात काही काळ गोंधळाची स्थिती निर्माण झाली. विशेष म्हणजे, या आंदोलनाची कोणतीही पूर्वपरवानगी किंवा माहिती पोलिसांना देण्यात आली नव्हती. सोशल मीडियावरून आंदोलनाची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी तत्काळ विद्युत भवन परिसरात बंदोबस्त वाढविला होता.

पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आंदोलनकर्त्यांनी पोलीस आयुक्तांनी लागू केलेल्या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन केले. त्यामुळे एएसआय अशोक वाटाणे यांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलीस ठाण्यात पराग राजेंद्र गुडधे, सुधीर सूर्यवंशी, प्रदीप बाजड, पंजाबराव तायडे, नितीन तारेकर यांच्यासह १० ते १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

शहरात वाढत्या उष्णतेदरम्यान वारंवार होणाऱ्या वीजखंडितीमुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून, या आंदोलनानंतर वीजपुरवठ्याचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### ईकरा शाळेला शॉर्ट सर्किटमुळे

या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून मोठा अनर्थ टळला आहे.

घटनेनंतर शाळा परिसरात नागरिकांची गर्दी झाली होती. प्रशासनाकडून नुकसानीचा पंचनामा करण्यात येत असून आगीच्या नेमक्या कारणांचा अधिक तपास सुरू आहे.

### दर्यापूर शहराने घेतला मोकळा

भावना अनेक नागरिकांनी व्यक्त केली.

शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ आणि रस्ते खुले दिसू लागल्याने वाहनचालक व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. रस्ते मोकळे झाल्याने वाहतुकीला गती मिळाली. विशेषत शाळकरी विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि पादचाऱ्यांसाठी चालणे अधिक सोयीचे झाले आहे.

मात्र दुसरीकडे, छोट्या व्यावसायिक आणि हातगाडीधारकांमध्ये नाराजीचे सूरही उमटत आहेत. अनेकांचे रोजगार अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे प्रभावित झाल्याने उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला अशी खंत काहींनी व्यक्त केली. त्यामुळे शहरात 'कही खुशी कही गम 'चे वातावरण आहे.

नागरिकांनी प्रशासनाने वाहतूक सुरळीत ठेवण्याबरोबरच पर्यायी व्यवस्था, नियोजनबद्ध फेरीवाला झोन आणि रोजगाराच्या दृष्टीने सकारात्मक पावले उचलण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. शहर सुशोभिकरणासोबत सर्वसामान्यांच्या हिताचाही समतोल राखण्याची गरज असल्याचे मत पुढे येत आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ मंगळवार, २६ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## मालेगावच्या 'माने हॉस्पिटल' मध्ये गर्भलिंग निदान रॅकेटचा पर्दाफाश ; डॉक्टरांसह ५ जणांवर गुन्हा दाखल

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

*येथील 'माने हॉस्पिटल' या सोनोग्राफी केंद्रात सुरू असलेल्या बेकायदेशीर गर्भलिंग निदान रॅकेटचा प्रशासकीय पथकाने बनावट रुग्ण पाठवून (डिकॉय ऑपरेशन) अत्यंत नाट्यमयरीत्या पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी शासकीय वैद्यकीय पथकाच्या तक्रारीवरून मालेगाव पोलीस ठाण्यात हॉस्पिटलचे संचालक डॉ. विवेक माने, रुग्णालयातील कर्मचारी आणि मध्यस्थासह एका अज्ञात महिला डॉक्टराविरुद्ध 'पीसीपीएनडीटी' (PCPNDT) कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.*




**गोपनीय तक्रारीवरून 'डिकॉय' कारवाई**

ग्रामीण रुग्णालय मालेगावचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुहास देविदास वाहुळे यांना माने हॉस्पिटलमध्ये पैशांच्या बदल्यात बेकायदेशीर गर्भलिंग निदान होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे डॉ. वाहुळे यांनी डॉ. श्रीकांत जाधव, ॲड. राधा नरवालीया, ॲड. शुभांगी ठाकरे, डॉ. धनंजय चिमणकर, पांडुरंग भोंडणे आणि प्रदीप घुले यांच्या संयुक्त पथकासह दि. २३ मे रोजी सकाळी कारवाईचे नियोजन केले.

पथकाने एका गरोदर महिला आणि तिच्या नातेवाईकाला 'बनावट रुग्ण' (Decoy Patient) म्हणून तयार केले. मध्यस्थ दीपक बदर (रा. आरेगाव, जि. बुलढाणा) याच्याशी संपर्क साधून हे पथक सकाळी मालेगाव येथे पोहोचले. नियोजनानुसार, शनिवारी (दि. २३ मे) रोजी सकाळी ११:३० वाजता बनावट रुग्ण माने हॉस्पिटलमध्ये दाखल झाला.

तेथे मध्यस्थ दीपक बदर आणि रुग्णालयातील कर्मचारी कृष्णा खडसे यांनी गर्भलिंग निदानासाठी पैशांची मागणी केली. बनावट रुग्णाच्या नातेवाईकाने त्यांना २३,००० रुपये दिले. रक्कम स्वीकारल्यानंतर रुग्णालयातील दुसरा कर्मचारी गजानन वानखडे याने रुग्णाला तपासणीसाठी डॉक्टरांच्या केबिनमध्ये नेले, जिथे एका अज्ञात महिला डॉक्टराने त्या रुग्णाची सोनोग्राफी केली आणि एका महिन्याने पुन्हा येण्यास सांगितले.

सोनोग्राफी पूर्ण झाल्याचा इशारा मिळताच, दुपारी १२:१५ वाजता वैद्यकीय पथकाने माने हॉस्पिटलमध्ये छापा टाकला. मात्र, पथक पोहोचण्यापूर्वीच मध्यस्थ दीपक बदर पैसे घेऊन रुग्णालयातून फरार झाला होता. तपासणी दरम्यान सोनोग्राफी कक्षात गर्भलिंग निदान करणारी ती महिला डॉक्टर देखील मिळून आली नाही. रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी फोन केल्यानंतर संचालक डॉ. विवेक माने दुपारी १:०० वाजता रुग्णालयात हजर झाले. पथकाने त्यांना विचारपूस केली असता त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली. तसेच सदर महिला डॉक्टरच्या वैद्यकीय प्रमाणपत्राची मागणी केली असता, ते सादर करण्यात ते अपयशी ठरले. वैद्यकीय पथकाने उपस्थित कर्मचारी, बनावट रुग्ण व नातेवाईक यांचे जबाब नोंदवून घेतले. त्यानंतर दि. २४ मे रोजी मध्यरात्री १२:२० वाजता मालेगाव पोलीस ठाण्यात अधिकृत तक्रार नोंदवण्यात आली.

या तक्रारीवरून पोलिसांनी हॉस्पिटल चे संचालक डॉ. विवेक माने कर्मचारी कृष्णा खडसे गजानन वानखडे (कर्मचारी) मध्यस्थ दीपक बदर (मध्यस्थ, रा. आरेगाव, मेहकर) आणि एक अज्ञात महिला डॉक्टर यांच्याविरुद्ध गर्भधारणा पूर्व व प्रसव-पूर्व रोग निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) अधिनियम १९९४ (PCPNDT Act) च्या विविध कलमांनुसार गुन्हा (FIR No. 0365 /2026) दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक पांडुरंग राजहंस इंगळे करत आहेत.

## रोहित्र जळाले ; दहा दिवसांपासून अंधारात शेतकरी

**सस्ती वीज उपकेंद्राच्या कारभारावर प्रश्नचिन्ह; केळी व हळद पिके करपण्याच्या मार्गावर**

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील सस्ती वीज उपकेंद्रांतर्गत अडगाव परिसरातील रोहित्र जळाल्याने शेतकऱ्यांवर मोठे संकट ओढवले आहे. मागील दहा दिवसांपासून वीजपुरवठा पूर्णपणे खंडित असून, महावितरण विभागाकडून दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप संतप्त शेतकऱ्यांनी केला आहे.

अडगाव परिसरात हळद व केळी पिकांची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यात आली आहे. मात्र, रोहित्र जळाल्यामुळे शेतीपंप बंद पडले असून पिकांना वेळेवर पाणी देता येत नाही. परिणामी पिके करपण्याच्या मार्गावर असून, शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.

आधीच वाढत्या शेतीखर्चामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत चालली आहे. शेतकऱ्यांनी अनेकवेळा सस्ती महावितरण कार्यालयात पाठपुरावा करूनही अधिकाऱ्यांकडून ठोस कार्यवाही होत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

दरम्यान, वीजपुरवठा तातडीने सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष घालून रोहित्र दुरुस्त करावे, अशी मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.



**केळी पीक करपण्याच्या मार्गावर**

गेल्या दहा दिवसांपासून रोहित्र जळाले आहे. महावितरण विभागाकडे वारंवार विनंती करूनही दुरुस्ती केली जात नाही. माझ्या शेतात अडीच एकर केळी लागवड आहे. पाण्याअभावी पीक करपण्याच्या मार्गावर असून लाखो रुपयांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. याला महावितरण विभाग जबाबदार राहील.

**दामोदर रामकृष्ण पाचपोर,**
अल्पभूधारक शेतकरी, अडगाव

## वाशिमच्या ऐतिहासिक वारशाच्या संवर्धनासाठी व्यापक कृती आराखडा राबवा

**पालक सचिव डॉ. किरण कुलकर्णी**

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि पुरातन वारसा जतन करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने व स्थानिक स्वराज्य संस्थांनी समन्वयाने काम करत व्यापक कृती आराखडा तयार करावा, असे निर्देश जिल्ह्याचे पालक सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी दिले.



जिल्ह्यातील हेरिटेज स्थळांचे संवर्धन, जतन आणि पर्यटन विकासाच्या दृष्टीने आयोजित बैठकीत त्यांनी विविध विभागांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते. बैठकीला जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांच्यासह पुरातत्व विभागाचे उप संचालक हेमंत दळवी हे आभासीरित्या, सहाय्यक संचालक मयुरेश खडके आणि इतर विभागांचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी पालक सचिवांनी सुरुवातीच्या टप्प्यात वाशिम आणि कारंजा या दोन तालुक्यांमध्ये हेरिटेज संवर्धन उपक्रमांची अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर या उपक्रमाचा विस्तार टप्प्याटप्प्याने संपूर्ण जिल्ह्यात करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. वाशिम आणि कारंजा तालुक्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांनी हेरिटेज लिस्टींग, डॉक्युमेंटरी आणि मॅनेजमेंट प्लॅन तातडीने तयार करावेत.

जिल्ह्यातील ऐतिहासिक वास्तू, प्राचीन मंदिरे, पारंपरिक सांस्कृतिक स्थळे आणि वारसा जपणाऱ्या ठिकाणांची माहिती संकलित करून त्यांचे शास्त्रशुद्ध दस्तऐवजीकरण करण्यात यावे, असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्ह्यातील विविध स्मारक आणि वारसा स्थळांच्या परिसरात माहिती फलक उभारून त्या स्थळांचा इतिहास, सांस्कृतिक महत्त्व आणि वैशिष्ट्ये नागरिक व पर्यटकांपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

## जैन समाजाचा तीव्र आक्रोश!



■ प्रतिनिधी | मालेगाव ■

येथील श्री दिगंबर जैन समाजाच्या वतीने पोलीस स्टेशन मालेगाव तसेच तहसीलदार साहेबांना निवेदन देत जैन साधुसंत आणि आर्यिका माताजींच्या सुरक्षेसाठी विशेष सुरक्षा व्यवस्था लागू करण्याची जोरदार मागणी करण्यात आली. मध्य प्रदेशातील रीवा जिल्हा मुख्यालयात जिल्हाधिकारी कार्यालयासमोर २० मे रोजी घडलेल्या भीषण अपघातात आर्यिका माताजींच्या संघाला एका वाहनाने निर्घृणपणे चिरडल्याने संपूर्ण जैन समाजात संताप आणि दुःखाची लाट पसरली आहे. या हृदयद्रावक घटनेत पूजनीय आर्यिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून समाजाने याकडे केवळ अपघात म्हणून न पाहता निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशीची मागणी केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले की, जैन साधुसंत हे पूर्णतः निःशस्त्र, अहिंसक आणि पायी भ्रमण करणारे तपस्वी असतात. ते कोणत्याही सुरक्षेचा किंवा सुविधांचा वापर न करता समाजात शांती, संयम आणि अहिंसेचा संदेश देतात. अशा संतांवरील वाढते अपघात आणि हल्ले ही संपूर्ण समाजासाठी गंभीर चिंतेची बाब असल्याचे समाजाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

## बोलीभाषांच्या संवर्धनातूनच अभिजात मराठी अधिक समृद्ध होईल -डॉ. किरण कुलकर्णी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मराठी ही केवळ एक भाषा नसून तब्बल २०० हून अधिक बोलीभाषांचे समृद्ध भाषाकुल आहे. या बोलीभाषाच मराठीचे मूळ असून त्यातूनच मराठी अधिक समृद्ध झाली आहे. त्यामुळे अभिजात मराठी भाषा अधिक सक्षम आणि व्यापक करण्यासाठी विविध बोलीभाषांचे संवर्धन करणे ही आजची खरी गरज आहे, असे प्रतिपादन मराठी भाषा विभागाचे सचिव तथा वाशिम जिल्ह्याचे पालकमंत्री सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले.



वाशिम जिल्हा प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी यांच्या वतीने आयोजित वासंतिक व्याख्यानमालेच्या समारोपीय सत्रात ते बोलत होते. यावेळी साहित्य, भाषा, संस्कृती आणि मराठीच्या जतन-संवर्धनाविषयी त्यांनी अभ्यासपूर्ण आणि परखड विचार मांडले. डॉ. कुलकर्णी म्हणाले की, जगामध्ये सुमारे साडेसहा हजार भाषा बोलल्या जातात आणि त्यामध्ये मराठी भाषेचा पहिल्या दहामध्ये समावेश होतो, ही मराठी भाषेच्या अभिजाततेची मोठी पावती आहे. मात्र, आज अनेक बोलीभाषा लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. या बोलीभाषांमधील शब्द, म्हणी, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक ठेवा जतन करणे अत्यंत आवश्यक आहे. हरवत चाललेले शब्द संकलित करून त्यांचे डिजिटल दस्तावेजीकरण करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.


मराठी भाषा विभाग यासाठी प्रयत्नशील आहे; मात्र या कार्यात सर्वसामान्य लोकांचाही सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे, असे सांगताना त्यांनी वाशिम जिल्ह्यातील विविध बोलीभाषांवर अधिक संशोधन व्हावे, अशी अपेक्षाही व्यक्त केली. तसेच मराठीच्या विविध बोलीभाषांतील लुप्त होत चाललेल्या शब्दांचा संग्रह करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले.

मराठी साहित्याच्या परंपरेविषयी बोलताना डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले की, मराठी साहित्याला हजारो वर्षांची समृद्ध परंपरा लाभली आहे. पूर्वीच्या साहित्यामधील गोडवा, शब्दांची ताकद आणि भाषेतील संस्कार आज कमी होत चालल्याची खंत त्यांनी व्यक्त केली.

पूर्वी महाराष्ट्रात शब्दांचा दुरुपयोग होत नव्हता. आज मात्र शब्दांची किंमत उरलेली नाही. विशेषणे सहजपणे कुणालाही लावली जातात.

## अकोल्याचा अमोघ काणे भारतीय नौदलात अधिकारी

**JAG विभागात निवड; कठोर परिश्रमातून मिळविले घवघवीत यश**



■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोल्यातील रामदास पेठ परिसरातील रहिवासी अमोघ सुधीर काणे याने कठोर मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर भारतीय नौदलातील अधिकारी पदाला गवसणी घातली आहे. भारतीय नौदलाच्या न्याय व कायदा विभागातील JAG (जज ॲडव्होकेट जनरल) अधिकारी म्हणून त्याची निवड झाली असून, या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

अमोघ हा अकोल्यातील सुप्रसिद्ध विधीज्ञ सुधीर काणे तसेच अकोला जिल्हा न्यायालयात प्रबंधक म्हणून कार्यरत सौ. नयना काणे यांचा सुपुत्र आहे. त्याने कायद्याचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर भारतीय नौदलातील ँ पदासाठी परीक्षा दिली होती. भारतीय नौदलातील हा अत्यंत महत्त्वाचा विभाग मानला जातो. सैन्य न्यायव्यवस्था, कायदेशीर सल्ला, शिस्तभंग विषयक बाबी, सेवा नियम तसेच कोर्ट मार्शल प्रक्रियेसंदर्भातील कामकाज ँ अधिकाऱ्यांकडून हाताळले जाते.

JAG अधिकारी हे सैन्यातील कायदेशीर तज्ज्ञ मानले जातात. वरिष्ठ अधिकाऱ्यांना न्यायविषयक मार्गदर्शन करणे, करार व नियमांची अंमलबजावणी करणे तसेच सैन्य व्यवस्थेमध्ये पारदर्शकता आणि शिस्त अबाधित ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर असते.

अमोघची निवड SSB अर्थात सर्व्हिस सिलेक्शन बोर्डच्या कठोर निवड प्रक्रियेतून झाली आहे. पाच दिवस चालणाऱ्या या प्रक्रियेत उमेदवारांची विविध स्तरांवर चाचणी घेतली जाते. बौद्धिक क्षमता, नेतृत्वगुण, मानसिक तयारी आणि निर्णयक्षमता यांची कसून परीक्षा घेतल्यानंतर अंतिम निवड केली जाते. या सर्व टप्प्यांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत अमोघने यश संपादन केले.

२९ जूनपासून केरळ येथे त्याचे प्रशिक्षण सुरू होणार आहे. विशेष म्हणजे, अमोघचा मोठा भाऊ यश काणे यानेही चार वर्षांपूर्वी प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी (JMFC) म्हणून पदभार स्वीकारला आहे. त्यामुळे काणे कुटुंबाच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

## घनकचरा व्यवस्थापन नियमाचे पालन करा - सीईओ अर्पित चौहान

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर केंद्र सरकारच्या जलशक्ती मंत्रालयांतर्गत पेयजल व स्वच्छता विभागाने ग्रामीण भागासाठी घनकचरा व्यवस्थापन अधिनियम-२०२६ लागू केला असून, याबात जिल्हा परिषदेच्या वतीने जनजागृती मोहीम राबविली जात आहे.

मोहिमेच्या पहिल्या टप्प्यात ५००० च्या वर लोकसंख्या असलेल्या बाजारपेठा असलेल्या २१ ग्रामपंचायतींचा समावेश करण्यात आला आहे. शुक्रवारी (दि. २२) मालेगाव तालुक्यातील मुंगळा, मेडशी आणि राजाकिन्ही या



ग्रामपंचायतींना भेटी देऊन गावाची तपासणी करण्यात आली. गावात अस्तित्वात असलेल्या स्वच्छता सुविधांची देखभाल करण्याचे व त्याचा नियमित वापर करण्याच्या सूचना दिल्या. ৳

यावेळी मालेगाव पंचायत समितीचे गट विकास अधिकारी रमेश कंकाळ, जिल्हा परिषदेच्या जिल्हा पाणी व स्वच्छता विभागाचे राम श्रृंगारे, तालुका समन्वयक ज्ञानेश्वर महाले यांची स्वच्छता विषयक आढावा घेतला. यावेळी ग्रामविकास अधिकारी सांगळे, घुगे यांच्यासह ग्रामपंचायत पदाधिकारी उपस्थित होते.

**...तर वीज आणि पाणी बंद करण्याचे निर्देश**

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्था व संबंधितांवर वीज आणि पाणी बंद करण्याची कारवाई करण्याचे निर्देशही प्रशासनाने दिले आहेत. मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण करणाऱ्या आस्थापनांची माहिती संकलित करून त्यांची नोंदणी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने ५ मे २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार राज्य शासन, जिल्हाधिकारी, ाहानगरपालिका, नगरपरिषद आणि ग्रामपंचायतींना घनकचरा व्यवस्थापनाबाबत विविध जबाबदाऱ्या निश्चित करण्यात आल्या आहेत.

## बुद्धांचे तत्वज्ञान जगाला शांतीचा समतेचा संदेश देणारे : तेजराव वानखेडे

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

तथागत गौतम बुद्धाचे तत्त्वज्ञान हे दुःख मुक्ती, समता, बंधुता, करुणा आणि विज्ञाननिष्ठ विचारावर आधारित आहे. मानवी जीवनातील दुःखाचे मुख्य कारण तृष्णा असल्याचे सांगून बुद्धांनी चार आर्य सत्य आणि आष्टांगिक मार्गद्वारे निर्वाण मिळवण्याचा मार्ग दाखवला आहे. त्यांचे तत्त्वज्ञान तर्कशुद्ध आणि मानवी मूल्यासोबतच शांतीचा पुरस्कार करणारे आहे. असे प्रतिपादन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवलेचे जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे यांनी दि. २३ मे रोजी

नागरतास येथे आयोजित एक दिवसीय धम्म परिषदेमध्ये बोलताना केले.

या धम्म परिषदेचे आयोजक पूज्य भदंत प्रियदर्शि थेरो हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये बौद्धाचार्य ज्येष्ठ समाजसेवक जे.एस.शिंदे, समाजसेवक बबनराव बनसोड, रिपाइंचे मालेगाव तालुका अध्यक्ष प्रकाश गवई, जिल्हा युवा अध्यक्ष गजानन वानखेडे, समाजसेवक रमेश टाले, परिवर्तन कला महासंघाचे अध्यक्ष शेषराव मेश्राम होते.

## हिंदू सूर्य महाराणा प्रताप जयंतीची शहरात जय्यत तयारी

**१७ जून रोजी तिथीनुसार निघणार भव्य शोभायात्रा; विविध उपक्रमांनी रंगणार उत्सव**

■ प्रतिनिधी | अकोला ■

मेवाडचे शूर योद्धा, स्वाभिमानाचे प्रतीक आणि हिंदवी अस्मितेचे प्रेरणास्थान असलेल्या हिंदू सूर्य महाराणा प्रताप यांची जयंती यंदा १७ जून रोजी तिथीनुसार शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे. जयंतीनिमित्त भव्य शोभायात्रेसह विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचा निर्णय रविवारी झालेल्या नियोजन सभेत घेण्यात आला.

महाराणा प्रताप सेवा समिती अकोला तसेच अखिल भारतीय क्षत्रिय महासभा शाखा अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने महाराणा प्रताप बाग येथे या महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीत जयंती उत्सवाचे स्वरूप अधिक



भव्य करण्याबाबत चर्चा करण्यात आली. शोभायात्रेचा मार्ग, कार्यक्रमांची आखणी, समाजबांधवांचा सहभाग तसेच युवकांच्या जबाबदाऱ्या यावर सविस्तर विचारविनिमय झाला.

यंदाच्या शोभायात्रेत महाराणा प्रताप यांच्या जीवनकार्यावर आधारित आकर्षक देखावे, पारंपरिक राजस्थानी वेशभूषा, ढोल-ताशांचा गजर, भगवे ध्वज आणि देशभक्तीपर घोषणांनी वातावरण दणाणून जाणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. शहरातील विविध भागांतून समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी होणार असून उत्सवाला ऐतिहासिक स्वरूप देण्याचा निर्धार बैठकीत व्यक्त करण्यात आला.

महाराणा प्रताप बाग येथे जयंतीनिमित्त विविध समाजोपयोगी उपक्रम, गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच युवकांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन सत्रांचे आयोजन करण्यात येणार आहे. महाराणा प्रताप यांच्या शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचा आदर्श नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी हा उत्सव प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या बैठकीला शहर व परिसरातील क्षत्रिय समाजातील पदाधिकारी, युवक, ज्येष्ठ नागरिक आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. जयंती उत्सवात सर्व समाजबांधवांसह नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १७८ ■ मंगळवार, २६ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## न्यू बोर येथे नवनियुक्त आरएफओ अर्चना नौकरकर यांचे स्वागत



**सेलू जनमाध्यम :** तालुक्यातील न्यू बोर बोरधरण येथे नुकत्याच रुजू झालेल्या परिक्षेत्र वन अधिकारी (आरएफओ) अर्चना नौकरकर यांचे स्थानिक नागरिक आणि सहकाऱ्यांच्या उपस्थितीत स्वागत करण्यात आले. यानिमित्त आयोजित छोटेखानी कार्यक्रमात विविध मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या. कार्यभार स्वीकारल्यानंतर आयोजित स्वागत समारंभात संजय निराधार योजना तालुकाध्यक्ष अशोक मुडे, शेख अजित सर, राजू घोडे, बंटी दुबे आणि पंढरी जुगनाके यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. तसेच त्यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.

## महामार्गावरील भेगांनी उघडे पाडले सरकारचे विकास मॉडेल

### भेगांच्या विळख्यात महामार्ग; खा.अमर काळे आक्रमक



**वर्धा जनमाध्यम :** विकासाच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची उधळण करून उभारण्यात आलेला सेवाग्राम-हमदापूर-कांढळी सिमेंट महामार्ग आज नागरिकांसाठी अक्षरशः मृत्यूचा महामार्ग ठरत आहे. रस्ता पूर्ण होण्याआधीच ठिकठिकाणी पडलेल्या खोल भेगा, अपूर्ण पुलांची कामे आणि प्रशासनाची ढिम्म भूमिका यामुळे जनतेचा संताप आता टोकाला पोहोचला आहे. हा महामार्ग आहे की भ्रष्टाचाराचा जिवंत पुरावा असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

राष्ट्रीय महामार्ग विभागाने मोठा गाजावाजा करत हा सिमेंट रस्ता तयार केला. मात्र काही महिन्यांतच या रस्त्यावर तब्बल ४.४ इंचांच्या भेगा पडल्याने कामाच्या दर्जावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग जीवघेणा ठरत असून अनेक लहान-मोठे अपघात येथे घडले आहेत. रात्रीच्या वेळी या भेगा नजरेस न पडल्याने वाहनचालकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

वारंवार तक्रारी करूनही राष्ट्रीय महामार्ग विभागाने कानाडोळा केल्याने संतप्त नागरिकांनी अखेर खासदार अमर काळे यांच्याकडे धाव घेतली. नागरिकांच्या तक्रारीची गंभीर दखल घेत खासदार काळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरत तात्काळ दुरुस्तीचे आदेश दिले. जनतेच्या पैशावर भ्रष्टाचार करणाऱ्यांना सोडले जाणार नाही, असा इशारा त्यांनी दिला.

इतकेच नव्हे तर जिल्ह्यातील रखडलेली आणि अपूर्ण रस्त्यांची कामे त्वरित पूर्ण करण्याचे निर्देशही खासदारांनी प्रशासनाला दिले आहेत. अनेक ठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाने वार्षिक देखभाल दुरुस्तीची कामे न करताच ठेकेदारांना लाखोंची बिले अदा केल्याचा गंभीर आरोपही त्यांनी केला. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित अभियंते आणि ठेकेदारांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, रस्ते बनतात जनतेसाठी की ठेकेदारांच्या तिजोरी भरण्यासाठी असा प्रश्न आता नागरिक विचारत आहेत. कागदावर विकासाची फुशारकी मारणाऱ्या प्रशासनाने आता रस्त्यावर उतरून वास्तव पाहावे, अन्यथा जनतेचा उद्रेक अटळ असल्याचा इशाराही नागरिकांनी दिला आहे.

## जंगल जळाले... पर्यावरण राख झाले; दैत्यगडात ३४ हेक्टर वनसंपदा खाक

### वनखात्याची गुप्त चौकशी सुरू

**वर्धा जनमाध्यम :** विदर्भाच्या हिरव्या फुफ्फुसावर आगीचा निर्दयी घाला बसला असून बोर व्याघ्र प्रकल्पातील दैत्यगड परिसर अक्षरशः धगधगत्या राखेत बदलला आहे. ३४.८९ हेक्टरवरील मौल्यवान वनसंपदा आगीत भस्मसात झाली असून पर्यावरणाचे लाखो रुपयांचे नव्हे तर पिढ्यान् पिढ्यांचे नुकसान झाल्याची संतप्त प्रतिक्रिया पर्यावरणप्रेमींमधून उमटत आहे. 'ही आग अपघात नव्हे, तर जंगलाच्या छाताडावरचा हल्ला आहे, अशी चर्चा आता परिसरात रंगू लागली आहे.

बोर व्याघ्र प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रातील गरमसूर टेकड्या आणि दैत्यगड परिसर हा वर्धा जिल्ह्याचा 'ऑक्सिजन बँक' म्हणून ओळखला जातो. गाव आणि जंगल यांच्यामधील नैसर्गिक कवच म्हणून उभा असलेला हा भाग वन्यजीवांचा आश्रयदाता आहे. मात्र, काही दिवसांपूर्वी लागलेल्या भीषण आगीने या हिरव्या पट्ट्याला



काळवंडून टाकले. उंच गवत, झाडे, औषधी वनस्पती आणि वन्यजीवांसाठी उपयुक्त असलेली संपूर्ण परिसंस्था आगीच्या विळख्यात सापडली.

२१ मे रोजी दैत्यगड भागातून धुराचे प्रचंड लोट उठत असल्याचे लक्षात येताच बफर क्षेत्रातील अधिकारी व कर्मचारी युद्धपातळीवर घटनास्थळी दाखल झाले. न्यू बोर आणि हिंगणी बफरच्या वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी स्वतःचा जीव धोक्यात घालून मध्यरात्रीपर्यंत आगीशी झुंज दिली. धगधगत्या ज्वाळांमध्ये काही कर्मचाऱ्यांची प्रकृतीही खालावली; मात्र तरीही त्यांनी माघार घेतली नाही. अखेर अथक प्रयत्नांनंतर आग नियंत्रणात आली; पण तोपर्यंत जंगलाचा मोठा भाग राखेत परिवर्तित झाला होता.

वनविभागाच्या प्राथमिक अहवालानुसार उमरविहिरी बीटातील ८.०९ हेक्टर, नवरगाव उत्तर बीटातील ९.८० हेक्टर आणि मेट बीटातील तब्बल १७.०९ हेक्टर क्षेत्र जळून खाक झाले. तृणभक्षी प्राण्यांचे खाद्य असलेले तीन प्रकारचे गवत, भेरा, तेंदू आणि कडुनिंबासारखी औषधी व उपयुक्त झाडेही आगीने गिळंकृत केली. दरम्यान, ही आग नैसर्गिक नव्हती, असा संशय आता बळावू लागला आहे. 'जंगल पेटले की कुणाचे हित साधले जाते या प्रश्नाने वनविभागालाही सतर्क केले असून संबंधित प्रकरणात अत्यंत गुप्तपणे माहिती गोळा केली जात आहे. काही संशयित हालचालींवर अधिकाऱ्यांची नजर असल्याचीही चर्चा रंगत आहे.

## उन्हाच्या झळांनी आणखी एक बळी? झडशीत वृद्धाचा संशयित उष्माघाताने मृत्यू


**सेलु जनमाध्यम :** तालुक्यातील झडशी येथे उष्णतेच्या तीव्र तडाख्याने आणखी एका जीवाचा बळी गेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. गावातील प्राथमिक शाळेच्या वऱ्हाड्यात ६२ वर्षीय अशोक दादाजी चौधरी यांचा मृतदेह संशयास्पद अवस्थेत आढळून आल्याने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली. मृतदेहाची अवस्था पाहता त्यांचा मृत्यू दोन ते तीन दिवसांपूर्वीच झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.



माहितीनुसार, अशोक चौधरी हे गावात एकटेच राहत होते. पत्नी आणि मुलगा हे अनेक दिवसांपासून परगावी वास्तव्यास असल्याने त्यांच्याकडे लक्ष देणारे कोणी नव्हते. दरम्यान, आज सकाळपासून परिसरात तीव्र दुर्गंधी पसरू लागल्याने ग्रामस्थांना संशय आला. नागरिकांनी परिसरात शोध घेतला असता प्राथमिक शाळेच्या वऱ्हाड्यात त्यांचा मृतदेह आढळून आला. ही माहिती गावात वाऱ्यासारखी पसरताच घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी झाली.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेहाची अवस्था, सलग वाढणारे तापमान आणि उकाड्याची तीव्रता लक्षात घेता उष्माघातामुळे मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, शवविच्छेदन अहवाल आल्यानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार असल्याचे सांगण्यात आले. नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय दुपारच्या वेळेत बाहेर पडू नये, भरपूर पाणी प्यावे आणि वृद्धांची विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## पुण्यात ४०० कोटींच्या गुंतवणुकीसह पुढील १० वर्षात एक हजार रोजगार निर्मिती होणार - मुख्यमंत्री



**मुंबई जनमाध्यम :** राज्य शासन आणि अग्रेको इंडिया कंपनीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज झालेल्या सामंजस्य करारामुळे पुण्यात पुढील दहा वर्षांत सुमारे चारशे कोटी रुपयांची गुंतवणूक आणि सुमारे एक हजारावर थेट रोजगाराची निर्मिती होणार आहे. त्यासाठी या कंपनीला उत्कृष्ट कार्यपरिसर मिळण्याबरोबरच आवश्यक सर्व सहकार्य केले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या सामंजस्य कराराप्रसंगी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बळगण, गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, अग्रेको इंडियाचे संचालक सन्नी ठकरार, ग्रुप प्रमुख स्टीफन रेआ, व्यवस्थापकीय संचालक राहुल खरे, हेड ऑफ प्रोक्युअरमेंट अँड ग्लोबल सप्लाय सुनील देशमुख, व्यापार सल्लागार मार्क बिरेल, वरिष्ठ व्यापार सल्लागार प्रतीक्षा क्षीरसागर आदी उपस्थित होते.

## सोशल मीडियावर विष पेरणाऱ्यांवर पोलिसांचा वॉच ; बकरी ईदपूर्वी प्रशासन अलर्ट मोडवर

**वर्धा जनमाध्यम :** आगामी २७ मे रोजी साजऱ्या होणाऱ्या मुस्लिम बांधवांच्या पवित्र 'बकरी ईद' सणाच्या पार्श्वभूमीवर वर्धा जिल्ह्यात शांतता, कायदा-सुव्यवस्था आणि सामाजिक ऐक्य अबाधित राखण्यासाठी जिल्हा पोलीस प्रशासनाने विशेष तयारी सुरू केली आहे. याच पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात 'जिल्हा शांतता समिती'ची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

जिल्हा पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत विविध मुस्लिम संघटनांचे प्रतिनिधी, शांतता समिती सदस्य, पत्रकार आणि वरिष्ठ पोलीस अधिकारी सहभागी झाले. जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे ठाणेदार व्हिडीओ




कॉन्फरन्सिंगद्वारे बैठकीला जोडले गेले.

बैठकीत बकरी ईदचा सण शांततेत, उत्साहात आणि सर्वधर्मसमभावाच्या भावनेत साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले. कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, तसेच सोशल मीडियावर धार्मिक भावना दुखावणाऱ्या पोस्ट किंवा संदेश टाकू नयेत, असा कडक इशाराही पोलिसांनी दिला. सायबर सेलचे सोशल मीडियावर बारकाईने लक्ष असून अफवा पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. सणाच्या दिवशी शहरासह जिल्ह्यातील संवेदनशील भागात चोख पोलीस बंदोबस्त तैनात राहणार असून, वर्ध्याची शांततेची परंपरा कायम ठेवा, असे भावनिक आवाहन प्रशासनाने नागरिकांना केले.

## वाहतूक पोलिसांचा धडक ॲक्शन मोड; दोन दिवसांत १६ मद्यधुंद चालक जाळ्यात

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात वाढत्या अपघातांनी नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला असताना अखेर वाहतूक पोलिसांनी बेफाम वाहनचालकांविरोधात 'ऑपरेशन स्टेअरिंग' सुरू केले आहे. दारू पिऊन वाहन चालवत रस्त्यावर मृत्यूचे तांडव माजविणाऱ्यांवर पोलिसांनी करडी नजर ठेवत दोन दिवसांत तब्बल १६ मद्यधुंद चालकांना पकडून कायद्याचा चाप बसविला.



जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहतूक नियंत्रण शाखेने २३ व २४ मे रोजी जिल्हाभर विशेष नाकाबंदी मोहीम राबविली. सेवाग्राम, आळीपूर, आर्वी, कारंजा, पुलगाव आणि वर्धा शहरात वाहनांची कसून तपासणी करण्यात आली.

या मोहिमेदरम्यान अनेक वाहनचालक दारूच्या नशेत वाहन चालविताना आढळून आले. मेडिकल तपासणीत त्यांच्या रक्तातील अल्कोहोलचे प्रमाण धोकादायक असल्याचे समोर आले. मोटार वाहन कायद्याच्या कलम १८५ अंतर्गत त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. वरुडपासून पुलगावपर्यंत आणि मसाळ्यापासून बोरगाव मेघेपर्यंत अनेक भागांतील चालक या कारवाईत सापडले. वाहतूक विभागाने आता रोज विशेष मोहीम राबविण्याचा इशारा दिला असून, हेल्मेटशिवाय दुचाकी, सीटबेल्टशिवाय चारचाकी, अतिवेग आणि मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे वाहतूक पोलीस निरीक्षक विलास पाटील यांनी सांगितले.

नियम पाळा, जीव वाचवा अन्यथा पोलिसांची कारवाई अटळ असा थेट इशाराच वाहतूक पोलिसांनी नागरिकांना दिला आहे.

## बदलीसाठी २० हजारांची लाच मागितल्याचा आरोप; एसटी विभागातील वरिष्ठ लिपिक लाचलुचपतच्या जाळ्यात

### सेवाग्राम पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया; आरोपी ताब्यात

**वर्धा जनमाध्यम :** बदली करून देण्यासाठी २० हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी राज्य परिवहन महामंडळाच्या वर्धा विभागातील एका वरिष्ठ लिपिकाविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने कारवाई केली आहे. सचिन ज्ञानेश्वरराव चांदेकर (वय ४८), रा. चिकणी जामणी, ता. देवळी, सध्या वास्तव्यास एसटी क्वॉर्टर, रामनगर, वर्धा असे आरोपीचे नाव असून त्याच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार हे वर्धा आगारात कार्यरत आहेत. प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांनी सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात उपचार घेतले होते. डॉक्टरांनी त्यांना डिसेंबर २०२५ पासून बेडरेस्टचा सल्ला दिला होता. चालणे आणि फिरण्यास मनाई असल्याने तक्रारदारांनी बदलीसंदर्भात विभाग नियंत्रक, सेवाग्राम रोड, वर्धा यांच्याकडे अर्ज केला होता.

दरम्यान, बदली प्रक्रियेची विचारपूस करण्यासाठी तक्रारदार हे विभाग नियंत्रक कार्यालयातील वरिष्ठ लिपिक सचिन चांदेकर यांना भेटले. यावेळी वर्कशॉप आणि विभागीय कार्यालयात बदली करून देण्यासाठी २० हजार रुपयांची मागणी केल्याची तक्रार करण्यात आली. ही मागणी पंचांसमक्ष झाल्याचे लाचलुचपत विभागाने स्पष्ट केले आहे.

तक्रारीनंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १२ मे, १४ मे आणि २५ मे रोजी पडताळणी कारवाई केली. पडताळणीदरम्यान लाच मागणीची बाब निष्पन्न झाल्यानंतर सापळा रचण्याची तयारी करण्यात आली होती. मात्र, आरोपीकडून लाच स्वीकारण्यास टाळाटाळ करण्यात आल्याने प्रत्यक्ष सापळा कारवाई होऊ शकली नाही. तरीही पडताळणीतील पुराव्यांच्या आधारे आरोपीविरोधात कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान आरोपीची अंगझडती घेण्यात आली असून त्याचा 'रेडमी मोबाईल जप्त करण्यात आला आहे. तसेच आरोपीच्या घरझडतीची प्रक्रियाही सुरू करण्यात आली असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

या प्रकरणी सेवाग्राम पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ (सुधारित २०१८) मधील कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून गुन्हा नोंद झाल्यानंतर अटक करण्याची तयारी ठेवण्यात आली आहे.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक राकेश साखरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पुढील तपास पोलीस निरीक्षक कान्होपात्रा बन्सा करीत आहेत.

## मुंबईहून परतले अन् गावात पसरला मलेरियाचा विळखा

### देववाडी-बेडावर मलेरियाचा हल्ला; ९ जण बाधित, गावात भीतीचे सावट

**वर्धा जनमाध्यम :** कारंजा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र सारवाडी अंतर्गत येत असलेल्या देववाडी आणि पारधी बेडा या परिसरात मुंबई येथून कामानिमित गेलेल्या व गावी परतलेल्या नागरिकांमध्ये मलेरियाची लागण झाल्याचे निष्पन्न झाले आहे. सद्यस्थितीमध्ये ६ रुग्ण मलेरिया आजाराने ग्रस्त आढळून आल्यानंतर जिल्हा आरोग्य प्रशासनाने तात्काळ पावले उचलत या परिसरांमध्ये मलेरिया उद्रेक घोषित केला आहे. परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आणण्यासाठी ५ विशेष वैद्यकीय नियंत्रण पथके तयार करून युद्धपातळीवर उपाययोजना सुरु करण्यात आल्या आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी तथा प्रभारी जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. नलिनी विखे आणि जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. विनीत झळके यांच्यासह जिल्हास्तरीय साथरोग पथकाने थेट भेट देऊन परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली व तातडीने उपाययोजनांचे आदेश दिले. मुंबईवरून परतलेल्या कुटुंबांमुळे संसर्ग झाला असल्याची शंका जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले यांनी व्यक्त केली असून सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याचे त्यांनी सांगितले.





देववाडी व पारधी बेडा येथील काही कुटुंबे कामानिमित मुंबई येथे गेली होते. तिथे ते आजारी पडल्यामुळे आपल्या मूळ गावी परत आले. आरोग्य विभागाने केलेल्या तपासणीत ६ नागरिकांचे अहवाल मलेरिया पॉझिटिव्ह आले असून, त्यांच्यावर तात्काळ वैद्यकीय देखरेखीखाली औषधोपचार सुरु करण्यात आले आहेत. सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असून घाबरण्याचे कोणतेही कारण नाही, असे आरोग्य प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

बाधित क्षेत्रात तातडीने ५ आरोग्य पथके कार्यान्वित करण्यात आली असून या पथकांद्वारे गावातील प्रत्येक घराचे सर्वेक्षण हाऊस- टू- हाऊस ताप असलेल्या रुग्णांचा शोध आणि तात्काळ उपचार केले जात आहेत. घरोघरी जाऊन रक्त नमुने तपासणी करण्यात येत आहे. गावातील सर्व नागरिकांचे स्क्रिनिंग केले जात असून संशयित रुग्णांचे रक्ताचे नमुने जागीच गोळा करून मलेरिया निदान व उपचाराची गती वाढवण्यात आली आहे. डासांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी गावात साचलेल्या पाण्याची विल्हेवाट लावणे, अबेटिंग करणे आणि डास प्रतिबंधक औषधांची धूर फवारणी व घरोघरी कीटकनाशक अंतर्गत फवारणी वेगाने सुरु करण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर मलेरियावरील आवश्यक गोळ्या आणि इतर वैद्यकीय साधनसामग्रीचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यात आला आहे.

देववाडी व पारधी बेड़ा परिसरात घरात कोणालाही ताप, थंडी वाजून येणे, उलटीमळमळ किंवा डोकेदुखीचा त्रास असल्यास स्वतःच्या मनाने औषध न घेता तात्काळ गावात तैनात असलेल्या आरोग्य पथकाशी किंवा जवळच्या आरोग्य केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. स्वप्नील बेले यांनी केले आहे.



1) **उदय कोटक पद्मभूषण** (उद्योग व व्यापार) 2) **जनार्दन बापुराव बोठे**-पद्मश्री (सामाजिक कार्य) 3) **डॉ. रामचंद्र गोडबोले** पद्मश्री (वैद्यकीय सेवा) 4) **पीयूष पांडे पद्मभूषण** मरणोत्तर पत्नी नीता जोशी यांनी स्वीकारला 5) **प्रा. जुझेर वासी**-पद्मश्री (विज्ञान व अभियांत्रिकी) 6) **रघुवीर खेडकर**-पद्मश्री (कला - तमाशालोकनाट्य) 7) **श्रीमती सुनीता गोडबोले** पद्मश्री (वैद्यकीय सेवा) 8) **श्रीरंग देवबा लाड** पद्मश्री (कृषी) 9) **सत्यनारायण नुवाल**- (उद्योग)

# श्री सिद्धिविनायक मंदिर सुशोभीकरण प्रकल्पामुळे परिसराला मिळणार नवे रूप- मुख्यमंत्री

## श्री सिद्धिविनायक मंदिर परिसर सुशोभीकरणाचे भूमिपूजन



**मुंबई/प्रतिनिधी :** श्री सिद्धिविनायक मंदिरात देश विदेशातून भाविक येत असतात. भाविकांना सुलभ व कमी वेळामध्ये सिद्धिविनायकाचे दर्शन झाले पाहिजे. मंदिर परिसरात पायाभूत सुविधांची कामे करण्यात येत आहे. त्याचाच भाग म्हणून मंदिर परिसराचे सुशोभीकरण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पाच्या पूर्णत्वामुळे श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराला नवे रूप मिळणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. श्री सिद्धिविनायक मंदिर परिसराच्या सुशोभीकरण पहिल्या टप्प्यातील कामांचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. भूमिपूजन नंतर माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना मुख्यमंत्री बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, श्री सिद्धीविनायक गणपती मंदिर न्यासाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) सदानंद शंकर सरवणकर, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार प्रसाद लाड, महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, तसेच सिद्धीविनायक मंदिर न्यासाचे कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी यांच्यासह न्यासाचे विश्वस्त उपस्थित होते. सुशोभीकरण प्रकल्पामुळे दररोज दर्शनासाठी येणा-या भाविकांना अधिक चांगल्या सुविधा आणि प्रसन्न वातावरण मिळणार असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

# आजपासून राज्यात तीव्र आंदोलन

**मुंबई / प्रतिनिधी-**सत्तेत आल्यावर ३५ रुपये लिटरने पेट्रोल डिझेल देउ अशा वल्गना करणारे सत्तेत आल्यापासून पेट्रोल-डिझेल-एलपीजी सिलिंडरच्या किंमती गगमाला भिडल्या आहेत. मागील ११ दिवसातच पेट्रोल डिझेलच्या किमती ८ रुपये प्रति लिटरने वाढवलेल्या आहेत. इराण युद्धाच्या नावाखाली केलेली ही दरवाढ आधीच महागाईने पिचलेल्या जनतेच्या जखमेवर मीठ चोळणारी आहे. ही दरवाढ सर्वसामान्य जनतेच्या खिशावर दरोडा टाकणारी असून सरकारने तात्काळ मागे घ्यावी आणि महागाई नियंत्रणात ठेवता येत नसेल तर नरेंद्र मोदींनी खुर्ची सोडावी, अशी टीका करताना या दरवाढीविरोधात २६ मे पासून प्रत्येक जिल्ह्यात आंदोलन करण्यात येईल असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.

इंधन दरवाढीवरून सरकारचा समाचार घेताना हर्षवर्धन सपकाळ यांनी, इराण युद्धाचे नाव पुढे करून केलेली दरवाढ ही दिशाभूल करणारी असल्याचा आरोप केला. गेल्या १२ वर्षांत नरेंद्र मोदी सरकारने, पेट्रोलच्या किमती ३८ टक्क्यांनी, तर डिझेलच्या किमती ६२ टक्क्यांनी वाढवल्या आहेत, त्यावेळी तर इराण इस्त्राईलचे युद्ध नव्हते. पेट्रोल



डिझेलच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजारातील क्रूड ऑईलच्या दरानुसार ठरतात हे सर्वांनाच माहित आहे. डॉ. मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारच्या कार्यकाळात कच्च्या तेलाचे दर १०० डॉलर्स प्रति बॅरलपर्यंत पोहोचले असतानाही, पेट्रोल आणि डिझेलच्या किमती ७२ रुपये लिटरच्यावर जाउ दिल्या नाहीत. महागाईचा भार डॉ. मनमोहनसिंह यांनी जनतेवर पडू दिला नाही. पण मोदी सरकारच्या काळात कच्च्या तेलाचा भाव ५०-५५ डॉलर्स प्रति बॅरलच्या आसपास रेंगाळत होता तेव्हाही पेट्रोल १०० च्या आसपास विकले जात होते. आतातर नरेंद्र मोदी सरकार इथेनॉलमिश्रित निकृष्ट दर्जाचे पेट्रोल ११० रुपये प्रति लिटर दराने विकत आहे. गेल्या १२ वर्षांत केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारने पेट्रोलियम उत्पादनांवरील कर आणि उत्पादन शुल्काच्या माध्यमातून जनतेच्या खिशातून ४३ लाख कोटी रुपयांचा नफा कमावला आहे आणि मागील चार पाच दिवसात केलेल्या चार रुपयांच्या दरवाढीतून भारत पेट्रोलियम, इंडियन ऑइल कार्पोरेशन आणि हिंदुस्तान पेट्रोलियम कार्पोरेशन, या कंपन्यांनी काही तासांतच बाजारातून १२,४०० कोटींची कमाई केली. ही नफेखोरी जनतेच्या खिशावर दरोडा टाकून केलेली आहे. काँग्रेस सरकारच्या वेळी १-२ रुपयांनी पेट्रोल दरवाढ झाली की भाजपाचे नेते रस्त्यावर उतरत बोंबा मारत होते, मग आता महागाईवर गप्प का, असा सवाल सपकाळ यांनी केला.

# राज्यात इंधनाचा मुबलक साठा

## नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये-भुजबळ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून कोणत्याही प्रकारची इंधनटंचाई नसल्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी स्पष्ट केले. मात्र काही भागांत अफवांमुळे नागरिकांकडून अतिरिक्त इंधन खरेदी होत असल्याने पेट्रोल-डिझेल विक्रीत लक्षणीय वाढ झाल्याचे समोर आले आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरू न अनावश्यक साठा करू नये, असे आवाहन मंत्री भुजबळ यांनी केले. मंत्रालयात आयोजित राज्यातील पेट्रोल-डिझेल वितरणाबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, राज्य शिधावाटप नियंत्रक चंद्रकांत डांगे; तसेच विविध तेल कंपन्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी मंत्री भुजबळ यांनी सांगितले की, तेल कंपन्यांनी जिल्हा व तालुका स्तरावर नागरिकांमध्ये जनजागृती करावी. राज्यात पुरेसा इंधनसाठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत सुरू आहे. त्याबाबतची माहिती नागरिकांपर्यंत सातत्याने पोहोचवावी. काही ठिकाणी किरकोळ घटनांच्या आधारे इंधनटंचाईच्या अफवा पसरवल्या जात आहेत. त्यामुळे कृत्रिम तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे. ते रोखण्यासाठी स्थानिक प्रशासनाने आणि तेल कंपन्यांनी मोठ्याप्रमाणात होणा-या खरेदीवर लक्ष ठेवून अतिरिक्त साठेबाजी रोखावी. राज्यातील जिल्हानिहाय विक्रीच्या आकडेवारीनुसार दैनंदिन विक्रीत मोठी वाढ नोंदविण्यात आली आहे. राज्यात पेट्रोल विक्रीत सुमारे २३ टक्के; तर डिझेल विक्रीत तब्बल ५२ टक्के वाढ झाली आहे. अकोला येथे पेट्रोल विक्रीत ४४ टक्के, बुलढाणा येथे ४७ टक्के, जालना येथे ४९ टक्के; तर वर्धा येथे ४३ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे.

# अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांना व्यवहारिक मराठीचे धडे

**मुंबई / प्रतिनिधी-**राज्यातील अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषा सहज बोलता, समजता आणि दैनंदिन व्यवहारात प्रभावीपणे वापरता यावी यासाठी परिवहन विभागामार्फत व्यापक मराठी शिक्षण अभियान राबविण्यात येणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली. या उपक्रमात रिक्षा-टॅक्सी संघटनांनी सक्रिय सहभाग घेउन पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले. मंत्रालयात आयोजित करण्यात आलेल्या विशेष बैठकीत राज्यातील विविध रिक्षा व टॅक्सी संघटनांच्या प्रतिनिधींशी मराठी भाषा शिक्षण उपक्रमाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. मंत्री सरनाईक म्हणाले की, चालकांना व्यवहारिक मराठी आत्मसात करता यावी यासाठी दररोज चार तासांचे ऑफलाइन प्रशिक्षण दिले जाणार आहे. मराठी संभाषण कौशल्य विकसित करण्यावर विशेष भर देण्यात येणार असून ऑनलाइन प्रशिक्षणाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रशिक्षण अधिक प्रभावी आणि सुलभ व्हावे यासाठी विविध शाखा कार्यालयांमध्ये विशेष वर्ग आयोजित करण्यात येणार आहेत.

# पालघर अपघात : मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी 5 लाखांची मदत वितरित

**मुंबई / प्रतिनिधी-**पालघर जिल्ह्यातील धानिवरी येथे १८ मे रोजी झालेल्या भीषण अपघातात मृत्यू झालेल्या १३ नागरिकांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मान्यतेनंतर एकूण ६५ लाख रुपयांच्या मदतीची रक्कम जिल्हाधिकारी, पालघर यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे. घटनेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मृतांच्या वारसांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली होती. त्यानुसार मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत वितरित करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून संबंधित प्रशासकीय आदेशही जारी करण्यात आले आहेत. १८ मे २०२६ रोजी दुपारी सुमारे चार वाजण्याच्या दरम्यान डहाणू तालुक्यातील धानिवरी परिसरात टेम्पो आणि कंटेनरची समोरासमोर भीषण धडक होउन मोठा अपघात झाला होता. अपघात इतका गंभीर होता की टेम्पोचा पूर्ण चुराडा झाला. या दुर्घटनेत १३ जणांचा जागीच मृत्यू झाला, तर १७ जण जखमी झाले होते. घटनेची माहिती मिळताच स्थानिक प्रशासन, पोलीस आणि आरोग्य विभागाच्या पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदत व बचावकार्य सुरू केले. जखमींना त्वरित जवळील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर यांनी मृतांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबतचा प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला होता. त्यानुसार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत देण्यास तातडीने मंजुरी दिली. या प्रकरणी मृतांच्या वारसांची पडताळणी करून मंजूर मदत तातडीने वितरित करण्याबाबत जिल्हा प्रशासनास निर्देश देण्यात आले आहेत.

# पुढील 10 वर्षात एक हजार रोजगार निर्मिती होणार -मुख्यमंत्री फडणवीस

## राज्य शासन आणि ॲग्रेको इंडिया कंपनीसोबत सामंजस्य करार



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य शासन आणि अग्रेको इंडिया कंपनीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज झालेल्या सामंजस्य करारामुळे पुण्यात पुढील दहा वर्षांत सुमारे चारशे कोटी रुपयांची गुंतवणूक आणि सुमारे एक हजारावर थेट रोजगाराची निर्मिती होणार आहे. त्यासाठी या कंपनीला उत्कृष्ट कार्यपरिसर मिळण्याबरोबरच आवश्यक सर्व सहकार्य केले जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या सामंजस्य कराराप्रसंगी मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बळगण, गुंतवणूक सल्लागार कौस्तुभ धवसे, अग्रेको इंडियाचे संचालक सन्नी ठकरार, ग्रुप प्रमुख स्टीफन रेआ, व्यवस्थापकीय संचालक राहुल खरे, हेड ऑफ प्रोक्युअरमेंट अँड ग्लोबल सप्लाय सुनील देशमुख, व्यापार सल्लागार मार्क बिरेल, वरिष्ठ व्यापार सल्लागार प्रतीक्षा क्षीरसागर आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, पुणे आता ग्लोबल कॅपेबिलिटी सेंटर्सचे महत्त्वाचे केंद्र बनत असून या जीसीसी कॅपिटलमध्ये अग्रेको कंपनीचे स्वागत आहे. भारतात, विशेषतः महाराष्ट्रात, या कंपनीला उत्कृष्ट कार्यपरिसर मिळेल. पुणे येथील प्रकल्पासाठी शासनाकडून आवश्यक परवानग्या, नोंदणी, मंजुरी, सवलती आणि अन्य प्रशासकीय बाबींमध्ये विद्यमान धोरणांनुसार सहकार्य करण्यात येणार आहे. उद्योग, उर्जा, कामगार आणि खनिकर्म विभागांच्या माध्यमातून या गुंतवणुकीला गती देण्यात येणार आहे. अग्रेको इंडिया ही कंपनी उर्जा आणि तापमान नियंत्रण उपाययोजना या क्षेत्रात कार्यरत आहे. आज झालेल्या करारानुसार कंपनीतर्फे पुणे जिल्ह्यातील फुलगाव येथे अत्याधुनिक जागतिक अभियांत्रिकी व उत्पादन केंद्र उभारणार असून त्याचे काम यावर्षी मध्ये सुरु होणार आहे. हे केंद्र स्कॉटलंडबाहेरील ॲग्रेकोचे सर्वात महत्त्वाचे जागतिक अभियांत्रिकी आणि उत्पादन केंद्र असेल. या प्रकल्पामुळे स्थानिक पुरवठा साखळीला मोठी चालना मिळणार असून, सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांना जागतिक पुरवठा साखळीशी जोडण्याची संधी उपलब्ध होणार आहे; तसेच अत्याधुनिक उत्पादन, उर्जा उपकरण निर्मिती आणि प्रिसिजन इंजिनिअरिंग क्षेत्रात महाराष्ट्राची क्षमता अधिक मजबूत करण्यास हातभार लाभणार आहे. अग्रेको कंपनीचा कार्यक्षम उर्जा आणि शाश्वत तंत्रज्ञानावर आधारित उपाययोजना विकसित करण्यावर भर असणार आहे. विविध क्षेत्रांमध्ये उर्जा कार्यक्षमता वाढवणे, कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि हवामान बदलांविरोधातील प्रतिकारक्षमता मजबूत करण्यासाठी ॲग्रेकोकडून विशेष प्रयत्न करण्यात येणार आहे. त्याचबरोबरह राज्याच्या हवामान बदल कृती आराखड्याला पूरक ठरणा-या शाश्वत उर्जा आणि तापमान नियंत्रण प्रणालींच्या प्रसारासाठी सहकार्य करण्याचीदेखील ग्वाही कंपनीने दिली आहे.

# महिला क्रिकेटची वर्ल्ड चॅम्पियन हरमनप्रीतला पद्मश्री पुरस्कार मिळाला

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** सोमवारी राष्ट्रपती भवनात पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सर्वप्रथम दिवंगत चित्रपट अभिनेते धर्मेंद्र यांना पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित केले. त्यांच्या पत्नी अभिनेत्री-खासदार हेमा मालिनी यांनी हा सन्मान स्वीकारला. महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत हिला पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तिच्या नेतृत्वाखाली संघाने यावर्षी एकदिवसीय विश्वचषक जिंकला.



राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ६६ व्यक्तिमत्त्वांना पद्म पुरस्काराने सन्मानित केले. २०२६ मध्ये एकूण १३१ व्यक्तिमत्त्वांना पद्म पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत, त्यापैकी उर्वरित ६५ विजेत्यांना पुढील टप्प्यात सन्मानित केले जाईल, ज्याच्या तारखा अद्याप जाहीर झालेल्या नाहीत.

**समाजसेवका टेची गुबिन यांना पद्मश्री पुरस्कार प्रदान**- अरुणाचल प्रदेशातील प्रख्यात समाजसेवक टेची गुबिन यांना समाजसेवेतील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**ज्येष्ठ पत्रकार कैलाशचंद्र पंत यांना पद्मश्री पुरस्कार प्रदान-**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशभरात हिंदी भाषेच्या प्रसारासाठी दिलेल्या योगदानाबद्दल ज्येष्ठ पत्रकार कैलाशचंद्र पंत यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केले. पद्मश्री पुरस्कार मिळाल्यानंतर के. पझानिवेल यांनी पंतप्रधान मोदींच्या चरणांना स्पर्श केला. पुद्दुचेरीचे सिलंबमपटू के. पझानिवेल यांना या पारंपरिक युद्धकलेतील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांनी पंतप्रधान मोदींच्या चरणांना स्पर्श केला.

**यूजीसीचे माजी अध्यक्ष मामीडाला जगदेश कुमार यांना पद्मश्री पुरस्कार प्रदान-** यूजीसीचे माजी अध्यक्ष मामीडाला जगदेश कुमार यांना साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**पाच जणांना पद्मविभूषण पुरस्कार-**दिवंगत अभिनेते धर्मेंद्र, सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश के. टी. थामस आणि कम्युनिस्ट नेते व केरळमचे माजी मुख्यमंत्री व्ही. एस. अच्युतानंदन यांच्यासह पाच व्यक्तिमत्त्वांना पद्मविभूषण पुरस्कारासाठी घोषित करण्यात आले आहे.

**शिबू सोरेन, अलका याज्ञिक यांच्यासह १३ मान्यवरांना पद्मभूषण पुरस्कार-** प्रसिद्ध गायिका अलका याज्ञिक, झारखंडचे दिवंगत माजी मुख्यमंत्री शिबू सोरेन आणि उत्तराखंडचे माजी मुख्यमंत्री भगतसिंग कोश्यारी यांचा पद्मभूषण पुरस्कार स्वीकारणा-या १३ व्यक्तींमध्ये समावेश आहे.

**रोहित शर्मा-हरमनप्रीतसह ११३ जणांना पद्मश्री-** अभिनेता आर. माधवन (माधवन रंगनाथन), क्रिकेटपटू रोहित शर्मा, पॅरा-ॲथलीट प्रवीण कुमार, महिला क्रिकेट संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर आणि हाकीपटू सविता पुनिया यांचा पद्मश्रीसाठी निवड झालेल्या ११३ व्यक्तींमध्ये समावेश आहे.

# बालभवनच्या नूतनीकृत इमारतीचे लोकार्पण



**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईच्या चर्नी रोड परिसरातील महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवनाच्या परिसरात मुक्त विज्ञान उद्यान उभारण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते बालभवनच्या नूतनीकृत इमारतीचे लोकार्पण करण्यात आले. त्यांनतर मध्यमांशी बोलताना त्यांनी ही घोषणा केली. उद्घाटन प्रसंगी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, कौशल्य, रोजगार आणि नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार दीपक केसरकर, मुंबईच्या महापौर रितू तावडे, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण विभागाचे आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह, बालभवनच्या संचालक नीता पाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. बालभवनच्या नूतन वास्तूची पाहणी केल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महानगरपालिका शाळांमधील अधिकाधिक विद्यार्थ्यांना या केंद्राशी जोडण्यासाठी महापौर रितू तावडे यांनी पुढाकार घ्यावा. यातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी हातभार लागेल.

यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, बालभवन ही केवळ इमारत नसून लाखो मुलांच्या स्वप्नांना आकार देणारे प्रेरणास्थान आहे. नवीन वास्तूमुळे महाराष्ट्रातील बालकांच्या कल्पकतेला नवे पंख मिळतील. मुलांना बालभवनाच्या माध्यमातून खेळ, गायन, नृत्य, चित्रकला, शिल्पकला आणि विविध सृजनशील उपक्रमांद्वारे स्वतःला शोधण्याची संधी येथे मिळते; तसेच त्यांना मातीशी, रंगांशी आणि संगीताशी जोडण्याचे महत्त्वपूर्ण कार्य बालभवन गेली ७५ वर्षे सातत्याने काम करत आहे. शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी सांगितले की, ४ ते १६ वयोगटातील मुलांच्या कल्पनाशक्तीला आणि सृजनशीलतेला वाव देण्याचे कार्य ही संस्था सातत्याने करत आहे. नूतनीकरण करण्यात आलेल्या या इमारतीत तळमजल्यावर अत्याधुनिक प्रेक्षकगृह आणि सुसज्ज ग्रंथालय तयार करण्यात आले आहे. पहिल्या मजल्यावर नृत्य दालन, नाट्य कक्ष आणि संगीत कक्ष आहे. दुस-या मजल्यावर विद्यार्थ्यांच्या सादरीकरणासाठी व्यासपीठ; तसेच मूर्तिकला आणि चित्रकला दालने उभारण्यात आली आहेत. या वास्तूमध्ये १०० विद्यार्थी क्षमतेची तीन सुसज्ज सभागृहे आहेत. एकाच वेळी ५०० विद्यार्थी विविध कलांचे प्रशिक्षण घेउ शकतील. दररोज ५०० विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षण क्षमतेनुसार महिन्याला सुमारे १० हजार, तर वर्षभरात जवळपास १ लाख विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन मिळू शकणार आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात एक बालभवन सुरू करण्याचा शालेय शिक्षण विभागाचा मानस आहे, असे शालेय शिक्षण मंत्री भुसे यांनी सांगितले. यावेळी सर जे. जे. कला महाविद्यालय आणि महाराष्ट्र राज्य जवाहर बालभवन यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. बालभवनच्या संचालक नीता पाटील आणि सर जे. जे. कला महाविद्यालयाचे संचालक किशोर इंगळे; तसेच कुलसचिव शशिकांत काकडे यांच्यात सामंजस्य कराराच्या प्रतींचे आदानप्रदान करण्यात आले. या करारामुळे विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे कला प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## मानवाधिकारांचे मारेकरी

**बलुचिस्तानातील वाढती बंडखोरी आणि तिथे सातत्याने होणारे बॉंबस्फोट यांमुळे पाकिस्तान पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चेत आला आहे. बलुचिस्तानच्या क्वेट्टा येथील रेल्वे स्थानकावर जाफर एक्सप्रेसला लक्ष्य करून करण्यात आलेल्या आत्मघातकी फिदायीन हल्ल्यात २४ जण ठार, तर १०० हून अधिक लोक जखमी झाले. या भीषण रक्तपातानंतर नेहमीप्रमाणे स्वतःचे अपयश झाकण्यासाठी आणि जगाचे लक्ष भरकटवण्यासाठी पाकिस्तानने भारतावर आरोप करण्याचा आपला 'कांगावखोर' उद्योग सुरू केला आहे. आपल्या देशात होणाऱ्या प्रत्येक दहशतवादी हल्ल्यामागे भारताचा हात असतो, हा पाकिस्तानचा सोयीस्कर आणि जुनाच आरोप आहे; परंतु या आरोपांतील फोलपणा आता साऱ्या जगाला समजला आहे. वास्तविक पाहता, पाकिस्तान आज ज्या दहशतवादाच्या आगीत होरपळत आहे, ती आग त्याने स्वतःच लावलेली आहे. अनेक दशके पाकिस्तानाने दहशतवाद्यांना आपल्या मांडीवर बसवून पोसले, त्यांना अर्थसाह्य केले आणि त्यांचा वापर भारताविरुद्ध छुपे युद्ध लढण्यासाठी केला. २००८ चा मुंबईवरील भीषण हल्ला असो की पहेलगाममधील कारवाया, या सर्व नापाक कृत्यांचा सूत्रधार पाकिस्तानच होता. परंतु, भारतात केंद्रस्थानी नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यानंतर भारताने पाकिस्तानला त्याच्याच भाषेत चोख आणि कठोर धडा शिकवला. आता तर पाकिस्तानच्या याच 'पेराल ते उगवेल' या न्यायानुसार, त्यांनी पोसलेले भस्मासूर आता त्यांच्याच अंगावर उलटले आहेत. बलुचिस्तानातील स्थानिक बंडखोर संघटना आता पाक लष्कराला त्यांच्याच भाषेत उत्तर देत असल्याने पाक सरकारच्या नाकातोंडात पाणी गेले आहे. बलुचिस्तान हा भौगोलिकदृष्ट्या पाकिस्तानचा सर्वात मोठा, परंतु आर्थिक-सामाजिकदृष्ट्या अत्यंत मागास आणि गरीब प्रांत आहे. १९४८ मध्ये कलात प्रांताच्या विलीनीकरणापासूनच या भागात असंतोष धुमसत आहे. पाकिस्तान सरकारने बलुचिस्तानला कधीही आपल्या देशाचा मुख्य भाग मानलेच नाही. या प्रांताला हक्काची स्वायत्तता आणि प्रांतीय प्रतिनिधित्व देण्याऐवजी पाक लप्कराने तिथल्या सोन्याच्या आणि वायूच्या नैसर्गिक संसाधनांची उघड लूट केली. बलुचिस्तानातील 'ग्वादर' बंदराचा ताबा चीनला देऊन तिथे उभारण्यात येत असलेल्या 'सीपेक' प्रकल्पाने आगीत तेल ओतण्याचे काम केले आहे. या प्रकल्पातून बलुच जनतेला हद्दपार केले जात असून, स्थानिकांच्या रोजगारावर डल्ला मारला जात आहे. त्यामुळेच संतप्त झालेल्या बलुच बंडखोरांनी आता चिनी नागरिकांना आणि पाक लष्कराला थेट लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे. या प्रांतात मोठ्या प्रमाणावर होणारी मानवी हक्कांची पायमल्ली, निष्पाप नागरिकांचे होणारे अपहरण आणि विकासाचा संपूर्ण अभाव यांमुळेच तिथे 'बलुच लिबरेशन आर्मी' सारख्या संघटनांची बंडखोरी टोकाला पोहोचली आहे. भारताने अनेकदा सुनावले आहे की, पाकिस्तानाने बलुच लोकांवर लष्करी बळाचा वापर करण्यापेक्षा त्यांच्या विकासाकडे आणि मानवी हक्कांकडे लक्ष द्यावे; परंतु स्वतः आंतरराष्ट्रीय कर्जाच्या आणि दिवाळखोरीच्या गर्तेत लोळत असलेल्या पाक सरकारकडे बलुचिस्तानचा विकास करण्याची ना दानत आहे ना आर्थिक क्षमता. भारत आणि पाकिस्तान एकाच वेळी स्वतंत्र झाले. आज भारत आर्थिक आणि तांत्रिक प्रगती करत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे; तर दुसरीकडे पाकिस्तान केवळ भारताबद्दलच्या द्वेषामुळे गरिबी, अस्मानी महागाई आणि उपासमारीच्या संकटाशी झुंजत नामशेष होण्याच्या कगारवर पोहोचला आहे. भारताने बलुचिस्तानातील अंतर्गत हिंसेत आपला सहभाग असल्याचा पाकचा आरोप नेहमीच फेटाळून लावला आहे. उलट, संयुक्त राष्ट्रांच्या व्यासपीठावरून भारताच्या प्रतिनिधींनी पाकिस्तानातील मानवाधिकार उल्लंघनाचे वाभाडे काढत पाकला आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेकदा मान खाली घालण्यास भाग पाडले आहे. काश्मीरच्या मुद्द्यावरून भारताला कोंडीत पकडण्यासाठी पाक नेहमी बलुचिस्तानचा पोरकटपणे वापर करण्याचा प्रयत्न करतो, मात्र भारताने नेहमीच 'बलुचिस्तान हा पाकिस्तानचा अंतर्गत प्रश्न आहे' अशी परिपक्व आणि मुत्सद्दी भूमिका घेतली आहे.या ताज्या स्फोटानंतर दोन्ही देशांतील द्विपक्षीय संबंध अधिकच ताणले जाण्याची शक्यता आहे. पाकिस्तानची गुप्तहेर संघटना 'आयएसआय' आणि त्यांचे लष्कर नेहमीप्रमाणे 'रॉ' वर खापर फोडून सीमेवर अतिरिक्त सैन्य तैनात करेल, ज्यामुळे सीमाभागात हाय-अलर्टची स्थिती निर्माण होईल. यात आणखी एक मोठा आंतरराष्ट्रीय धोका आहे; पाकिस्तान या स्फोटाचे भांडवल करून जागतिक समुदायासमोर 'आम्हीच दहशतवादाचे बळी आहोत' असे रडगाणे गाऊन पाश्चात्त्य देशांकडून आर्थिक मदत लाटण्याचा प्रयत्न करेल. अशा वेळी भारताला जागतिक स्तरावर अत्यंत सावध आणि आक्रमक राहावे लागेल. पाकिस्तानचा पाठीराखा असलेल्या चीनच्या भूमिकेकडेही भारताला बारकाईने लक्ष ठेवावे लागेल, कारण चीन या परिस्थितीचा फायदा घेऊन भारताची कोंडी करण्याचा किंवा सीमेवर कुरापती काढण्याचा प्रयत्न करू शकतो. पाकिस्तानसारखा पाताळयंत्री, लबाड आणि नीच प्रवृत्तीचा शेजारी लाभल्यामुळे भारताला मुत्सद्दी आणि लष्करी अशा दोन्ही आघाड्यांवर चोख सावधगिरी बाळगावीच लागेल, हेच या घटनेचे मुख्य फलित आहे. या संपूर्ण प्रकरणामागे पाकिस्तानी लष्कराचा स्वतःचा स्वार्थ दडलेला आहे. पाकिस्तानात जेव्हा जेव्हा अन्नधान्याची टंचाई, महागाई आणि राजकीय अस्थिरता तीव्र होते, तेव्हा तेथील 'रावलपिंडी' (लष्करी मुख्यालय) जनतेचे लक्ष विचलित करण्यासाठी जाणीवपूर्वक भारतद्वेषाचा आणि बलुच बंडखोरीचा ठ्ठमानवाधिकारांचे मारेकरी बमानवाधिकारांचे मारेकरी बागुलबुवा उभा करते. स्वतःच्याच नागरिकांवर लढाऊ विमाने आणि तोफांचा मारा करणारे पाकिस्तानी लष्कर आज मानवाधिकारांचे मारेकरी बनले आहे.**

# रुपया सावरणार कसा?

**नवीन आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्याच महिन्यात म्हणजेच एप्रिलमध्ये डॉलरचा दर ९२.८० रुपयांवरून थेट ९५ रुपयांवर जाऊन पोहोचला आणि मे महिन्यामध्ये तो ९६च्या खाली गेला. याच तीव्र घसरणीमुळे भारताचे जागतिक अर्थव्यवस्थेतील चौथे स्थान घसरून आपण सहाव्या स्थानावर आलो आहोत. सध्याच्या परिस्थितीत केवळ रुपयात मोजल्या जाणाऱ्या जीडीपीची वाढ पुरेशी नाही, तर डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य जितके मजबूत ठेवता येईल, तितके ते ठेवणे आवश्यक आहे.**

आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या अखेरीस बाजारपेठेतील विनिमय दरांच्या आधारे भारताने जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था म्हणून झेप घेतली होती. भारताचे ढोबळ राष्ट्रीय उत्पादन (नॉमिनल जीडीपी) ३५७ लाख कोटी रुपये इतके अंदाजण्यात आले होते. त्यावेळी प्रतिडॉलर ८५.४० रुपयांच्या विनिमय दरानुसार भारताच्या अर्थव्यवस्थेचे एकूण मूल्य ४.१८ ट्रिलियन डॉलरवर पोहोचले होते. भारताने जपानच्या ४.१० ट्रिलियन डॉलरच्या जीडीपीला मागे टाकत जागतिक पातळीवर चौथे स्थान पटकावले होते आणि भारताचे पुढील ध्येय जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याचे होते; परंतु याच दरम्यान घडलेल्या दोन विशिष्ट घडामोडींमुळे भारताचा हा जागतिक क्रम दोन अंकांनी घसरून आपण तात्पुरते सहाव्या स्थानावर आलो आहोत.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने (आयएमएफ) एप्रिल २०२६ मध्ये जाहीर केलेल्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक आऊटलुक'नुसार, जपानचा जीडीपी ४.३८ ट्रिलियन डॉलर आणि ब्रिटनचा जीडीपी ४.२६ ट्रिलियन डॉलर नोंदवला गेला आहे, तर भारताचा जीडीपी घसरून ४.१५ ट्रिलियन डॉलरवर आला आहे. याचे पहिले कारण म्हणजे, भारताच्या जीडीपी मोजणीचे आधारभूत वर्ष (बेस इयर) नुकतेच २०११-१२ वरून बदलून २०२२-२३ करण्यात आले. या तांत्रिक बदलामुळे २०२५-२६ चा भारताचा जीडीपी ३५७ लाख कोटी रुपयांवरून पुनर्मूल्यांकित होऊन ३४५ लाख कोटी रुपये असा कमी निश्चित झाला; मात्र या सांख्यिकीय बदलापेक्षाही भारताची जागतिक क्रमवारी घसरण्यामागचे सर्वात मुख्य आणि वास्तविक कारण म्हणजे, रुपयाचे झालेले अवमूल्यन हेच आहे. अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील वाढत्या भूराजकीय संघर्षामुळे परकीय चलन बाजारात डॉलरच्या तुलनेत रुपयाच्या मूल्यात मोठी घसरण झाली आहे.

आधारभूत वर्षातील बदल ही केवळ एक प्रशासकीय किंवा तांत्रिक प्रक्रिया आहे; पण रुपयाची घसरण ही देशाच्या आंतरराष्ट्रीय पत आणि आर्थिक स्थितीवर थेट परिणाम करणारी बाब आहे. आर्थिक क्षेत्रातील काही तज्ज्ञांच्या मते, भारताची चालू खात्यातील तूट (बॅलन्स ऑफ पेमेंट डेफिसिट) याच गतीने वाढत राहिली आणि परदेशी संस्थागत गुंतवणूकदार (एफआयआय) भारतीय शेअर बाजारातून याच वेगाने आपला पैसा काढून घेत राहिले, तर रुपया आणखी खाली घसरू शकतो. अशा परिस्थितीत डॉलरच्या परिभाषेत मोजला जाणारा भारताचा जीडीपी आणखी आकुंचन पावेल आणि जागतिक पातळीवरील आपला क्रमांक अजून खाली जाण्याचा धोका निर्माण होईल.

गेल्या काही वर्षांत भारताचा 'नॉमिनल जीडीपी' वेगाने वाढला आहे. २०१४ ते २०२६ या काळात देशाच्या जीडीपीने सरासरी १० टक्के वार्षिक वृद्धीदर राखला आहे; परंतु याच काळात अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयाचे दरवर्षी सरासरी ३.५ ते ४.० टक्क्यांनी अवमूल्यन झाले आहे. परिणामी, जेव्हा भारताचा जीडीपी डॉलरच्या मूल्यामध्ये मोजला जातो, तेव्हा त्याचा खरा वृद्धीदर अवघा ६.२ ते ७.० टक्क्यांच्या दरम्यानच मर्यादित राहतो. याचा अर्थ भारताला जागतिक स्तरावर एक आर्थिक महासत्ता म्हणून स्वतःची प्रतिष्ठा निर्माण करायची असेल, तर रुपयाची ही सातत्यपूर्ण घसरण कोणत्याही स्थितीत थांबवणे अत्यंत अनिवार्य आहे. मागील आकडेवारीचा वेध घेतला, तर २०२३-२४ मध्ये रुपयाची घसरण १.२ टक्के आणि २०२४-२५ मध्ये १.६ टक्के होती. तसेच २०२५-२६ च्या पहिल्या तीन तिमाहीत ती २.२ टक्के इतकी मर्यादित होती; परंतु जानेवारी ते मार्च २०२६ या एकाच तिमाहीत हा घसरणीचा वेग एकट्या तिमाहीपुरता २.० टक्क्यांवर पोहोचला. नवीन आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या पहिल्याच महिन्यात म्हणजेच एप्रिलमध्ये डॉलरचा दर ९२.८० रुपयांवरून थेट ९५ रुपयांवर जाऊन पोहोचला आणि मे महिन्यामध्ये तो ९६च्या खाली गेला. याच तीव्र घसरणीमुळे भारताचे जागतिक अर्थव्यवस्थेतील चौथे स्थान घसरून आपण सहाव्या स्थानावर आलो आहोत. सध्याच्या परिस्थितीत केवळ रुपयात मोजल्या जाणाऱ्या जीडीपीची वाढ पुरेशी नाही, तर डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य जितके मजबूत ठेवता येईल, तितके ते ठेवणे आवश्यक आहे.

### रुपया मजबूत करण्याचे मार्ग

सध्याच्या जागतिक आर्थिक व्यवस्थेत कोणत्याही चलनाचे मूल्य हे बाजारपेठेतील मागणी आणि पुरवठ्याच्या नियमांवर ठरत असते. भारतासंदर्भात रुपयाची किंमत ही डॉलरच्या देशातील पुरवठ्यावर आणि मागणीवर अवलंबून असते. आपल्याकडे डॉलरचा पुरवठा हा वस्तू व सेवांची निर्यात, अनिवासी भारतीयांकडून



(एनआरआय) देशात पाठवला जाणारा पैसा (रेमिटन्सेस) आणि परकीय गुंतवणूक (थेट परकीय गुंतवणूक - एफडीआय आणि परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूक - एफपीआय) याद्वारे होत असतो.

परंतु, आपण एका महत्त्वाच्या मुद्द्याकडे दुर्लक्ष करतो, तो म्हणजे परकीय गुंतवणुकीच्या बदल्यात देशाबाहेर जाणारा प्रचंड निधी. विदेशी कंपन्या भारतातून लाभांश (डिव्हिडंड), व्याज, रॉयल्टी आणि तांत्रिक शुल्काच्या (टेक्निकल फी) माध्यमातून मोठा पैसा मायदेशी पाठवत असतात. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये अशाप्रकारे देशाबाहेर गेलेला निधी १०१.८ अब्ज डॉलर इतका अवाढव्य होता, तर याउलट भारताला मिळालेला परतावा केवळ ५३.४ अब्ज डॉलर होता. याचा अर्थ, केवळ या एकाच घटकामुळे देशातून ४८.४ अब्ज डॉलरचा निव्वळ निधी परदेशात वाहून गेला.

आज भारत रुपयाच्या तीव्र अस्थिरतेचा सामना करत आहे. यामुळे देशांतर्गत महागाई वाढण्याचा आणि जागतिक स्तरावर भारताची प्रतिष्ठा कमी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. ही अस्थिरता रोखण्यासाठी आपण त्वरित आणि कठोर पावले उचलणे गरजेचे आहे. सर्वप्रथम देशात होणाऱ्या अनावश्यक आयातीवर अतिरिक्त सीमाशुल्क आणि नॉनटॅरिफ निर्बंध लादून ती रोखली पाहिजे. परकीय कंपन्यांकडून भारतीय बाजारपेठेत केल्या जाणाऱ्या 'डंपिंग'मुळे अनेक अनावश्यक वस्तूंची आयात वाढत आहे. याला चाप लावणे गरजेचे आहे. दुसरे म्हणजे, परकीय चलनाच्या बाजारातील सट्टेबाजीला कठोरपणे रोखले पाहिजे आणि परदेशी संस्थागत गुंतवणूकदारांच्या (एफआयआय) अनिर्बंध व्यवहारांवर मर्यादा आणल्या पाहिजेत. तिसरे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, परकीय थेट गुंतवणुकीला (एफडीआय) सरसकट परवानगी न देता, ती केवळ उच्च तंत्रज्ञान (हायटेक्नॉलॉजी) क्षेत्र आणि अत्यंत महत्त्वाच्या पायाभूत आर्थिक उपक्रमांपुरतीच मर्यादित ठेवली पाहिजे; जेणेकरून भविष्यात होणारा परकीय चलनातील नफ्याचा निचरा थांबेल आणि रुपयाला दीर्घकालीन स्थैर्य लाभेल. जागतिक पटलावर भारताची मान उंचावण्यासाठी रुपयाचे बळकटीकरण ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे.

पंतप्रधानांनी देशातील १४० कोटी जनतेला आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि स्वदेशीचा स्वीकार करण्यासाठी जे सात सूत्री आवाहन केले आहे, त्याचे आम्ही मनापासून स्वागत करतो. ही वेळ राजकीय चिखलफेक करण्याची किंवा दूरचित्रवाणीवर राजकीय आरोप-प्रत्यारोप करण्याची नाही. जर रुपयाचे मूल्य वाचले आणि आपण मोठ्या आर्थिक संकटातून देशाला बाहेर काढू शकलो, तर त्याचा फायदा कोणत्याही एका नेत्याला किंवा पक्षाला होणार नाही. रुपया हे भारताचे राष्ट्रीय चलन आहे. तो मोदींचा नाही, भारताचा आहे. त्याच्या भावातील स्थैर्याचा फायदा प्रत्येक भारतीयाच्या बचतीला आणि देशाच्या भविष्याला होणार आहे. इतक्या वर्षांत रुपयाची घसरण झाली, तेलाचे दर वाढले किंवा महागाई भडकली, तेव्हा एकाही नेत्यामध्ये जनतेच्या डोळ्यात डोळे घालून देशासाठी काहीतरी त्याग करण्याचे आवाहन करण्याचे धैर्य नव्हते. पंतप्रधानांचे हे आवाहन म्हणजे आधुनिक काळातील 'स्वदेशीची' हाक आहे, ज्यासाठी आमची संघटना गेल्या ३२ वर्षांपासून संघर्ष करत आहे.

महात्मा गांधींच्या काळातील स्वदेशीची प्रतीके वेगळी होती; तेव्हा चरखा, खादी आणि परदेशी कापडावर बहिष्कार ही स्वावलंबनाची साधने होती. आजच्या काळातील स्वदेशीची प्रतीके बदलली आहेत. सौरऊर्जेवर चालणाऱ्या इलेक्ट्रिक गाड्या, ग्रीन हायड्रोजन, अणुऊर्जेतील नवनवीन संशोधन, रासायनिक खतांना फाटा देऊन केलेली सेंद्रिय शेती आणि कोरोना काळात भारताने स्वतः तयार केलेली लस किंवा काही महिन्यांत बनवलेले ६० हजार व्हेंटिलेटर्स; हे आजच्या युगातील 'चरखे' आहेत. साधनसामग्री बदलली तरी मूळ विचार तोच आहे - आपल्याला आपल्या गरजा स्वतःच्या बळावर आणि संसाधनांवर पूर्ण कराव्या लागतील. परकीय भांडवल, परकीय वस्तू किंवा परकीय औदार्यावर आपण जगू शकत नाही, हाच स्वदेशीचा खरा संदेश आहे आणि तोच भारताला व रुपयाला शाश्वत आधार देणार आहे.

कच्च्या तेलाच्या किमतीचा भार सरकार किंवा अर्थसंकल्प प्रदीर्घ काळासाठी स्वतःवर घेऊ शकत नाही. अर्थसंकल्पातून इंधन दरवाढीचा प्रत्येक रुपया पचवला गेला, तर राजकोषीय तूट (फिस्कल डेफिसिट) प्रचंड वाढेल आणि त्याचा अंतिम बोजा कोणत्या ना कोणत्या मार्गाने जनतेवरच पडेल. तथापि, माझा असा अंदाज आहे की, तेलाचे हे चढे दर फार काळ टिकणार नाहीत. कारण, जगभरात आता पर्यायी ऊर्जेचा वापर वेगाने वाढू लागला आहे. कच्च्या तेलाव्यतिरिक्त भारताचे परकीय चलन सर्वाधिक खर्च होते ते खाद्यतेल आयातीवर. देशाचे खाद्यतेल आयातीचे बिल वर्षाला सुमारे १८ ते २० अब्ज डॉलरच्या घरात आहे. कडधान्ये (डाळी) आणि खाद्यतेल या दोन क्षेत्रांत आपले परदेशावरील अवलंबित्व मोठे होते; पण योग्य धोरणांमुळे देशांतर्गत कडधान्य उत्पादनात ५६ टक्क्यांची मोठी वाढ झाली असून, डाळींची आयात आता बरीच कमी झाली आहे; मात्र पाम तेलासारख्या स्वस्त आणि आरोग्याला हानिकारक असलेल्या खाद्यतेलाच्या आयातीकडे आपण दीर्घकाळ दुर्लक्ष केले. ऊर्जा क्षेत्राचा विचार केला, तर भारत पुढील ५ ते ६ वर्षांत लक्षणीय स्वावलंबन पूर्ण करू शकतो. पेट्रोलमध्ये इथेनॉलचे मिश्रण आता १५ ते २० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे; पण त्याहून मोठी संधी बायोगॅस (जैववायू) क्षेत्रात आहे. सध्या आपण आपल्या एकूण क्षमतेच्या केवळ ५ टक्के बायोगॅस वापरत आहोत. सवाई माधोपूर येथील एका शेतामध्ये दररोज ३ टन शेणापासून बायोगॅस तयार केला जातो. यामुळे त्यांचा दरमहा १.५ लाख रुपयांचा वीज आणि इंधनाचा खर्च शून्य झाला आहे. शिवाय त्यातून मिळणारे सेंद्रिय खत शेतकरी विकत घेत आहेत. आयआयटी दिल्लीचे प्राध्यापक विजेंद्र विजय गेल्या २५ वर्षांपासून स्वतःची कार बायोगॅसवर चालवत आहेत. या तंत्रज्ञानाची क्षमता सिद्ध झाली आहे. आता गरज आहे ती केवळ राजकीय इच्छाशक्तीची आणि मोठ्या प्रमाणावर अंमलबजावणीची.

गेल्या दशकात पारंपारिक बल्ब बदलून 'एलईडी'चा वापर वाढल्यामुळे आज आपल्याकडे विजेची मोठी बचत झाली आहे. या अतिरिक्त विजेचा वापर घरगुती स्वयंपाकाच्या गॅसला पर्याय म्हणून करता येऊ शकतो. यामुळे एलपीजी आयातीचा खर्च वाचेल. मी स्वतः गेल्या तीन वर्षांपासून इलेक्ट्रिक कार वापरत असून, महिन्याला २५ हजार रुपयांची इंधन बचत करत आहे. हायवेवर आता सौरऊर्जेवर चालणारी चार्जिंग स्टेशन्स उभारली जात आहेत. तसेच, चीनमधून येणाऱ्या सोलर पॅनेल्सवर निर्बंध घातल्यामुळे देशांतर्गत कंपन्या आता स्वतः भारतातच सोलर सेल्स तयार करत आहेत.

**डॉ. अश्वनी महाजन**

# कसा असेल यंदाचा मान्सून?

**पाऊस कमी पडण्याचा अंदाज चिंताजनक ठरतो. अंदाज खरा ठरून पाऊस कमी पडल्यास शेतकरी, सरकार, उद्योग आणि वित्तीय संस्था आदी घटक अडचणीत येतात. त्यामुळे या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी समन्वयित आणि दीर्घकालीन उपाययोजना आवश्यक आहेत. योग्य नियोजन, संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि तंत्रज्ञानाचा योग्य अवलंब यांद्वारे या संकटाचे परिणाम कमी करता येऊ शकतात.**

स्कायमेट आणि भारतीय हवामान विभागाचे येत्या पावसाळ्याविषयी जाहीर झालेले अंदाज बहुतांश सारखेच असून सामान्यपेक्षा कमी पाऊस पडणार आहे. त्याची तुलना लगेच २०१४-१५ च्या दुष्काळी वर्षाशी व्हायला लागली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन महिन्यांपासून कमी पावसाच्या अंदाजानुसार खरीप हंगामाचे नियोजन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. राज्यात खरिपाखालचे क्षेत्र पाच लाख हेक्टरने कमी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. मे महिन्यात पावसाचा आणखी एक अंदाज येणार आहे. त्यातच पाऊस १५ दिवस अगोदर महाराष्ट्रात दाखल होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला. कमी काळात जास्त पाऊस झाला, तरी त्याचा उपयोग नसतो. कमी पावसाचा अंदाज व्यक्त झाला, की त्याचे पडसाद केवळ हवामानापुरते मर्यादित राहत नाहीत, तर थेट देशाच्या अर्थव्यवस्थेवर उमटतात.

भारतासारख्या कृषिप्रधान देशात मॉन्सून हा अर्थचक्राचा कणा मानला जातो. त्यामुळे मॉन्सून कमी होण्याची शक्यता व्यक्त होताच शेतकरी, धोरणकर्ते आणि रिझर्व्ह बँक यांच्यासह संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेल्यांच्या मनात चिंता निर्माण होते. भारतामध्ये सुमारे पन्नास टक्क्यांहून अधिक शेती अजूनही पावसावर अवलंबून आहे. त्यामुळे पावसाचा अंदाज कमी असल्यास सर्वप्रथम फटका बसतो, तो शेतकऱ्यांना. पेरणी उशिरा होते, काही ठिकाणी पेरणीच होत नाही, तर काही भागात उगवलेले पीक टिकवणे कठीण जाते. पाण्याअभावी उत्पादन घटते आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर याचा थेट परिणाम होतो.

शेती उत्पादन कमी झाल्यास ग्रामीण भागातील खरेदीशक्ती घटते. ती संपूर्ण अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची असते. ग्रामीण मागणी कमी झाली, की उद्योग, सेवा आणि इतर क्षेत्रांवरही परिणाम दिसून येतो. अडचणीच्या काळात ग्रामीण मागणीनेच अर्थव्यवस्था सावरली आहे, हे दिसून आले आहे. मॉन्सून कमी राहण्याचा दुसरा मोठा परिणाम अन्नधान्याच्या उत्पादनावर होतो. धान्य, डाळी, तेलबिया, ऊस



यांसारख्या पिकांचे उत्पादन घटल्यास बाजारात पुरवठा कमी होतो. पुरवठा कमी आणि मागणी कायम असल्यामुळे किमती वाढतात. परिणामी महागाईला चालना मिळते. विशेषतः अन्नमहागाई वाढल्यास सर्वसामान्य नागरिकांवर परिणाम होतो. घरगुती बजेट बिघडते आणि खर्चाचे नियोजन बदलावे लागते. महागाई वाढल्यास रिझर्व्ह बँकेसारख्या केंद्रीय बँकेसमोर मोठे आव्हान उभे राहते. महागाई नियंत्रणात ठेवण्यासाठी व्याजदर वाढवावे लागतात किंवा इतर कडक आर्थिक धोरणे अवलंबावी लागतात; मात्र व्याजदर वाढल्यास उद्योगांना कर्ज महाग होते. गुंतवणूक कमी होते आणि आर्थिक वाढीचा वेग मंदावू शकतो. त्यामुळे एका बाजूला महागाई नियंत्रित करणे आणि दुसऱ्या बाजूला आर्थिक वाढ टिकवणे, हे संतुलन राखणे कठीण बनते. वित्तीय तूट नियंत्रणात राखण्याचा आणि महागाईचा परस्परांशी संबंध असल्याने त्याचा पावसाशीही संबंध येतो.

शासनकर्त्यांसाठी ही परिस्थिती आव्हानात्मक असते. कमी पावसामुळे शेती संकटात आल्यास सरकारला शेतकऱ्यांसाठी मदत योजना जाहीर कराव्या लागतात. कर्जमाफी, अनुदान, पीकविमा भरपाई यांसारख्या उपाययोजना कराव्या लागतात. तसेच पाणीटंचाई असलेल्या भागात टँकरद्वारे पाणीपुरवठा, जलसंधारण प्रकल्प, सिंचन सुविधा यावर अतिरिक्त खर्च करावा लागतो. या सर्वांमुळे सरकारचा महसूल ताणला जातो आणि वित्तीय तुटीवर दबाव वाढतो. कमी मॉन्सूनचा परिणाम आयात-निर्यात धोरणावरही होतो. देशांतर्गत उत्पादन कमी झाल्यास अन्नधान्य आणि इतर कृषी वस्तूंची आयात वाढवावी लागते. उदाहरणार्थ, डाळी, खाद्यतेल किंवा साखरेच्या बाबतीत उत्पादन घटल्यास आयातीवर अवलंबित्व वाढते. यामुळे परकीय चलनाचा खर्च वाढतो आणि व्यापार तूट वाढण्याची शक्यता निर्माण होते. दुसरीकडे, काही पिकांचे उत्पादन घटल्यामुळे निर्यात कमी करावी लागते किंवा त्यावर निर्बंध घालावे लागतात; जेणेकरून देशांतर्गत पुरवठा कायम राहील. याचा परिणाम जागतिक बाजारातील भारताच्या प्रतिमेवरही होऊ शकतो. ऊर्जा क्षेत्रावरही मॉन्सूनचा परिणाम होतो. जलविद्युत प्रकल्प पावसावर अवलंबून असल्याने पाणीसाठा कमी असल्यास वीजनिर्मिती घटते. परिणामी, इतर स्त्रोतांवर, विशेषतः कोळसा आणि गॅसवर अवलंबित्व वाढते. यामुळे ऊर्जा खर्च वाढतो आणि उद्योगांवर परिणाम होतो. तसेच पाणीटंचाईमुळे शहरांमध्येही पाणीपुरवठ्यावर ताण येतो. त्यामुळे नागरी जीवनावर परिणाम होतो.

पावसाविषयीचा अंदाज व्यक्त झाल्यानंतर नवी मुंबईसह राज्यातील अन्य शहरात पाण्याच्या वितरणात काही प्रमाणात कपात सुरू झाली. लातूरला मिरजहून पाणी दिल्याच्या आठवणी आणि कोपरगाव, मनमाडसारख्या शहरांमध्ये महिन्यातून एकदाच पाणी असे निर्णयही लगेच पुढे येतात. शहरात टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याला मर्यादा येतात. टँकर लॉबी कमी पावसाचा कसा फायदा घेते आणि त्यातून कसे आणि किती घोटाळे होतात, याबाबतच्या तक्रारी नवीन नाहीत. मॉन्सून कमी असल्यास ग्रामीण रोजगारावरही परिणाम होतो. शेतीतील कामे कमी झाल्यामुळे मजुरांना रोजगार मिळणे कठीण होते. यामुळे स्थलांतर वाढून शहरांवर ताण वाढतो. ग्रामीण अर्थव्यवस्थेतील मंदीमुळे एकूण देशांतर्गत मागणी कमी होते. त्याचा परिणाम जीडीपी वाढीवर होऊ शकतो. याशिवाय, मानसशास्त्रीय परिणामही दुर्लक्षित करता येत नाही. शेतकऱ्यांमध्ये अनिश्चितता वाढते, कर्जाचा बोजा वाढतो आणि मानसिक तणाव निर्माण होतो. आत्मविश्वास कमी होतो, त्याचा परिणाम पुढील हंगामातील निर्णयांवर होऊ शकतो. त्यामुळे हा प्रश्न केवळ आर्थिक नसून सामाजिकदृष्ट्याही महत्त्वाचा आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा महाराष्ट्राला लागलेला शाप आहे. कमी पाऊस, कमी उत्पादन आणि जगण्याच्या संघर्षातून वाढणाऱ्या आत्महत्या या चक्रातून महाराष्ट्राची सुटका व्हायला तयार नाही. त्याचे कारण पुन्हा पावसावरचे जास्त अवलंबित्व हेच आहे. या पार्श्वभूमीवर सरकार आणि वित्तीय संस्था विविध उपाययोजना करण्याचा प्रयत्न करतात. जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, पिकांचे विविधीकरण, हवामान अंदाजाची अचूकता वाढवणे, तंत्रज्ञानाचा वापर यांवर भर दिला जातो. एका हंगामापुरता विचार न करता दीर्घकालीन टिकाऊ विकासाचा विचार करणे अत्यावश्यक आहे.

**प्रा. अशोक ढगे**

E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# इंदिरानगर डम्पिंगयार्डचा 'धुरकट सापळा' ठरला जीवघेणा..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पुसद, दि. २५ : पुसद-माहूर मार्गावरील इंदिरानगर येथील नगरपरिषदेच्या डम्पिंगयार्डसमोर सोमवारी (२५ मे) सकाळी सुमारे ७:४५ वाजताच्या दरम्यान भीषण अपघात घडला. भरधाव वेगातील ४०७ डंपरने दोन मोटारसायकलींना जोरदार धडक दिल्याने दोन जणांचा जागीच मृत्यू झाला, तर एका महिलेचे दोन्ही पाय फ्रॅक्चर होऊन ती गंभीर जखमी झाली आहे.**


मृतक.. अरविंद राठोड


मृतक.. गणेश जाधव

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून प्रशासनाच्या निष्काळजीपणा वर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काटखेडा येथील गणेश विष्णू जाधव (वय ३०), व्यवसाय – गृहरक्षक (होमगार्ड), हे पुसदकडे येत होते. तर कोठारी (ता. महागाव) येथील अरविंद प्रल्हाद राठोड (वय ४०) हे पत्नी अनिता राठोड (वय ३५) यांच्यासह उपचारासाठी पुसदकडे निघाले होते. यावेळी भरधाव वेगातील एमएच-२९ बीएच-३७६० क्रमांकाच्या ४०७ डंपरवरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने दोन्ही दुचाकींना जबर धडक बसली. अपघात इतका भीषण होता की गणेश जाधव आणि अरविंद राठोड यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर अनिता राठोड या गंभीर जखमी झाल्या असून त्यांचे दोन्ही पाय फ्रॅक्चर झाले आहेत. स्थानिक नागरिकांनी तत्काळ त्यांना मालपाणी हॉस्पिटलमध्ये दाखल केले.घटनेची माहिती मिळताच पुसद शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. मृतदेह शवविच्छेदनासाठी उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. अपघातानंतर चालक फरार झाला असून त्याचा शोध सुरू आहे. एफआयआर दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

**भरधाव ४०७ च्या धडकेत दोघांचा जागीच मृत्यू**

### धूर,भरधाव वाहने आणि निष्काळजीपणा, मृत्यूला जबाबदार कोण?

**इंदिरानगर परिसरातील नगरपरिषदेचे डम्पिंगयार्ड अनेक दिवसांपासून पेटत्या कचऱ्यामुळे चर्चेत आहे. येथून निघणारा दाट व विषारी धूर थेट रस्त्यावर पसरत असल्याने वाहनचालकांची दृश्यमर्यादा कमी होत असल्याची तक्रार नागरिकांची आहे. याच मार्गावर अवैध गौणखनिज वाहतूक करणारी वाहनेही भरधाव वेगाने धावत असल्याचे सांगितले जाते. वेगमर्यादा, सीसीटीव्ही कॅमेरे आणि कडक नियंत्रण नसल्याने हा मार्ग अपघातांचा 'ब्लॅक स्पॉट' बनत असल्याचा आरोप स्थानिकांकडून होत आहे.**

# पांढरकवडा कोंडवाडा प्रकरणावर संताप..!

## जनावरांच्या छळप्रकरणी कारवाईची मागणी तीव्र

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. २५ :** नगर परिषद पांढरकवडा येथील कोंडवाड्या मध्ये जनावरांची होत असलेली कथित अमानुष हेलसांड, चारा-पाण्याचा अभाव आणि गैरव्यवहाराच्या आरोपांमुळे शहरात संतापाची लाट उसळली आहे.

स्थानिक दैनिकात प्रसिद्ध झालेल्या धक्कादायक वृत्तानंतर या प्रकरणाने गंभीर वळण घेतले असून प्रशासनाच्या भूमिकेवर ही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या पार्श्वभूमीवर युवा टायगर सेना आक्रमक झाली असून संबंधित ठेकेदाराचे कंत्राट तात्काळ रद्द करून फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. संयोजक अंकित नैताम यांच्या नेतृत्वाखाली मुख्याधिकाऱ्यांना निवेदन सादर करून कोंडवाड्यातील परिस्थितीबाबत तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. निवेदनात जनावरांना आवश्यक चारा, पिण्याचे पाणी, सावली तसेच वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या जात नसल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. काही जनावरांची कथित विक्री होत असल्याचा संशयही व्यक्त करण्यात आला असून या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे.नगर परिषदेकडून मोकाट जनावरांची सुरक्षित व्यवस्था करण्यासाठी संबंधित ठेकेदाराला कंत्राट देण्यात आले होते. मात्र करारनाम्यातील अटींचे पालन न करता जनावरांच्या जीवाशी खेळ सुरू असल्याचा आरोप करण्यात येत आहे. त्यामुळे या प्रकारामुळे प्रशासनाची जबाबदारी आणि देखरेख व्यवस्थेवर ही प्रश्न उपस्थित होत आहेत.या प्रकरणात प्राणी क्रूरता प्रतिबंधक कायदा १९६०, भारतीय न्याय संहिता तसेच महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम १९६५ अंतर्गत संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासोबतच कोंडवाड्याची उच्चस्तरीय चौकशी, सीसीटीव्ही फुटेज जप्त करून तपास, जनावरांच्या कथित विक्रीच्या आरोपांची शहानिशा, कायमस्वरूपी चारा-पाणी व शेडची व्यवस्था आणि दोषी ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्याची मागणीही करण्यात आली आहे. "प्रशासनाने तातडीने ठोस कारवाई न केल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल," असा इशारा यावेळी देण्यात आला. या प्रकरणामुळे शहरात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून आता प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# घटना-घडामोडी



## दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

**झरी :** मित्रपरिवार मुकुटबन व खेतानी फाउंडेशन तालुका झरी जामनी यांच्या संयुक्त विद्यमाने वर्ग दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा शनिवारी २३ मे ला महावीर भवन मुकुटबन येथे पार पडला.

या गुण गौरव सोहळ्याचे अध्यक्ष माजी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती प्रकाश म्याकलवार, तर उद्घाटक झरी नगरपंचायत चे नगराध्यक्ष शीला चौधरी होते. यावेळी प्रमुख पाहुणे झरी पंचायत समितीचे माजी सभापती भुमारेड्डी बाजन्लावार, निसर्ग पर्यावरण मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र गेडाम , शिवसेना शिंदे गटाचे नेते चंद्रकांत घुगगुल, माजी मुख्याध्यापक रामदास पाईलवार, मार्गदर्शक राज्य विक्रीकर सहायक चंद्रपूर चे जगदिश भगत,ममता पारखी, रमेश उदकवार, गजभिये सर प्रामुख्याने उपस्थित होते. या सर्व मान्यवरांचे हस्ते वीस गुणवंत विद्यार्थ्यांचा शाला श्रीफळ प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. त्याचप्रमाणे नव्यानेच तलाठी पदावर रुजू झालेले स्वप्निल चिंतामण पथाडे यांचाही सन्मान करण्यात आला.यावेळी राज्य विक्रीकर सहाय्यक जगदीश भगत सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक संजय आकीनवार तर आभार प्रदर्शन नागेश अक्केवार यांनी केले जगदीश गोर्लेवार ,अरुण चिंतावार, अरुण चिटलावार, सुरेंद्र गेडाम यांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता सहकार्य केले.



## एमआरपी संदर्भात स्वतंत्र कायद्याची मागणी..!

**उमरखेड :** ग्राहकांच्या हिताचे संरक्षण व्हावे आणि शोषणमुक्त समाजाची निर्मिती व्हावी, यासाठी एमआरपी (कमाल किरकोळ किंमत) संदर्भात केंद्र शासनाने स्वतंत्र कायदा करावा, अशी मागणी अखिल भारतीय ग्राहक पंचायत, उमरखेड शाखेच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदनात सध्या वस्तूंवर छापण्यात येणाऱ्या एमआरपी प्रणालीमुळे ग्राहकांची फसवणूक होत असल्याचा आरोप करण्यात आला. कोणत्या उत्पादनावर किती एमआरपी असावी याबाबत स्पष्ट नियम नसल्याने उत्पादक, वितरक व विक्रेते अवास्तव दर आकारत असल्याचे सांगण्यात आले. विशेषतः औषधे, वैद्यकीय उपकरणे, सौंदर्यप्रसाधने व नामांकित कंपन्यांच्या उत्पादनांवर जादा एमआरपी छापली जात असल्याचे नमूद करण्यात आले. उत्पादन मूल्य व करांचा तपशील पॅकिंगवर स्पष्टपणे नमूद करण्याचीही मागणी करण्यात आली. यावेळी अध्यक्ष प्रा. प्रकाश देशमुख, दत्ता गंगासागर, ॲड. विलासराव देवसरकर, यशवंत गिरी, विजय सोनवणे व भारत कुलकर्णी उपस्थित होते.

# मेलोडी चॉकलेट वाटून युवक काँग्रेसचे अनोखे 'आंदोलन'!

## इंधन दरवाढ आणि पेट्रोल-डिझेलच्या तुटवड्याविरोधात उमरखेड विधानसभा युवक काँग्रेस आक्रमक!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**फुलसावंगी, दि. २५ :** आज दिनांक २५ मे २०२६ रोजी, सचिन नाईक अध्यक्ष, जिल्हा काँग्रेस कमिटी, यवतमाळ यांच्य नेतृत्वाखाली काळी-टेंभी येथील गायकवाड पेट्रोल पंपावर अनोखे आंदोलन करण्यात आले.

सर्वसामान्य जनतेला 'गोड गोड' आश्वासने देऊन प्रत्यक्षात मात्र पेट्रोल-डिझेलच्या किंमती गगनाला भिडवणाऱ्या आणि ऐन गरजेच्या वेळी इंधनाचा पुरवठा विस्कळीत करणाऱ्या सरकारचा निषेध म्हणून नागरिकांना व वाहनधारकांना 'मेलोडी चॉकलेट' वाटप करण्यात आले या आंदोलनाला *युवक काँग्रेस उमरखेड विधानसभा अध्यक्ष इमरान पठान तालुका कॅाग्रेस कमिटी अध्यक्ष शिवाजीराव देशमुख फुलसावंगी माजी सरपंच नवाब जानी महागाव कॅाग्रेस शहर अध्यक्ष शैलेश कोपरकर जिल्हा कॅाग्रेस कमिटी सरचीटनीस स्वप्नील नाईक सुनिल भवानकर जावेद चव्हान बाळासाहेब येनकर युवक महागाव तालुका अध्यक्ष अमोल मोहकर बीपीन पवार अमोल मुडे कपिल आढागडे पांडुरंगजी नाहतकर साकीब कुंदन शेख अवेज विजय गोरे स्वप्निल बरडे प्रफुल खंदारे व असंख्य पदाधिकारी प्रमुख उपस्थिती होते सर्वांच्या एकजुटीने आणि आक्रमक घोषणांनी पेट्रोल पंप परिसर दणाणून सोडला होता. जनतेच्या खिशाला कात्री लावणाऱ्या या महागाईवर आणि प्रशासनाच्या अकार्यक्षमतेवर तात्काळ नियंत्रण न आल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा युवक काँग्रेस उमरखेड विधानसभा अध्यक्ष इम्रान पठान यांनी दीला.

# सरपंच प्रशासक निवड मात्र अधिकार गोठले..!

## आर्थिक गावांचा कारभार ठप्प मागण्या मान्य करा अन्यथा आंदोलनाचा इशारा!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**कळंब, दि. २५ :** मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर सरपंचांना प्रशासक म्हणून नियुक्ती देण्यात आली असली, तरी त्यांच्या आर्थिक व प्रशासकीय अधिकारांवर निर्बंध असल्याने गावांचा कारभार अक्षरशः ठप्प झाल्याचा आरोप करत कळंब तालुका प्रशासक/सरपंच संघटनेने राज्य सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे.

या संदर्भात मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निवेदन सादर करण्यात आले.निवेदनात म्हटले आहे की, शासनाने सरपंचांना प्रशासक म्हणून जबाबदारी दिली. मात्र अधिकार गोठवल्यामुळे गावातील दैनंदिन प्रश्न सोडवणे कठीण झाले आहे. उन्हाळ्याच्या तीव्र झळांमध्ये पाणीटंचाईसारख्या गंभीर समस्यांना तोंड देताना निधीअभावी ग्रामपंचायती हतबल ठरत असल्याचा आरोप संघटनेने केला. त्यामुळे प्रशासकांना पूर्ववत सर्व आर्थिक व प्रशासकीय अधिकार देण्याची प्रमुख मागणी करण्यात आली आहे. याशिवाय जिल्हा नियोजन समितीमधून अविन प्रधान रस्त्यांना मंजुरी, १५ व्या वित्त आयोगाच्या अटी शिथिल करणे, प्रधानमंत्री आवास योजनेचे हफ्ते त्वरित जमा करणे, पोखरा योजनेत विहिरींचा समावेश, जलजीवन मिशनची कामे गतीने पूर्ण करणे, नवीन सिंचन विहिरींना मंजुरी, शेतकऱ्यांसाठी डिझेल उपलब्धता आणि पिक विमा देण्याच्या मागण्याही करण्यात आल्या. मागण्यांवर सहानुभूतीपूर्वक निर्णय न झाल्यास धरणे आंदोलन व उपोषणाचा मार्ग स्वीकारण्याचा इशारा संघटनेने दिला आहे. प्रवीण देशमुख यांच्या नेतृत्वात जयश्री भोसले, आरती जगताप, सुनंदा मुरकुटे, कविता कनाके, प्रदीप झाडे, शिवानंद सुर्वे, किशोर कंगाले, अमित पिसे यांच्यासह अनेक पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# महागाव नगर पंचायतीचा भोंगळ कारभार...

## प्रभाग क्रमांक १३ मध्ये पंधरा दिवसांपासून पाणीपुरवठा ठप्प

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**महागाव, दि. २५ :** महागाव शहरातील प्रभाग क्रमांक १३ मध्ये गेल्या तब्बल पंधरा दिवसांपासून पाणीपुरवठा पूर्णपणे बंद असल्याने नागरिकांना भीषण पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. वाढत्या उन्हाच्या तीव्रतेत घरगुती वापरासाठीही पाणी उपलब्ध नसल्याने नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असून, परिसरात तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे.

शिवसेना शिंदे गटाचे कार्यकर्ते नितीन विजयराव नरवाडे यांनी नगरपंचायत प्रशासन व स्थानिक लोकप्रतिनिधींवर निष्क्रियतेचा आरोप करत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पाणीपुरवठ्यासाठी वापरण्यात येणाऱ्या मोटारी अनेक दिवसांपासून बंद असून, त्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्यामुळे परिस्थिती अधिक गंभीर झाल्याचे त्यांनी सांगितले. यासंदर्भात त्यांनी प्रशासनाला सोमवारपर्यंतचा अल्टिमेटम देत पाणीपुरवठा सुरळीत न झाल्यास शिवसेना शिंदे गटाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. तसेच काही नगरसेवकांवर टीका करत नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत असल्याचे त्यांनी म्हटले. शहरात पाणीटंचाईसोबतच घनकचरा व्यवस्थापनाचाही प्रश्न गंभीर बनला असून, अनेक भागात कचऱ्याचे ढीग साचले आहेत. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, तातडीने उपाययोजना न झाल्यास मोठ्या जनआंदोलनाची शक्यता व्यक्त होत आहे.

# लाडक्या बहिणींचा जिल्हाधिकारी कार्यालयात ठिय्या..! "गरजूंना डावलून योजना कुणासाठी?" संतप्त सवाल

## नियमित हप्ता बंद झाल्याने आर्थिक संकट; चिखली (इजारा), महिलांची शासनाविरोधात तीव्र नाराजी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २५ :** "लाडकी बहीण" योजनेचा नियमित हप्ता अनेक महिन्यांपासून मिळत नसल्याने चिखली (इजारा), आर्णी तालुका आणि पांढरकवडा परिसरातील अनेक महिलांनी सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात धडक देत ठिय्या आंदोलन केले. शासनाच्या कार्यपद्धतीबाबत संताप व्यक्त करत महिलांनी थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले.

महिलांकडून मिळालेल्या माहितीनुसार, वर्ष २०२५ पर्यंत योजनेचा हप्ता नियमितपणे मिळत होता. मात्र जानेवारी २०२६ पासून आजपर्यंत त्यांच्या खात्यात एकही हप्ता जमा झालेला नसल्याचा आरोप करण्यात आला. यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले असून विशेषतः वयोवृद्ध महिला समोर उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे. अनेक लाभार्थी महिलांनी बँक खाते केवायसी प्रक्रिया पूर्ण करूनही अनुदान जमा होत नसल्याची तक्रार केली. यासंदर्भात त्यांनी विविध केवायसी केंद्रांमध्ये चौकशी केली; मात्र समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी व आमदारांशी संपर्क साधण्याचाही प्रयत्न झाला, परंतु कुणीही या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिले नसल्याची नाराजी महिलांनी व्यक्त केली. यापूर्वी महिलांनी जिल्हा परिषद आणि महिला व बालकल्याण विभाग कार्यालयातही धाव घेतली होती. मात्र तेथेही ठोस उत्तर न मिळाल्याने अखेर जिल्हाधिकारी कार्यालय गाठून मोठ्या संख्येने महिलांनी निवेदन सादर केले. यावेळी संगीता गोनेवार, शालू तोडसाम, स्वाती आत्राम, चंद्रकला पीचकाटे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या. दरम्यान, "ज्यांच्याकडे सर्व काही आहे त्यांना योजनेचा लाभ मिळतो, मात्र खऱ्या गरजू महिलांना लाभापासून वंचित ठेवले जात आहे," अशी तीव्र खंत व्यक्त करत महिलांनी शासनाच्या धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. आता प्रशासन या प्रश्नाची दखल घेऊन प्रलंबित हप्त्यांबाबत नेमकी भूमिका काय घेणार, याकडे लाभार्थी महिलांचे लक्ष लागले आहे.

# रेशनच्या तांदळात 'प्लास्टिक सदृश' दाण्यांचा पुरवठा..

## नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू? दोषींवर कठोर कारवाईची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**दारव्हा, दि. २५ :** दारव्हा तालुक्यातील स्वस्त धान्य दुकानातून वितरित करण्यात येणाऱ्या तांदळात प्लास्टिक सदृश दाणे आढळून येत असल्याचा गंभीर आरोप करत नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरू असल्याचा संतापजनक मुद्दा समोर आला आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात बिमोद मुधाने व गावकरी नागरिकांच्या वतीने जिल्हा पुरवठा अधिकारी, यवतमाळ यांना निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, दि. २४ मे रोजी शिवाजीनगर येथील काही नागरिकांनी रेशन दुकानातून मिळालेला तांदूळ संशयास्पद दिसत असल्याची तक्रार केली. प्रत्यक्ष पाहणी केली असता त्या तांदळा मध्ये प्लास्टिक सदृश दाणे आढळून आल्याचा दावा करण्यात आला आहे. याचप्रमाणे इतर गावांतील नागरिकांकडून ही अशाच प्रकारच्या तक्रारी पुढे येत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. दारव्हा तालुक्यातील अनेक गावांमध्ये आणि शहरात हजारो नागरिक नियमितपणे रेशन चा तांदूळ वापरत असल्याने या प्रकारामुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, "रोजच्या अन्नात वापरला जाणारा तांदूळ जर भेसळयुक्त असेल तर तो थेट लोकांच्या आरोग्यावर परिणाम करू शकतो. त्यामुळे हा प्रकार केवळ निष्काळजीपणाचा नसून नागरिकांच्या जीवाशी खेळ असल्याचे चित्र आहे." निवेदनात अन्न व औषध प्रशासनाच्या प्रयोगशाळे मार्फत तांदळाची तातडीने तपासणी करण्याची, संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून अहवाल सार्वजनिक करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच संबंधित स्वस्त धान्य दुकानांतून वितरित करण्यात आलेला संशयित तांदूळ परत मागवून नागरिकांना गुणवत्तापूर्ण तांदूळ देण्यात यावा, अशीही मागणी करण्यात आली आहे. पुरवठा विभागाने या गंभीर प्रकाराकडे विशेष लक्ष देऊन तांदळात भेसळ करणाऱ्या संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी ठाम भूमिका निवेदनातून मांडण्यात आली आहे. अन्यथा बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.यावेळी अक्षय गायकवाड, अमित बरडे, राजीव जाधव, प्रवीण पवार, किरण गजभिये, युवराज आडे यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

# महागाव खरेदी-विक्री संघात हमीभावाने ज्वारी खरेदीचा शुभारंभ

## ३,६९९ रुपये प्रतिक्विंटल दर; ३५८ शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**महागाव, दि. २५ :** राज्य शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत महागाव खरेदी-विक्री संघाच्या वतीने हमीभावाने ज्वारी खरेदीचा अधिकृत शुभारंभ उत्साहात करण्यात आला. शासनाने यंदा ज्वारीसाठी प्रतिक्विंटल ३ हजार ६९९ रुपये हमीभाव जाहीर केल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

खरेदी केंद्रावर प्रथम ज्वारी विक्रीसाठी आलेल्या एका प्रगतिशील शेतकऱ्याचा सत्कार तहसीलदारांच्या हस्ते करण्यात आला. तसेच काट्याचे पूजन करून खरेदी प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली. महागाव खरेदी-विक्री संघाकडे आतापर्यंत एकूण ३५८ शेतकऱ्यांनी ज्वारी विक्रीसाठी ऑनलाईन नोंदणी केली आहे. खरेदीच्या पहिल्या दिवशी १० शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे बोलावण्यात आले होते. खरेदी प्रक्रिया सुरळीत पार पडावी यासाठी आवश्यक यंत्रणा व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. जिल्हा मार्केटिंग विभागाच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया राबविण्यात येत असून महसूल व अन्नपुरवठा विभागाचे सहकार्य लाभत आहे. शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार स्वच्छ, दर्जेदार आणि निकषपूर्तता करणारी ज्वारी विक्रीसाठी आणावी, असे आवाहन खरेदी-विक्री संघाच्या वतीने करण्यात आले. शुभारंभ कार्यक्रमास विविध विभागांचे अधिकारी, खरेदी-विक्री संघाचे पदाधिकारी, बाजार समितीचे प्रतिनिधी, पत्रकार, कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने शेतकरी व हमाल बांधव उपस्थित होते. तालुक्यात ज्वारी खरेदी केंद्र सुरू झाल्याने शेतकऱ्यांना हमीभावात पीक विक्रीची संधी उपलब्ध झाली आहे.

### शेतकऱ्यांनी नोंदणी करावी

**हमीभावाने ज्वारी खरेदीसाठी शेतकऱ्यांनी ३० मे २०२६ पर्यंत ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. यासाठी सातबारा, बँक पासबुक, आधार कार्ड आणि अधिकृत मोबाईल क्रमांकासह खरेदी-विक्री संघ कार्यालयात स्वतः उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष विशाल पवार यांनी केले आहे.**

# बाल स्वास्थ्य कार्यक्रमात ८७९ बालकांना जीवदान

## ४ हजार ५४७ इतर शस्त्रक्रिया यशस्वी

**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम हा जिल्ह्यातील हजारो बालकांना आशेचा किरण ठरला आहे. या महत्त्वाकांक्षी उपक्रमात गंभीर आजारग्रस्त असलेल्या बालकांना नवजीवन देण्यात आले आहे. मागील काही वर्षात जिल्ह्यात ८७९ हृदय शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आल्या आहे. याशिवाय ४ हजार ५४७ इतर शस्त्रक्रिया करून गरजू कुटुंबांना मोठा दिलासा देण्यात आला आहे. या सर्व शस्त्रक्रियांसाठी बालकांच्या पालकांना एक रुपयाही खर्च करावा लागलेला नाही.

आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली या योजनेची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. अंगणवाडी ते शाळा स्तरावरील प्रत्येक बालकापर्यंत पोहोचून संपूर्ण बालकांचे स्क्रीनिंग करण्यात आले आहे. दुर्गम भागातही आरोग्य सेवा पोहोचवून आजारांचे वेळेत निदान करणे ही या योजनेची खरी ताकद ठरली आहे.योजनेत जन्मजात हृदय रोग, जन्मजात नेत्र रोग, जन्मजात कर्णदोष, दुभंगलेले ओठ व टाळू, हर्निया व हायड्रोसील, डोळ्यांचा तिरळेपणा, दंतरोग, फायमोसीस, हाडांचे इतर आजार आणि टॉन्सिल्स या प्रमुख शस्त्रक्रिया करण्यात आल्या. या मोहिमेत नामवंत रुग्णालयांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. यात अमरावती येथील विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय, डॉ. पाटील कान, नाक, घसा हॉस्पिटल, आचार्य विनोबा भावे रुग्णालय, सावंगी, कोकिळाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटल, मुंबई, एसआयसीसी चिल्ड्रन हॉस्पिटल, मुंबई, नेल्सन हॉस्पिटल, नागपूर, किम्सवे हॉस्पिटल, नागपूर, स्वास्थम हॉस्पिटल, नागपूर आणि संजीवनी हॉस्पिटल, मुंबई यांनी प्रमुख शस्त्रक्रिया केली.




जिल्हा पातळीवर कार्यरत असलेल्या पथकांमार्फत तालुकास्तरावर बालकांना मोफत सेवा पुरविली जात आहे. जिल्ह्यातील बालकांना दुर्धर आजार असल्यास या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनोद पवार यांनी केले आहे.

# श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयात २६ व २७ मे रोजी आट्या-पाट्या रेफरी क्लिनिक व अद्यावत ज्ञान कार्यशाळा




**अमरावती/का.प्र.**

जिल्हा आट्या पाट्या असोसिएशन, महाराष्ट्र राज्य आट्या पाट्या महामंडळ, नागपूर व श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने 'आट्या पाट्या रेफरी क्लिनिक व अद्यावत ज्ञान कार्यशाळा' दिनांक २६ व २७ मे २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे.ही कार्यशाळा श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, पंचवटी, शिवाजी नगर, अमरावती येथे पार पडणार आहे.

२६ मे रोजी सकाळी ११ वाजता उद्घाटन समारंभ होणार असून प्रमुख अतिथी म्हणून आट्या पाट्या फेडरेशन ऑफ इंडियाचे महासचिव डॉ. दीपक कवीश्वर,सचिव डॉ. अमरकांत चकोले, प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे, नगरसेवक मिलिंद बांबल,सचिन वानखेडे, महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त डॉ. नितीन चव्हाळे तसेच प्रा. डॉ. श्रीधर धाकुलकर उपस्थित राहणार आहेत.कार्यशाळेत रेफरींसाठी नियम व नियमावली, PPT सादरीकरण, मैदानावरील प्रात्यक्षिक सराव, शंका निरसन सत्र तसेच पंच परीक्षा आयोजित करण्यात आली आहे.राज्यभरातील पंच, खेळाडू व क्रीडाप्रेमी या कार्यशाळेत सहभागी होणार आहेत.सदर कार्य शाळेचे समारोप व प्रमाणपत्र वितरण समारंभ २७ मे रोजी दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आला असून विविध मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे.

# कमल शिरभाते यांचे निधन

**अमरावती-** वासुदेव येथील रहिवासी कमला शिरभाते यांचो २४ मे रोजी निधन झाले. त्यांची अंतिमयात्रा वासुदेव नगर येथील श्रीसाई या निवासस्थानावरुन काढण्यात आली. हिंदू स्मशान भूमित त्यांच्यावर अंतिमसंस्कार करण्यात आले. यावेळी जनसमुदाय मोठ्या संख्येने उपस्थित होता. यावेळी त्यांना श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.



# 'शकुंतला' ब्रॉडगेज रेल्वे प्रकल्पाला गती मिळण्याची शक्यता

## राज्य शासनाची ५० टक्के आर्थिक सहभागाची तरतूद

**अमरावती/का.प्र.**

पश्चिम विदर्भाच्या विकासासाठी अत्यावश्यक मानला जाणारा अचलपूर-मूर्तिजापूर-दारव्हा (यवतमाळ) हा शकुंतला रेल्वे ब्रॉडगेज प्रकल्प अनेक दशकांपासून प्रलंबित आहे. सुमारे १२० वर्षांचा इतिहास असलेल्या शकुंतला रेल्वेमार्गाचे ब्रॉडगेजमध्ये रूपांतर विदर्भातील आर्थिक प्रगतीला चालना देऊ शकते. २०१७ मध्ये 'कॅपिटल इन्व्हेस्टमेंट प्रोग्राम' अंतर्गत राज्य सरकारने ५० टक्के आर्थिक सहभागाची तयारी दर्शवली होती. आता या प्रकल्पाला गती मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



शकुंतला या नावाने ही रेल्वे ओळखली जाते. मालकी हक्काशी संबंधित तांत्रिक अडचणींमुळे प्रकल्प रखडला होता. आता प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) नुकताच रेल्वे बोर्डाकडे सादर करण्यात आला असून रेल्वे बोर्डाकडून या अहवालाच्या छाननीचे काम सुरू असल्याची माहिती रेल्वे प्रशासनाने दिली आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून सुरू होते. आता हा अहवाल सादर करण्यात आला आहे.

> रेल्वेमार्गाच्या ब्रॉडगेज रूपांतरणाला मंजुरी मिळण्यासाठी शकुंतला रेल्वे विकास समिती सातत्याने पाठपुरावा करत आहे. रेल्वे बोर्डाने यवतमाळ-मूर्तिजापूर आणि मूर्तिजापूर-अचलपूर असे दोन भाग केले आहेत. परंतु, प्रकल्पाला मंजुरी देताना यवतमाळ (मूर्तिजापूर)-अचलपूर, १८९ किलोमीटरची एकत्रित मंजुरी देऊन या प्रकल्पाला विशेष दर्जा द्यावा.
>
> **अक्षय पांडे,** समन्वयक, शकुंतला रेल्वे विकास समिती.

हा शकुंतला रेल्वेमार्ग रेल्वे मंत्रालयाने ताब्यात घेऊन ब्रॉडगेजमध्ये रूपांतरित करणे आवश्यक आहे. २०१७ च्या पिंक बुकनुसार, गेज परिवर्तन प्रकल्पासाठी 'कॅपिटल इन्व्हेस्टमेंट प्रोग्राम' जाहीर करण्यात आला होता. याशिवाय, फेब्रुवारी २०२४ मध्ये राज्य शासनाने ५० टक्के आर्थिक सहभागाची तरतूद अर्थसंकल्पात केली होती.

वऱ्हाडात मुबलक पिकणारा कापूस मुंबई मार्गे मँचेस्टरकडे नेण्याच्या मूळ उद्देशाने ब्रिटिशांनी हा मार्ग उभारला. पुढे या मार्गावरून प्रवासी वाहतूक सुरू झाली. मध्य रेल्वेने प्रवासी रेल्वेची जबाबदारी स्वीकारली आणि मूर्तिजापूर ते अचलपूर या आणि मूर्तिजापूर ते यवतमाळ मार्गावर शकुंतलेचा प्रवास सुरू होता. हा रेल्वेमार्ग वर्धा-नांदेड प्रकल्पाला जोडणारा असल्याने त्याला विशेष महत्त्व आहे. अचलपूर येथील शकुंतला रेल्वे बचाव सत्याग्रह समितीने गेल्या काही वर्षांपासून सत्याग्रहाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधले. याशिवाय यवतमाळ येथील शकुंतला रेल्वे विकास समितीने याविषयी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

# सुसंस्कारांची उणीव भरून काढण्यासाठी शिबीर-डॉ. रघुनाथ वाडेकर

**गुरुकुंज मोझरी/वार्ताहर**



आजच्या वेगवान आणि तंत्रज्ञानप्रधान युगात मुलांमध्ये पारंपरिक संस्कारांची घट होत असल्याची खंत व्यक्त करत,सुसंस्कार शिबीर ही काळाची गरज असल्याचे मत डॉ.रघुनाथ वाडेकर यांनी मांडले. ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शिक्षण व आरोग्य प्रसारक मंडळ, गुरुकुंज मोझरी यांच्या वतीने आयोजित पंधरा दिवसीय सुसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी अध्यक्षस्थानावरून बोलत होते. हा समारोप सोहळा वाडेकर नॅशनल स्कूलच्या प्रांगणात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

सदर पंधरा दिवसीय शिबिरामध्ये सामुदायिक ध्यान, प्रार्थना, भजन, श्लोक, भगवद्गीता अध्ययन, क्रिकेट, इंग्रजी, स्वरज्ञान, तालज्ञान, तबला, पेटी, टाळ, खंजिरी आदी विविध विषयांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. शिबिरात विविध क्षेत्रातील मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यामध्ये अरविंद राठोड, पंडित रघुनाथ करडीकर, गोपालजी सालोटकर, निलेश इंगळे गुरुजी, अक्षय शेरेकर, ॲड. रितेश गवई, प्रा. किशोरअगळे, सुनील लांजुरकर, रवि मानव, विजय माथने, उद्धव वानखडे, डॉ. सौ. शिल्पा पाटील, डॉ. अमोल मुंगले, कुमारी नारायणी राठोड आदी मान्यवरांचा समावेश होता.समारोप हरिभक्त परायण विलास साबळे, उद्धव वानखडे आणि अरविंद राठोड यांची समायोजित भाषणे झाली.प्रास्ताविक ॲड. रितेश गवई यांनी केले. संचालन शिबिर प्रमुख डॉ. सागर बांबल यांनी केले, तर आभार प्रदर्शन अजय चव्हाण यांनी मानले.यावेळी व्यासपीठावर विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी अजय चव्हाण, डॉ. सागर बांबल यांच्यासह शिक्षक व सहकारी मंडळींनी विशेष परिश्रम घेतले.

# २७ मे नंतर मान्सूनपूर्व पावसाची शक्यता

**अमरावती/का.प्र.**

विदर्भात पुढील तीन दिवस उष्णतेचा रेड अलर्ट कायम राहणार आहे. परंतू त्यानंतर २७ आणि २८ मेपासून विदर्भातील काही भागांमध्ये हलक्या मान्सूनपूर्व पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे.

हवामान तज्ज्ञ अनिल बंड यांच्या माहितीनुसार, बिहार ते आंध्र प्रदेशदरम्यान कमी दाबाची द्रोणीय स्थिती निर्माण झाली असून नैऋत्य बंगालच्या उपसागरात तीन किलोमीटर उंचीवर चक्राकार वारे वाहत आहेत. सध्या वाऱ्यांच्या दिशेमध्ये बदल झाला असून विदर्भ आणि मध्य भारताकडे काही प्रमाणात अरबी समुद्रातून वारे येऊ लागले आहेत. त्यामुळे तापमानवाढ काहीशी आटोक्यात आली असली, तरी अमरावतीसह पश्चिम विदर्भात कमाल तापमान ४५ अंशांच्या आसपास कायम आहे. दरम्यान, २७ आणि २८ मेपासून विदर्भातील काही भागांमध्ये हलक्या पूर्वमान्सून पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. पश्चिम विदर्भात या काळात तापमान ४४ अंशांच्या आसपास राहण्याची शक्यता असून त्यानंतर तापमानात २ ते ४ अंशांनी घट होऊ शकते. अमरावती आणि अकोला परिसरात २९ व ३० मे रोजी तुरळक पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. सध्या नवतपाची चर्चा सुरू असली तरी हा प्रकार मुख्यतः उत्तर मध्य प्रदेश आणि उत्तर प्रदेशात प्रचलित असल्याचे प्रा. बंड यांनी स्पष्ट केले. आपल्या भागात २७-२८ मेपासून रोहिणी नक्षत्र सुरू होणार आहे. मान्सूनबाबत बोलताना त्यांनी सांगितले की, सध्या मान्सूनचा पाऊस अरबी समुद्राच्या दक्षिण भागात तसेच मध्यपूर्व बंगालच्या उपसागरात पोहोचला आहे. मान्सून ३० मेपूर्वी केरळमध्ये दाखल होण्याची शक्यता आहे.

# आसेगावच्या बस स्थानकावर लालपरी बंद

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

येथील बस स्थानकावर आज सकाळी सुमारे ११ वा दरम्यान परतवाडा येथून अमरावतीकडे जाणारी परिवहन महामंडळाची लालपरी (एम एच ०६ एस ८८५८) अचानक बंद पडल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय झाली. भर उन्हात बस स्थानकावर अडकून पडलेल्या प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला.

बस बंद पडताच वाहकाने बसमधील प्रवाशांना दुसऱ्या बसमध्ये बसविण्याची व्यवस्था केली. त्यानंतर चालकाने इंजिनमध्ये पाणी टाकून बस सुरू करण्याचा प्रयत्न केला. काही वेळानंतर बस सुरू झाल्यानंतर सदर बस परतवाडा डेपोकडे रवाना करण्यात आली.दरम्यान, तळपत्या उन्हात प्रवाशांना बराच वेळ थांबावे लागल्याने प्रवाशांनी संताप व्यक्त केला.'तिकीट दरात वाढ करूनही परिवहन महामंडळाकडून प्रवाशांना आवश्यक सुविधा मिळत नाहीत,' अशी नाराजी यावेळी प्रवाशांकडून व्यक्त करण्यात आली.



# शहरबस पुन्हा कधी सुरू होणार;प्रवाशांची सवाल

## शहरबसचा करार संपुष्टात; मुदतवाढीस कंत्राटदाराची नकारघंटा

**अमरावती/का.प्र**

महापालिकेच्या वतीने कंत्राटदारामार्फत चालविण्यात येणाऱ्या शहरबसचा कंत्राट सोमवार, २५ मे रोजी संपला असून त्यातच डिझेलच्या वाढत्या दरामुळे व बसेसच्या देखभाल दुरूस्तीच्या खर्चामुळे सातत्याने तोटा होत असल्याने कंत्राटदारानेही आता सरसकट मुदतवाढ घेण्यास नकारघंटा दर्शविली आहे. त्यामुळे प्रशासनाकडून काही सवलत दिल्या गेली, तरच बसेस पुढे चालविणे शक्य होईल, अशी माहिती कंत्राटदाराकडून देण्यात आली.




शहरबसचा कंत्राट २०१६ मध्ये देण्यात आला होता; मात्र मध्येच जुन्या कंत्राटदाराने बस चालविण्यास नकार दिल्याने पुढे २०२३ मध्ये 'साहू टूर्स ॲण्ड ट्रॅव्हल' या संस्थेला हा कंत्राट हस्तांतरीत करण्यात आला. या कंत्राटदाराकडून महापालिकेला प्रति महिना जवळपास दोन लाख रूपये रॉयल्टी दिल्या जाते. आता त्या कराराची मुदत सोमवारी संपणार आहे. या नवीन कंत्राटदाराने जुन्याच कंत्राटदाराच्या बसेस चालविण्यासाठी घेतल्या होत्या. त्यामुळे त्या बसेसचे आयुर्मान संपलेले असल्याने बसेसच्या देखभालीवर मोठा खर्च करावा लागत आहे. त्यातच या महिन्यात सलग तिसऱ्यांदा डिझेलचे दर वाढल्याने कंत्राटदाराच्या खर्चात आणखी वाढ झाली आहे. त्यामुळे आता बसेस चालविणे शक्य नसल्याचा दावा कंत्राटदाराकडून करण्यात येत आहे; मात्र प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेता बससेवा अचानक बंद करणे शक्य नाही. परिणामी, नवीन व्यवस्था होईस्तोवर या कंत्राटदाराला प्रशासनाकडू मुदतवाढ देण्याची शक्यता आहे; परंतु डिझेलच्या बिलात व रॉयल्टीमध्ये सुट दिल्यावरच बससेवा सुरळीत होईल, अशी भूमिका कंत्राटदाराने घेतली आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाकडून काय निर्णय घेतला जातो, याकडे लक्ष लागले आहे.

# परिवहन विभागाच्या आशिर्वादाने खुलेआम अनाधिकृत पी.यु.सी. व ड्रायव्हिंग स्कुल

## तक्रार करूनही कारवाई नाही

**खल्लार/वार्ताहर**

कोणताही नोंदणीकृत शासकीय परवाना नसतांनाही खल्लार फाटा व सासन फाटा येथे खुलेआम व सर्रासपणे अवैध पि. यु. सी व ड्रायव्हिंग स्कुल विना परवाना सुरु असून याबाबत नोंदणीकृत ड्रायव्हिंग स्कुलच्या संचालकांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे दोनवेळा लेखी तक्रार करूनही अद्यापही अनोंदणीकृत चालकांवर कारवाई केल्या गेली नाही.प्रादेशिक परिवहन विभागाच्या आशिर्वादाने अनोंदणीकृत पी. यु. सी व ड्रायव्हिंग स्कुल सुरु आहेत की काय? असा प्रश्न निर्माण होतो आहे.




खल्लार फाटा व सासन फाटा येथे अनोंदणीकृत असलेल्या सेंटरवरुन अवैध पि. यु. सी व ड्रायव्हिंगचे प्रशिक्षण न देता व्यवयाय सुरु केला असून नागरिकांच्या जिवाशी दोन्ही अनोंदणीकृतचे खेळत आहेत. याचा फटका नोंदणीकृत ड्रायव्हिंग स्कुलच्या संचालकांना बसत आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे नोंदणीकृत ड्रायव्हिंग स्कुलच्या संचालकांनी दोन वेळा लेखी तक्रार करूनही त्यांच्या तक्रारीकडे परिवहन कार्यालयाने दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे परिवहन विभाग व अनाधिकृत पी. यु. सी व ड्रायव्हिंग स्कुल यांची मिलिभगत आहे काय? हासुद्धा प्रश्न निर्माण होत आहे.

# खरिपासाठी १ लाख ३८ हजार मेट्रिक टन खत मंजूर

## खरीप हंगामासाठी कृषी विभाग सज्ज


## कपाशीसाठी १२.५० लाख तर सोयाबीनला ६५,३५० क्विंटल बियाणांची मागणी

**अमरावती/का.प्र.**

हंगामासाठी कापूस, सोयाबीन, खरीप तूर, मका, मूग आणि उडीद या प्रमुख पिकांचे नियोजन करण्यात आले आहे. कापसासाठी १२.५० लाख बियाणे पाकिटांची तर सोयाबीनसाठी ६५ हजार ३५० क्विंटल बियाण्यांची मागणी नोंदविण्यात आली आहे.

कृषी विभागाकडून खरीपाचे नियोजन करण्यात आले असून जिल्ह्यात यंदा ६ लाख ७७ हजार हेक्टरवर पेरणीचे नियोजन करण्यात आले आहे. प्रस्तावित क्षेत्रानुसार १ लाख ३८ हजार मेट्रिक टन खत मंजूर करण्यात आले आहे. त्यामध्ये युरिया, डीएपी, एसएसपी, एमओपी आणि संयुक्त खतांचा समावेश आहे.

१३ मेपर्यंत जिल्ह्यात ८५ हजार २६९ मेट्रिक टन खत उपलब्ध झाले असून टंचाई टाळण्यासाठी कंपनीनिहाय आणि तालुकानिहाय नियोजन सुरू करण्यात आले आहे. आगामी खरीप हंगाम २०२६-२७ लक्षात घेता जिल्हा प्रशासन आणि कृषी विभागाने व्यापक तयारी पूर्ण केली असून बियाणे, खतसाठा, सिंचन व्यवस्थापन, गुणवत्ता नियंत्रण आणि ईएल-निनोच्या संभाव्य धोक्याविरोधात विशेष कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सुमारे ४.५६ लाख शेतकऱ्यांसाठी विविध उपाययोजना राबविल्या जात असून खरीप हंगाम सुरळीत पार पडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे.



**६,६१० मोहिमांव्दारे शेतकऱ्यांमध्ये जनजागृती**

१० मे पर्यंत जिल्ह्यात तब्बल ६६१० विविध मोहिमा राबविण्यात आल्या आहेत. त्यामध्ये ईएल-निनो जनजागृती, हवामान अनुकूल तंत्रज्ञान, बीज प्रक्रिया, माती परीक्षण, हुमणी कीड व्यवस्थापन, बोंडअळी नियंत्रण, जैविक शेती, शून्य मशागत, ट्रायकोकार्ड वापर आणि शिवार फेऱ्यांचा समावेश आहे. हुमणी कीट व्यवस्थापनासाठी ८७५ मोहिमा, हवामान अनुकूल तंत्रज्ञानासाठी १७८४ प्रात्यक्षिके आणि गावनिहाय प्रशिक्षणासाठी ६३८ मोहिमा घेण्यात आल्या.

**खरिपाकरिता ५८ हजार ६२८ हेक्टर सिंचनाचे नियोजन**

जिल्ह्यातील ७१ प्रकल्पांव्दारे १ लाख ९९ हजार १२२ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली असून प्रत्यक्ष १ लाख ६७ हजार ७८० हेक्टर क्षमता उपलब्ध झाली आहे. आगामी खरीप हंगामासाठी ५८ हजार ६२८ हेक्टर सिंचनाचे नियोजन करण्यात आले आहे. खरीप आणि रब्बी मिळून १ लाख ७ हजार ७२६ हेक्टर सिंचनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

# लाभार्थ्यांनी ह्यात प्रमाणपत्र, दिव्यांग प्रमाणपत्र

## ३० सप्टेंबरपूर्वी सादर करण्याचे आवाहन

**अमरावती-** भातकुली तालुक्यामधील विविध विशेष सहाय्य योजनांच्या सर्व लाभार्थ्यांनी ३० सप्टेंबरपूर्वी ह्यात प्रमाणपत्र आणि दिव्यांग लाभार्थ्यांनी वैश्विक ओळखपत्र वेळेत सादर करावे, असे आवाहन भातकुलीचे तहसीलदार अक्षय मंडवे यांनी केले आहे. केंद्र पुरस्कृत योजनेतील लाभार्थ्यांसाठी सरकारने बेनिफिशरी सत्यापन ॲप विकसित केले आहे ऑनलाइन पद्धतीने ह्यात प्रमाणपत्र मोफत सादर करू शकतात. लाभार्थी आपल्या नातेवाईकांमार्फत किंवा गावातील ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायतमधील संगणक परिचालक, कर्मचारी यांच्या मदतीने हे काम पूर्ण करू शकतील. लाभार्थ्यांना सेतू सुविधा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र किंवा नागरी सेवा केंद्रावर जाऊनही हे प्रमाणपत्र सादर करता येईल. येथे प्रक्रिया केल्यास ५० रूपये सेवा शुल्क द्यावे लागणार आहे.सामाजिक न्याय विभागाच्या नियमानुसार दिव्यांग लाभार्थ्यांना वैश्विक ओळखपत्र प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे. अनेक दिव्यांगांनी अद्याप प्रमाणपत्र मिळालेले नसल्याची बाब लक्षात घेऊन, दिव्यांग सक्षमीकरण विभागाने या प्रक्रियेला ३० सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे.तालुक्याबाहेरील आणि स्थानिक पात्र लाभार्थ्यांनी कोणत्याही तांत्रिक अडचणी किंवा मानधनात खंड पडू नये, यासाठी बेनिफिशरी सत्यापन ॲपवरून ह्यात प्रमाणपत्र त्वरित नोंदवावे. तसेच दिव्यांग लाभार्थ्यांनी वैश्विक ओळखपत्र सादर करावे, असे आवाहन भातकुली तहसिलदार यांनी केले आहे.

# ‘मुकादम’ चा दम गर्भाशय खतम !!

**मुकादम असलेला मध्यस्थ आगाऊ रक्कमेतून १५ ते २५ टक्के हिस्सा घेतो.शिवाय कोयता जोडप्यांच्या कमाईतून सुद्धा रक्कम काढून घेतो.एखाद्या दिवशी काम चुकले तर २५० ते ५००रुपये दंड त्याचे हुकुमाने आकारल्या जातो.यामध्ये महिलेला मासिक पाळी दरम्यान होणाऱ्या त्रासामुळे सुट्टी घेणे महत्वाचे असते.मात्र आर्थिक दंड लावल्याने मिळणाऱ्या उत्पन्नावर परिणाम होतो, म्हणून ही झंझट संपवण्यासाठी गर्भाशयाची पिशवीच काढून टाकणारी स्त्री अल्पवयात निसर्गाच्या देणगीला मुकते.**

भारताची साखर प्राचीन काळापासून स्फटिक रूपाने तयार होऊन ती जगभर फिरू लागली. साखरेचा वापरेनुसार व्यापार सुरू आहे. साखर ही जगभर उपयोगी असल्याने दरवर्षी प्रचंड प्रमाणात उत्पादन वाढ होत आहे.साखरेच्या उत्पादनासाठी जल, जमीन आणि मजूर याची सांगड असल्याशिवाय तिच्या उत्पादनात भर पडत नाही.जल, जमीन नैसर्गिक असले तरी त्याला मानवी श्रमाची जोड आवश्यक आहे.

श्रमाचा योग्य मोबदला मिळावा म्हणून काही नियम,अटी,शर्यतीचे कायदे आहेत.भारतीय नुकसान भरपाई कायदा १९२३ किंवा १९७६ मध्ये वेठबिगार प्रतिबंधक कायदा नुसार मजुरांना जे काही संरक्षण मिळायला पाहिजे ते किती प्रमाणात मिळत याचा विचार करायला भाग पाडणारा एक फोटो प्रसारित झाला.

कल्टीनेशन हे फ्रान्स मधील एका टॉप माध्यमाच्या आउटलेटने 'X' वर एक फोटो टाकून जगाचे लक्ष महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यामध्ये ऊसतोडीसाठी राबणाऱ्या महिलांच्या जीवनकडे वेधले आहे.ज्याची नोंद घ्यायला भारतीय माध्यमांना उसंत नाही किंवा ‘रोज मरे त्याला कोण रडे’ अशी दुर्लक्षित भूमिका लक्षात आणली. तो फोटो व पोस्ट जवळपास अंशी(८०लक्ष) लाखाच्यावर लोकांनी बघितले.

मात्र कुठल्याही भारतीय लीडचॅनलने किंवा राज्यात राजकीय नेता त्यावर काहीच लक्ष ही घालू शकले नाही.कारण कृषी प्रधान देशातील शेतकरी व शेतमजूर म्हणजे मतदानाला जगणारे नागरिक एवढीच ओळख शिल्लक राहिली आहे.

२०२४ मध्ये ३० ते ३५ वयोगटातील ४७७ महिलांनी ऊस तोडीला जाण्यापूर्वी गर्भाशय काढून घेण्याची शस्त्रक्रिया करतात.बीड जिल्ह्यातील एकूण ८४३ महिलांनी ही शस्त्रक्रिया केल्याचा अहवाल जून २०२५ मध्ये महाराष्ट्र सरकारने स्वतः सर्वेक्षण केल्यानंतर प्रकाशित झाले. शस्त्रक्रिया करण्यामागची भूमिका तपासल्यानंतर खरे कारण बाहेर आले.

एक पुरुष व त्याची सहचारीनी मिळून ‘कोयता’ अशी नोंद ऊसतोडसाठी केल्यानंतर त्यांना सहा महिन्याचा हंगाम दिला जातो.हा हंगाम देण्याचे काम ‘मुकादम’ म्हणून एक मध्यस्थ व्यक्ती करतो.तो ऊसतोड मजुरांना अग्रिम रक्कम जवळपास ५० ते ६० हजार रुपये आगाऊ देऊन त्या बदल्यात त्या पती पत्नीला किंवा दाम्पत्यांना दररोज तब्बल २टन ऊस तोडीपासून तर वाहनांमध्ये त्याचा भर रचेपर्यंत सुमारे १२ ते १४ तास राबवल्या जात असल्याचे समोर आले. शिवाय आठवड्यात एक ही सुट्टी हंगामात देण्यात येत नाही.

मुकादम असलेला मध्यस्थ आगाऊ रक्कमेतून १५ ते २५ टक्के हिस्सा घेतो.शिवाय कोयता जोडप्यांच्या कमाईतून सुद्धा रक्कम काढून घेतो.एखाद्या दिवशी काम चुकले तर २५० ते ५००रुपये दंड त्याचे हुकुमाने आकारल्या जातो.यामध्ये महिलेला मासिक पाळी दरम्यान होणाऱ्या त्रासामुळे सुट्टी घेणे महत्वाचे असते.मात्र आर्थिक दंड लावल्याने मिळणाऱ्या उत्पन्नावर परिणाम होतो, म्हणून ही झंझट संपवण्यासाठी गर्भाशयाची पिशवीच



**✍डॉ. प्रवीणकुमार राऊत**

काढून टाकणारी स्त्री अल्पवयात निसर्गाच्या देणगीला मुकते.कारण ती गर्भाशय खतम करण्यासाठी मानसिकरित्या मजुरीसाठी मजबुरीने तयार होते.

गेल्या २०१९ मध्ये १७% महिलांचे गर्भाशय काढल्याचा अहवाल २०२४ मध्ये IIED या इंग्लंड मधील आंतरराष्ट्रीय धोरण आणि कृती संशोधन संस्थाने दिला.जी जागतिक पातळीवर पर्यावरण संवर्धन व शाश्वत विकासासाठी काम करून गरिबी निर्मूलन व हवामान बदलावर काम करते.त्यांच्या संपूर्ण अहवालात ऊसतोडीसाठी स्थलांतरित झालेल्या महिलांच्या सर्वेक्षणात सुमारे ५५.७३ टक्के महिलांच्या गर्भाशायाची शस्त्रक्रिया केल्याची बाब पुढे आली.

एकीकडे भारतभर १५ ते ४९वयोगटातील महिलांचे गर्भाशय काढण्याचे राष्ट्रीय प्रमाण फक्त ३.२% आहे.याबाबत काही बातम्यांचा परिणाम लक्षात घेता साखर खरेदी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी भारतातील दालमिया भारत सुगर सारख्या कंपन्यांशी संबंध तोडून टाकले.

कोकोकोला कंपनीने याच अहवालावरून कामगार प्रशिक्षण कार्यक्रम सुरू केले.पेप्सिको कंपनीने भागधारकांच्या मतदानाचे अमेरिकेतील नियमांशी जोडून महसूलावर काम केले.

अमेरिकेच्या कामगार विभागाने जबरदस्तीच्या मजुरीतून साखर उत्पादन केल्याचे यादीत नाव दाखल केले.त्यामुळे महाराष्ट्र सरकारने २५ फेब्रुवारी २०२६ रोजी पुन्हा एक समिती स्थापन केली.याआधी तब्बल सात वर्षांपूर्वी पहिली समिती होती,तरी देखील ही दुसरी समिती स्थापन करावी लागली कारण आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय व्यवस्थेचे आकलन केल्या जात आहे. याचे हे ज्वलंत उदाहरण दिसून येत आहे.

पेप्सिको, कोको कोला, मॉन्डेलेझ (कॅडबरी तयार करणारी) युनिलिव्हर या प्रमुख कंपन्या भारतातून साखर खरेदी करतात.२०२४ मध्ये न्यूयॉर्क टाइम्स आणि द फुलर प्रोजेक्ट यांच्या संयुक्त तपासात साखर पुरवठा करणाऱ्या दालमिया भारत शुगर व एन.एस.एल.शुगर या दोन कंपन्या साखर कारखान्याला ऊस पुरवण्याचे काम करते त्यात असेच मुकादम मोठ्या प्रमाणात वेठबिगार करतो.तेव्हा त्यांचेकडे ‘बोनसुक्रो’ हे नैतिकता ठरवणारे प्रमाण पत्र नसल्याचे न्यूयॉर्क टाइम्स ने उघड केले.त्यामुळे या कंपनीशी संबंध सोडून दिल्याचे सुद्धा निदर्शनास आले.

रोज शीतपेय हे भारतीय युवा पिढीचे प्रतिष्ठेचे पेय आहे.तरुणींना कॅडबरी सारखे चॉकलेट खाण्यात प्रतिष्ठा आहे.हे सर्व पदार्थ साखरेपासून तयार केले जाते.ती साखर तयार करताना मजुरीत होणारे शोषण, महिलांच्या रोजगारावर, तिच्या मासिक पाळीचा सुद्धा परिणाम मजुरीवर होत असल्याने निसर्गदत्त गर्भाशयाचा बळी दिल्या जाणारी घटना.

आंतरराष्ट्रीय स्तरावरून तपासल्या गेली.यावर विचार करताना भारतीय प्रसारमाध्यमे,शासनाचे कामगार कल्याण धोरण,महिलांचे नैसर्गिक अधिकार यावर लक्ष वेधण्याचा प्रकार पुढे आला.तेव्हा विश्वगुरुची उद्घोषणा गर्भाशयात लय पावल्या जात आहे.

कारण मानवीहक्क सांगताना आपण किती ग्लोबल झालो, याचा हा उत्तम नमुना गरिबी निर्मूलन व हवामान बदलावर धोरणे अभ्यासताना दिसून आले.

मोबाईलवर रील पाहून वेळ घालवल्यापेक्षा वास्तविक अभ्यासाची सवय ठेवली, तर विश्वगुरूचा गर्भाशयात लय झाल्याचा प्रकार शेती व शेतमजूर या सोबतच शेत आधारित साखर उद्योग किंवा कापसापासून कापड तयार करणारा उद्योग आहे. तंत्रासोबत माणसांच्या श्रमाची गरज समजून घेतल्याशिवाय भारतीय अर्थव्यवस्था व मनुष्यबळ याचे संतुलन करणे आवश्यक आहे.ह्याला जागतिक धोरणाशी जोडणारा दुवा प्रसार माध्यमाने उजागर करावा. जेणे करून प्रत्येक क्षेत्रात बसलेले मुकादम हे आपल्या दमावर मजुरांचे, कामगारांचे,वेठबिगारांचे शोषण करणार नाही.स्त्रीचे गर्भाशय असो की गर्भात असलेले स्वप्न असो.ते निसर्ग दत्त असावे हीच नैतिक बाब फ्रान्सच्या प्रसारित फोटो ने लक्षात आणून दिली.

सर्व्हन्टस ऑफ इंडिया सोसायटी.
मो.७७९८६४५५६५.

# दलितांची आई त्यागमूर्ती रमाई

रमाबाई भीमराव आंबेडकर यांचे जिवन भारतीय समाजाच्या इतिहासातील त्याग, संयम, सहनशिलता आणि निःस्वार्थ समर्पण यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांच्या महापरिनि र्वाण दिनानिमित्त आपण त्यांच्या जिवनकार्याचे स्मरण. रमाबाईंचा जन्म अत्यंत साध्या आणि आर्थिकदृष्ट्या मर्यादित कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागला. कमी वयातच आई-वडिलांचे संरक्षण हरपल्यामुळे त्यांना जिवनाची कठोर वास्तवता लवकर अनुभवावी लागली. अशा परिस्थितीत त्यांनी संयम, मेहनत आणि परिस्थितीशी लढण्याची ताकद स्वतःमध्ये निर्माण केली.

त्या काळातील सामाजिक परिस्थिती अत्यंत वेगळी होती. स्त्रियांना शिक्षणाच्या आणि स्वातंत्र्याच्या संधी मर्यादित होत्या. घरातील जबाबदाऱ्या, सामाजिक बंधने आणि आर्थिक अडचणी यामुळे महिलांना स्वतःची स्वप्ने जगणे कठीण होते. अशा काळात रमाबाईंचे जिवन हे संघर्षातून उभे राहिलेल्या स्त्रीशक्तीचे उदाहरण बनले.रमाबाई आणि बाबासाहेब यांचा विवाह झाला तेव्हा बाबासाहेबांचे शिक्षण आणि जिवनप्रवास नुकताच सुरू होत होता. पुढे बाबासाहेबांनी उच्च शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला.

शिक्षणासाठी त्यांना दूर राहावे लागले. या काळात घरातील सर्व जबाबदाऱ्या रमाबाईंनी स्वतःवर घेतल्या.

आर्थिक परिस्थिती अत्यंत कठीण



होती. घर चालवणे, कुटुंब सांभाळणे आणि दैनंदिन गरजा पूर्ण करणे हे मोठे आव्हान होते. पण रमाबाईंनी कधीही बाबासाहेबांवर तक्रारींचा भार टाकला नाही. त्यांनी परिस्थितीशी तडजोड न करता संघर्ष स्वीकारला.बाबासाहेब परदेशात शिक्षण घेत असताना रमाबाईंनी अत्यंत संयमाने संसार सांभाळला. रमाईंच्या जिवनातील एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचे शांत

**✍हिरालाल मकेश्वर**

समर्पण. त्यांनी मोठमोठी भाषणे केली नाहीत, चळवळींचे नेतृत्व केले नाही; पण त्यांनी अशा व्यक्तीला आधार दिला ज्याने लाखो लोकांच्या आयुष्यात परिवर्तन घडवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य केवळ राजकीय किंवा कायदेशीर नव्हते; ते सामाजिक न्यायाचे आंदोलन होते. हे आंदोलन उभे करण्यासाठी त्यांना मानसिक, कौटुंबिक आणि भावनिक आधाराची गरज होती. हा आधार रमाबाईंनी दिला.

रमाईंचे व्यक्तिमत्त्व अत्यंत साधे होते. त्यांनी कधीही प्रसिद्धीची अपेक्षा केली नाही. त्यांना कुटुंब, कर्तव्य आणि ध्येय यांचे महत्त्व माहीत होते. बाबासाहेबांच्या प्रत्येक संघर्षात त्या शांतपणे उभ्या राहिल्या.त्यांनी समाजाला एक मोठा संदेश दिला. मोठेपणा केवळ पदात किंवा प्रसिद्धीत नसतो; तो आपल्या कर्तव्यपूर्तीत आणि त्यागातही असतो. रमाईंच्या आयुष्यातील दुःख, संघर्ष आणि त्याग यांचा परिणाम त्यांच्या आरोग्यावरही झाला. सततच्या अडचणी आणि जिवनातील कठीण प्रसंग यामुळे त्यांची प्रकृती खालावत गेली.२७ मे १९३५ रोजी रमाबाई आंबेडकर यांचे महापरिनिर्वाण झाले. हा क्षण बाबासाहेबांसाठी अत्यंत वेदनादायी होता. त्यांच्या आयुष्यातील सर्वात जवळची साथ हरपली होती.आज रमाबाई आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त त्यांच्या स्मृतीसमोर नतमस्तक होऊ या. त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेऊन समता, शिक्षण, बंधुता आणि मानवतेच्या मूल्यांना पुढे नेण्याचा संकल्प करूया.

त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली म्हणजे समाजात भेदभाव कमी करणे, शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि प्रत्येक व्यक्तीचा सन्मान राखणे.

रमाईंचा प्रवास हा केवळ एका व्यक्तीचा इतिहास नाही. तो भारतीय समाजातील संघर्ष, निष्ठा आणि आशेचा प्रवास आहे.ज्या हातांनी संसार सांभाळला, त्याच हातांनी एका युगपुरुषाच्या स्वप्नांना बळ दिले त्या त्यागमूर्ती रमाईंना विनम्र अभिवादन.


वाठोडा (शुक्लेश्वर)

# ‘कॉक्रोच जनता पार्टी’ अस्वस्थ तरुणाईचा डिजिटल आवाज

आजच्या डिजिटल युगात इंटरनेटवर कधी काय व्हायरल होईल आणि कशाचे तरुणाईला वेड लागेल, याचा नेम नाही. सध्या रील्स स्क्रोल करताना किंवा फेसबुक, एक्स (ट्विटर) वरून फेरफटका मारताना एकाच नावाची जोरदार चर्चा ऐकायला मिळतेय, ती म्हणजे ‘कॉक्रोच जनता पार्टी’.अवघ्या काही दिवसांत कोट्यवधी तरुणांनी या पेजला डोक्यावर घेतले. पण नक्की काय आहे हे वादळ आणि सोशल मीडिया युझर्स या ट्रेंडच्या प्रेमात का पडलेत? हा केवळ एक विनोदी मीमचा भाग आहे, की यामागे आजच्या तरुणाईची काही वेगळी मानसिकता-डिजिटल बंडखोरी दडलेली आहे?याचाच घेतलेला हा सविस्तर वेध.

माध्यम राहिलेले नाही, तर ते आजच्या पिढीच्या सामूहिक भावना, विचार आणि अभिव्यक्तीचा आरसा बनले आहे. इंटरनेटच्या अथांग विश्वात कधी, कोणती संकल्पना एका रात्रीत वादळ निर्माण करेल, याचा नेम नसतो. सध्या डिजिटल पटलावर अशाच एका वेगाने पसरणाऱ्या लाटेने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.ती लाट म्हणजेच आम आदमी पार्टीचे माजी सोशल मीडिया रणनीतीकार आणि बोस्टन युनिव्हर्सिटीत शिकणारे अभिजित दिपके यांनी सुरू केलेली ‘कॉक्रोच जनता पार्टी’ (सीजेपी). मोठमोठ्या बँड्स आणि जागतिक ख्यातीच्या सेलिब्रिटींना फॉलोअर्स मिळवण्यासाठी वर्षानुवर्षे तडजोड करावी लागते, मात्र अवघ्या काही तासांत या पेजने लोकप्रियता मिळवली.

तरुणाईमधले सीजेपीबद्दलचे हे वाढते वेड असे दर्शवते, की जेव्हा एखादी सखोल कल्पना थेट तरुणाईच्या मानसिकतेला स्पर्श करते, तेव्हा डिजिटल विश्वात अभूतपूर्व चमत्कार घडू शकतात. कोणत्याही नकारात्मक तेशिवाय किंवा वादाशिवाय, केवळ उपरोध आणि नावीन्यपूर्ण कल्पनेच्या जोरावर या ट्रेंडने




कोट्यवधी लोकांना एका धाग्यात विणले.

आजचे तरुण जुन्या आणि पारंपरिक पद्धतींमध्ये अडकून पडणारे नाहीत. ते सोशल मीडियालाच आपले हुकमी व्यासपीठ मानतात.

रस्त्यावर उतरून आरडाओरडा करण्यापेक्षा इन्स्टाग्राम रील्स, मीम्स आणि व्हिडीओंच्या माध्यमातून ते आपली बाजू एकदम अचूकपणे मांडतात. ‘कॉक्रोच जनता पार्टी’ हे नावसुद्धा याच चौकटीबाहेरच्या आणि हटके मानसिकतेतून आले.

ज्या गोष्टींना किंवा भावनांना मुख्य प्रवाहात नेहमीच हलक्यात घेतले गेले किंवा दुर्लक्षित केले गेले, त्याच गोष्टींना या पिढीने एकत्र येण्याचे आणि व्यक्त होण्याचे साधन बनवले. विशेषतः आजची ‘जेन-झी’ पिढी कितीही गंभीर किंवा अवघड विषय असो, कोणताही आक्रस्ताळेपणा न करता अगदी हलक्या-फुलक्या विनोदातून आणि मीम्सच्या भाषेत जगासमोर मांडायला जास्त पसंती देतेय.

तसेच ‘कॉक्रोच’ हे केवळ नाव नाही, तर एक प्रतीक आहे! वरवर पाहता ‘कॉक्रोच’ (झुरळ) हा शब्द विनोदी वाटू शकतो, पण त्यामागे एक सुप्त सामाजिक संदेश दडलाय. कॉँक्रोच हा असा जीव आहे जो अत्यंत कठीण परिस्थितीतही स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवू शकतो, मात्र तरीही त्याला नेहमीच दुर्लक्षित केले जाते. आजचा सामान्य तरुण, विशेषतः पदव्या हातात घेऊन रोजगारासाठी संघर्ष करणारा वर्ग, स्वतःला नकळतपणे या परिस्थितीशी जोडताना दिसतो.

या अजब-गजब नाव असलेल्या ट्रेडिंग कॉक्रोच जनता पार्टीची सुरुवातही तितकीच रंजक होती. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी एका सुनावणीदरम्यान बोगस पदव्यांबाबत भाष्य करताना ‘झुरळ’ आणि ‘परजीवी’ हे शब्द वापरले. त्या विधानानंतर सोशल मीडियावर अनेक तरुणांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. हीच भावना ओळखून सोशल मीडिया रणनीतीत पारंगत असलेल्या अभिजीत

**✍साक्षी माने**

दिपके यांनी या संपूर्ण चर्चेला एका वेगळ्या वळणावर नेले. त्यांनी ‘कॉक्रोच जनता पार्टी’ची संकल्पना मांडली आणि इंटरनेटवर सक्रिय असलेल्या तरुणांना एकत्र येण्यासाठी एक अनोखे, उपरोधिक आणि पूर्णपणे डिजिटल व्यासपीठ दिले.

यानंतर जे घडल, ते सोशल मीडिया इतिहासात नोंदवण्यासारखे होतें. मीम्स, रील्स, कमेंट्स,प्रोफाइल फोटो, स्टेटस काही तासांतच हा ट्रेंड कोट्यवधी लोकांपर्यंत पोहोचला. सीजेपीचे यश केवळ विनोदात नाही, तर तरुणांच्या भावनिक जवळिकीमध्ये दडले. आजची तरुणाई स्पर्धा, मानसिक ताण, सामाजिक अपेक्षा आणि डिजिटल तुलना यांच्या दबावाखाली जगतेय. पण ती हे दुःख पारंपरिक भाषेत मांडत नाही. ती त्याचा विनोद करते आणि त्यातूनच स्वतःला व्यक्त करते.‘कॉक्रोच जनता पार्टी’ने नेमके हेच साधले. त्यांनी तरुणांना ‘तुम्ही एकटे नाही’ ही भावना दिली.

पण म्हणतात ना सोशल मीडियाच्या जगात प्रत्येक गोष्टीचे आयुष्य मर्यादित असते. रोज नवे ट्रेंड्स येतात, नवी वादळं उठतात आणि काही दिवसांनी सगळे शांत होते. आज ‘कॉक्रोच जनता पार्टी’ डोक्यावर घेतली जातेय. उद्या कदाचित दुसरी एखादी नवीन संकल्पना इंटरनेटवर राज्य करेल.

कारण डिजिटल विश्वाचा स्वभावच तसाच आहे, सतत बदलणारा. पण दुसरी बाजू पाहिली, तर असे लक्षात येईल, काही ट्रेंड्स केवळ मनोरंजन म्हणून येत नाहीत; ते त्या काळातील समाजाची मानसिकता दाखवून जातात. ‘कॉक्रोच जनता पार्टी हे त्यापैकीच एक उदाहरण ठरू शकते. कारण या ट्रेंडने एक गोष्ट स्पष्ट केली आहे, आजची तरुणाई ओरडून नव्हे, तर मीम्सच्या भाषेत बोलते. ती राग व्यक्त करत नाही, तर त्यावर विनोद करते आणि कदाचित हाच तरुणाईचा सर्वात मोठा डिजिटल प्रतिकार आहे. शेवटी प्रश्न एकच उरतो, हा ट्रेंड काळाच्या ओघात विरून जाईल का? की तो आजच्या पिढीच्या अस्वस्थतेचे आणि अभिव्यक्तीचे कायमस्वरूपी प्रतीक बनेल?याचे उत्तर मात्र काळच देईल.

# यशस्वी होण्याचे रहस्य : हुशारी की सातत्य?

ज्याची मुले नेहमी यशस्वी होतात त्या पालकांचा आणि त्यांच्या मुलांचा इतरांना बऱ्याचदा हेवा वाटतो. कधी कधी तर जेलसीही वाटते. मुलांच्या यशस्वी होण्याबाबत दोन गोष्टींबद्दल नेहमी चर्चा होते की, या मुलांच्या यशात हुशारी आणि सातत्य यापैकी कोणती गोष्ट जास्त महत्त्वाची भूमिका बजावते? अनेकांना वाटतं की, जी मुलं खूप हुशार असतात तेच आयुष्यात मोठं यश मिळवतात; परंतु प्रत्यक्ष आयुष्यात पाहिलं तर केवळ हुशारी पुरेशी नसते; त्यासोबत सातत्य असणे अत्यंत महत्त्वाचे असते. म्हणूनच प्रश्न उभा राहतो-यशासाठी अधिक महत्त्वाचे काय? हुशारी की सातत्य.

अनेकांना वाटते की, जो खूप हुशार असतो तोच आयुष्यात पुढे जातो. पण खरंच तसे आहे का? थोडा विचार केला तर लक्षात येईल की हुशारी महत्त्वाची असली तरी सातत्य त्याहून अधिक महत्त्वाचे आहे.हुशारी म्हणजे गोष्टी पटकन समजणे, नवीन कल्पना सुचणे आणि समस्यांचे जलद उत्तर शोधणे. हुशार विद्यार्थी वर्गात पटकन उत्तर देतात, अभ्यास लवकर समजून घेतात. त्यामुळे त्यांचे कौतुकही जास्त होते. पण फक्त हुशारी असली म्हणून यश हमखास मिळते असे नाही.दुसरीकडे, सातत्य म्हणजे एखादी गोष्ट रोज प्रामाणिकपणे करत राहणे. कधी कधी गोष्ट कठीण वाटली, अपयश आले तरी हार न मानता पुन्हा प्रयत्न करणे. सातत्य असलेला विद्यार्थी रोज थोडा थोडा अभ्यास करतो, चुका झाल्या तरी त्यातून शिकतो आणि पुढे जातो.

मुलांची हुशारी म्हणजे काय असते तर प्रश्न वेगाने समजून घेऊन त्यावर योग्य उपाय शोधण्याची क्षमता. हुशार मुलं नवीन कल्पना मांडतात, परिस्थितीचे विश्लेषण करतात आणि इतरांपेक्षा वेगाने निर्णय घेतात. त्यामुळे शिक्षण, विज्ञान, व्यवसाय अशा अनेक क्षेत्रांत हुशारीचे महत्त्व आहे. हुशारीमुळे एखादा मुलगा कमी वेळात मोठे काम करू शकतो. परंतु फक्त हुशारी असणे म्हणजे यश निश्चितच मिळेल असे नाही. कारण अनेकदा असे दिसते की, खूप हुशार मुलं सुरुवातीला चांगली कामगिरी करतात, पण सातत्य नसल्यामुळे पुढे त्यांची प्रगती थांबते. दुसरीकडे, मध्यम बुद्धिमत्ता असलेली पण सातत्याने मेहनत करणारी व्यक्ती मोठे यश मिळवते.

सातत्य म्हणजे एखादे काम नियमितपणे आणि चिकाटीने करत राहणे. यामध्ये संयम, मेहनत आणि हार न मानण्याची वृत्ती असते. सातत्य

**✍डॉ. स्वाती गानू**

असलेली व्यक्ती अपयश आले तरी प्रयत्न सोडत नाही. ती चुका समजून घेत पुढे सुधारणा करत राहते. हाच गुण व्यक्तीला हळूहळू यशाच्या दिशेने नेत असतो.

हुशारी आणि सातत्य यांचा योग्य समतोल असेल तर यशाची शक्यता अधिक वाढते. हुशारी दिशा दाखवते, तर सातत्य त्या दिशेने चालत राहण्याची ताकद देते. हुशारीने योग्य मार्ग निवडला जातो आणि सातत्यामुळे त्या मार्गावर पुढे जात राहता येते.आजच्या स्पर्धेच्या युगात अनेकांना झटपट यश हवे असते. पण खरे यश हे वेळ, मेहनत आणि सातत्यानेच मिळते. अनेक महान व्यक्तींच्या जीवनाचा अभ्यास केला, तर दिसून येते की, त्यांनी अनेक अपयशांना सामोरे जाऊनही प्रयत्न थांबवले नाहीत.म्हणूनच, जीवनात यशस्वी व्हायचे असेल, तर फक्त हुशार असणे पुरेसे नाही. सातत्य, मेहनत




आणि सकारात्मक दृष्टिकोन असणे आवश्यक आहे. हुशारी तुम्हाला सुरुवात करून देते, पण सातत्य तुम्हाला अंतिम ध्येयापर्यंत पोहोचवते. शेवटी असे म्हणता येईल की, हुशारीपेक्षा सातत्य अधिक प्रभावी ठरते. कारण सातत्य असलेली व्यक्ती हळूहळू आपली क्षमता वाढवत जाते आणि एक दिवस नक्कीच यशाच्या शिखरावर पोहोचते.

शेवटी एक गोष्ट लक्षात ठेवा - हुशारी तुम्हाला सुरुवात करून देते, पण सातत्य तुम्हाला शेवटपर्यंत पोहोचवते. म्हणूनच यशस्वी होण्यासाठी सातत्य ही सर्वात मोठी ताकद आहे.

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवच



# इंधन दरवाढीविरोधात वंचितचा एल्गार

## बैलगाडी, गाढव, घोडे आणि सायकलसह अकोल्यात भव्य मोर्चा; प्रशासनालाच यावे लागले आंदोलकांसमोर



■ प्रतिनिधी | अकोला ■

पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस सिलिंडर तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या सतत वाढणाऱ्या किमतींविरोधात वंचित बहुजन आघाडीने रविवारी अकोल्यात आक्रमक आंदोलन छेडत केंद्र व राज्य सरकारविरोधात जोरदार एल्गार पुकारला. तब्बल ४५ अंश तापमानात काढण्यात आलेल्या या भव्य मोर्चात बैलगाड्या, घोडे, गाढवे, घोडागाड्या आणि सायकलींचा वापर करून सरकारच्या आर्थिक धोरणांचा निषेध नोंदविण्यात आला.

वंचित बहुजन आघाडीच्या पक्ष कार्यालयापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत निघालेल्या या मोर्चाने शहरवासीयांचे विशेष लक्ष वेधले. महागाईने होरपळणाऱ्या सर्वसामान्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी आंदोलकांनी पारंपरिक वाहतुकीचा वापर करत अनोख्या पद्धतीने सरकारविरोधात रोष व्यक्त केला. 'महागाई कमी करा', 'इंधन दरवाढ मागे घ्या', 'सामान्यांना जगू द्या' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

आंदोलकांच्या म्हणण्यानुसार केंद्र सरकारच्या आर्थिक धोरणांमुळे पेट्रोल-डिझेलसह खाद्यतेल, अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती सातत्याने वाढत असून सर्वसामान्य नागरिकांचे जगणे कठीण झाले आहे. वाढत्या महागाईमुळे कुटुंबांचे आर्थिक गणित कोलमडले असून सरकार महागाई नियंत्रणात आणण्यात पूर्णपणे अपयशी ठरल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

मोर्चादरम्यान प्रशासनासमोरही आगळीवेगळी परिस्थिती निर्माण झाली. निवेदन स्वीकारण्यासाठी केवळ पाच पदाधिकाऱ्यांना बोलावण्याचा प्रस्ताव आंदोलकांनी धुडकावून लावत 'प्रशासनानेच मोर्चात येऊन निवेदन स्वीकारावे,' अशी ठाम भूमिका घेतली. आंदोलकांचा वाढता आक्रमक पवित्रा पाहता अखेर निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना स्वतः मोर्चास्थळी येऊन निवेदन स्वीकारावे लागले.

प्रशासनातील अधिकाऱ्यांनी थेट मोर्चात येऊन निवेदन स्वीकारण्याची घटना प्रथमच घडल्याची चर्चा यावेळी रंगली.

मोर्चामध्ये मोठ्या संख्येने महिला, युवक आणि कार्यकर्त्यांचा सहभाग होता. बैलगाडी आणि प्राण्यांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या या आंदोलनाने शहरात मोठी उत्सुकता निर्माण केली. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष डॉ. धैर्यवर्धन पुंडकर, प्रदेश युवक आघाडी महासचिव राजेंद्र पातोडे, जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवे, जिल्हा महासचिव मिलिंद इंगळे, युवक अध्यक्ष श्रीकांत घोगरे, महासचिव राजकुमार दामोदर, महिला आघाडी अध्यक्षा आम्रपाली खंडारे, महासचिव संगीता अढाऊ, नंदकुमार डोंगरे, धीरज इंगळे, सिद्धार्थ देवधरीकर, निलेश देव, मझहर खान, गजानन गवई, दामोदर जगताप, डॉ. धर्माळ, गोरसिंग राठोड, सुनील सरदार, चरण इंगळे, अशोक दारोकार, किशोर जामनीक, पवन बुटे, सुगत डोंगरे, अनुराधा डांगे, राहुल इंगळे, स्वप्निल सरकटे, गोपाल ढोरे, सम्राट तायडे, वैशाली कांबळे, लक्ष्मी वानखडे, अक्षय राऊत, आशिष रायबोले, आकाश जंजाळ, नागेश उमाळे, आकाश गवई, सूरज दामोदर, साहिल बोडदे, आशिष सोनोने, अमोल वानखडे, सुनिता हिरोळे, आकाराम मोरखडे, जिया शहा, विद्याताई शामस्कर, मिलिंद दामोदर, मंगला शिरसाट, सुरेश गवई, नाजूक दारोकार यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## जाहीर नोटीस

**विद्यमान जिल्हा न्यायाधीश- २ तथा अति. सत्र न्यायाधीश, अकोला यांचे न्यायालय**

गैरअर्जदार/गैरअपिलार्थी यांनी अपीलमध्ये चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठीची जाहीर नोटीस

Guardian Ward No. 213 / 2026 — प्रोसेस नं. १५६९/२०२६
Fix for: 12/06/2026 — दिनांक : २१/०४/२०२६

1) Patibha Chandrashekhar Deshmukh, 2) Bhakti Chandrashekhar Deshmukh, 3) Swaraj Chandrashekhar Deshmukh, Both 2 and 3 Minors represented through Natural Guardian Mother Applicant No. 1, R/o Flat No. 6, Samruddhi Apartment, Hingana Road, Akola Tq. and Dist. Akola

- Vrs --- Nil

ज्याअर्थी या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार यानी 'जिल्हा न्यायाधीश- २ तथा अति सत्र न्यायाधीश, अकोला' या न्यायालयामध्ये 'APPLICATION U/S 29 OF GUARDIANS AND WARDS ACT, 1890 AND U/S 8 OF HINDU MINORITY AND GUARDIANSHIP ACT, 1956, FOR PERMISSION TO SALE THE PROPERTY' दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी तारीख १२/०६/२०२६ ठेवलेली आहे.

त्याअर्थी आपणांस याव्दारे कळविण्यात येते की, जर आपण स्वतः किंवा आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजू मांडणारा व्यक्ती चौकशी तारखेला १२/०६/२०२६ जिल्हा न्यायालयात सकाळी ११:०० वाजता हजर व्हावे, जर आपणापैकी कोणीही हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येईल. आज दिनांक २१ माहे एप्रिल सन २०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

अकोला
दिनांक : २१/०४/२०२६

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला

# कार्यकर्त्यांच्या बळावर शिवसेना अधिक मजबूत करू : ललित वानखडे

### विशेष प्रभारी नियुक्तीनंतर अकोल्यात शिवसैनिकांकडून जंगी सत्कार



■ प्रतिनिधी | अकोला ■

'शिवसेना हा केवळ चार अक्षरांचा पक्ष नसून सर्वसामान्यांच्या ताकदीचे प्रतीक आहे. पक्षात पूर्वी काय झाले यावर आता मंथन न करता आगामी काळात पक्षशिस्त आणि संघटन वाढीसाठी अहोरात्र काम करणार आहे. शिवसेना हा कार्यकर्त्यांच्या कामाची जाण ठेवणारा पक्ष असून सामान्य कार्यकर्ताच पक्षाचा खरा मानबिंदू आहे,' असे प्रतिपादन शिवसेनेचे नवनियुक्त विशेष प्रभारी ललित वानखडे यांनी केले.

ललित वानखडे यांच्या विशेष प्रभारीपदी नियुक्तीनंतर शिवसेना अकोला जिल्ह्याच्या वतीने त्यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी बोलताना त्यांनी उपस्थित शिवसैनिकांचे आभार मानत आगामी काळात सर्वांनी एकत्र राहून पक्षवाढीसाठी कार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार तथा शिवसेना जिल्हाप्रमुख नारायणराव गव्हाणकर होते. यावेळी जिल्हाप्रमुख चंद्रशेखर पांडे गुरुजी, महिला आघाडी जिल्हाप्रमुख तथा नगरसेविका उषाताई विरक, महानगराध्यक्ष राजेश मिश्रा, युवा नेते विठ्ठल सरप पाटील, डॉ. अशोक ओळंबे, माजी जिल्हाप्रमुख तथा नगरसेवक राजेश काळे, नगरसेवक मनोज पाटील, मंगेश काळे, सागर भारुका, नगरसेविका सोनाली सरोदे, संतोष अनासने आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी महानगरप्रमुख तरुण बगेरे, माजी उपजिल्हाप्रमुख ज्ञानदेव परनाटे, उपजिल्हाप्रमुख उमेश आप्पा भोसरी, माजी नगरसेवक गजानन चव्हाण, प्रा. प्रकाश डवले, गजानन बोराडे, रामदास हरणे यांच्यासह गजानन नागरी पतसंस्थेचे पदाधिकारी, युवक आघाडी, महिला आघाडीचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात ललित वानखडे यांचा जंगी सत्कार करण्यात आला. अशी माहिती अनिल मालगे यांनी दिली.

# विश्वासाला तडा; घरकाम करणाऱ्या महिलेनेच केली ७.८७ लाखांची चोरी



### रामदास पेठ पोलिसांची अतिजलद कारवाई; पाच लाखांची रोकड जप्त

■ प्रतिनिधी | अकोला ■

विश्वासाने घरात कामासाठी ठेवलेल्या महिलेनेच लाखोंची रोकड लंपास केल्याची धक्कादायक घटना शहरातील दुर्गा चौक परिसरात उघडकीस आली आहे. या प्रकरणात रामदास पेठ पोलिसांनी तातडीने तपासाची चक्रे फिरवत अवघ्या काही तासांत आरोपी महिलेला ताब्यात घेत चोरीतील पाच लाख रुपयांची रोकड जप्त केली. पोलिसांच्या या धडाकेबाज कारवाईची शहरात जोरदार चर्चा सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सिद्धार्थ शिवप्रकाश रुहाटीया (वय ४१) हे कालुराम फूड प्रोडक्ट प्रा. लि. व नर्मदा सॉल्वेक्स प्रा. लि. या उद्योगसमूहाशी संबंधित असून ते दुर्गा चौक परिसरात वास्तव्यास आहेत. त्यांच्या घरी मागील तीन महिन्यांपासून एक महिला घरकामासाठी येत होती. २१ मे रोजी व्यवसायातील ७ लाख ८७ हजार ५९० रुपयांची रोकड घरी आणून आलमारीत ठेवण्यात आली होती.

दरम्यान, २३ मे रोजी सकाळी ही रक्कम आलमारीतून गायब असल्याचे लक्षात येताच घरात एकच खळबळ उडाली. त्यानंतर घरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले असता घरकाम करणाऱ्या महिलेच्या संशयास्पद हालचाली आढळून आल्या. यावरून तिच्याविरोधात रामदास पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य ओळखून पोलीस निरीक्षक शिरीष सावळाराम खंडारे यांनी तातडीने विशेष पथक नियुक्त केले. गुप्त बातमीदार आणि तांत्रिक तपासाच्या आधारे संशयित महिलेला महिला पोलिसांच्या मदतीने ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान तिने चोरीची कबुली दिल्यानंतर पोलिसांनी तिच्याकडून पाच लाख रुपयांची रोकड हस्तगत केली. उर्वरित रकमेचा शोध सुरू असून पुढील तपास रामदास पेठ पोलीस करीत आहेत.

### पोलिसांच्या तत्परतेचे कौतुक

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत पोलीस निरीक्षक शिरीष गायकवाड, पोलिस उपनिरीक्षक निलेश गायकवाड, प्रदीप जोगदंड, सुरेश लांडे, संदीप वानखडे, दादाराव टापरे, अकबर खान, रोशन पटले, इमाम चौधरी आणि महिला कर्मचारी वैशाली रामेकर यांचा समावेश होता.

## चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

अर्ज क्रमांक :- १३७/२०२५ कलम १९

**सार्वजनिक न्यासाचे नाव -** अकोला चर्च, ऑफ ख्राईस्ट चॅरिटेबल ट्रस्ट, अकोला ता. जि. अकोला

**अर्जदार :-** श्री. सुरेश यशवंतराव रौराळे रा.ख्रिचन कब्रस्तान जवळ, सिंधी कॅम्प, पक्की खोली अकोला ता.जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज या संबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

१) वर नममद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?

२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

अ) जंगम मिळकत (वर्णन) :-७००/-रुपये आहे.

आ) स्थावर मिळकत (वर्णन) :- काही नाही.

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखे पासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचा केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकाला बाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-१, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक २६/१२/२०२५ रोजी दिली.

शिक्का

प्र. अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अकोला विभाग अकोला.

# उष्माघातापासून बचावासाठी भाजपच्या माजी नगरसेवकाचा अनोखा उपक्रम



■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला शहरासह संपूर्ण जिल्ह्यात उन्हाचा पारा दिवसेंदिवस नवे उच्चांक गाठत असून नागरिक उष्णतेने अक्षरशः होरपळून निघत आहेत. प्रखर उन्हामुळे मोलमजुरी करणारे कामगार, भाजी विक्रेते, बांधकाम मजूर, महावितरण कर्मचारी तसेच विविध शासकीय कामांसाठी फिरणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य तथा माजी नगरसेवक गोपी ठाकरे यांनी सामाजिक बांधिलकी जपत गरजूंसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम राबविला आहे.

उन्हाच्या तीव्रतेपासून बचाव व्हावा आणि उष्माघाताचा धोका कमी व्हावा यासाठी त्यांनी शेकडो गरजू नागरिकांना कानाचे दुपट्टे वाटप केले. शहरातील विविध भागांत जाऊन प्रत्यक्ष गरजूंना दुपट्टे देत त्यांनी सामाजिक दायित्वाची जाणीव पुन्हा अधोरेखित केली. त्यांच्या या उपक्रमामुळे अनेकांना दिलासा मिळाल्याची भावना नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

गोपी ठाकरे हे यापूर्वीदेखील विविध सामाजिक उपक्रमांमुळे चर्चेत राहिले आहेत. उन्हाळ्यात मुक्या प्राण्यांसाठी पाण्याची कटोरी ठेवण्याचा उपक्रम, कडाक्याच्या थंडीत गरजूंना ब्लँकेट वाटप, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी ऑटोचालकांना गुलाबाचे फूल देत गांधीगिरीच्या माध्यमातून जनजागृती, तसेच रस्त्यांवरील विद्युत पोलवर रेडियम लावणे व दिशादर्शक फलक बसविणे अशा अनेक उपक्रमांतून त्यांनी समाजाभिमुख कार्य सातत्याने केले आहे.

### गोपी ठाकरे यांच्याकडून शेकडो गरजूंना दुपट्टे वाटप

विशेष म्हणजे कोणतेही पद नसतानाही लोकप्रतिनिधी म्हणून असलेली सामाजिक जबाबदारी ते सातत्याने पार पाडत आहेत. जनहिताच्या प्रश्नांवर संवेदनशीलता दाखवत प्रत्यक्ष कृती करणारा लोकप्रतिनिधी कसा असावा, याचा आदर्शच त्यांनी आपल्या कार्यातून घालून दिला आहे. वाढत्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर त्यांनी राबविलेल्या दुपट्टा वाटप उपक्रमाचे शहरात सर्वत्र कौतुक होत आहे.

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४४७/२०२६ — प्रोसेस नं.४४४४/२०२६
चौ.ता. १९/०६/२०२६ — दिनांक : ०२/०४/२०२६

**अर्जदार :** १. अभिजीत श्रीक्रिष्णा मांडवेकर रा. व्दारा श्रीकिष्णा मांडवेकर, हनुमान मंदिर जवळ, रवी नगर, संताजी नगर जवळ, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. भावना आनंद हिरलेकर रा. फ्लॅट नं. ६, धनकोर अपार्टमेंट, साई मंदिराच्या मागे, कल्पतरू नगर, अशोक मार्ग, नाशिक. ता. जि. नाशिक. ३. सौ. कल्पना कुशाल शुक्ला रा. फ्लॅट नं. १३ए, बिल्डिंग नं. ए-२, मेडिकल कॉलेज, अडगाव, नाशिक, ता. जि. नाशिक.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.

**मयताचा पत्ता :-** मयत : १. श्रीक्रिष्णा नारायण मांडवेकर २. मंगला श्रीकिष्णा मांडवेकर

**पत्ता :-** रा. हनुमान मंदिर जवळ, रवी नगर, संताजी नगर जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्रीक्रिष्णा नारायण मांडवेकर यांचे दि. २५/०२/२०२६ रोजी व तसेच मयत मंगला श्रीक्रिष्णा मांडवेकर यांचे दि. ०८/११/२०२० रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०२/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# तेल्हारा बायपासचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

## बैठका, घोषणा आणि आश्वासनांनंतरही प्रत्यक्ष कामाचा मागमूस नाही

● वाहतूक कोंडी, अपघातांचा वाढता धोका

● नागरिकांकडून स्पष्ट कृती आराखड्याची मागणी

■ *प्रतिनिधी | तेल्हारा* ■

*तेल्हारा शहराच्या बहुप्रतिक्षित बायपासचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला असून, गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या या योजनेबाबत प्रशासनाच्या संथ हालचालींविरोधात नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. वाढत्या वाहतुकीच्या पार्श्वभूमीवर शहरासाठी अत्यावश्यक मानल्या जाणाऱ्या बायपासच्या संदर्भात गेल्या वर्षी ७ जुलै २०२५ रोजी बैठक घेऊन प्रक्रियेला प्रारंभ करण्यास मंजुरी देण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले होते. त्या वेळी शहरवासीयांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले; मात्र जवळपास वर्ष उलटूनही प्रत्यक्षात कोणतीही ठोस प्रगती दिसून आलेली नाही.*

तेल्हारा शहरातून जाणारा मुख्य मार्ग हा व्यापारी, शैक्षणिक आणि ग्रामीण भागाशी जोडणारा महत्त्वाचा दळणवळण मार्ग मानला जातो. शहरातील वाढती लोकसंख्या, वाहनांची वाढलेली संख्या आणि शहराच्या मध्यवर्ती भागातून होणारी अवजड वाहनांची वाहतूक यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था दिवसेंदिवस अधिकच विस्कळीत होत चालली आहे. सकाळ व सायंकाळच्या वेळेत मुख्य चौकांमध्ये मोठ्या प्रमाणात वाहनांच्या रांगा लागतात. बाजाराचे दिवस, धार्मिक कार्यक्रम किंवा मिरवणुका निघाल्यास वाहतुकीवर अतिरिक्त ताण निर्माण होऊन संपूर्ण शहरात कोंडीची परिस्थिती निर्माण होते.

स्थानिक नागरिकांच्या मते, वाहतुकीच्या या समस्येमुळे व्यापाऱ्यांचे व्यवहार प्रभावित होत असून शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक, शेतकरी, रुग्णवाहिका सेवा आणि प्रवासी यांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे. काही वेळा वाहतूक कोंडीमुळे आपत्कालीन सेवांनाही विलंब होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. शहरातील अरुंद रस्ते आणि वाढती वाहतूक यामुळे अपघातांचा धोका वाढत असून नागरिकांमध्ये सुरक्षेबाबत चिंता व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे, बायपाससंदर्भात लोकप्रतिनिधींनी स्वतः पुढाकार घेत संबंधित विभागांसोबत बैठक घेतली होती. त्या बैठकीनंतर नागरिकांनी समाधान व्यक्त करत प्रशासनाकडून लवकरच ठोस हालचाली होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. मात्र त्यानंतर ना प्राथमिक सर्वेक्षणाची माहिती जाहीर झाली, ना निधी मंजुरीबाबत स्पष्टता आली, ना जमीन संपादन प्रक्रियेचा तपशील समोर आला. परिणामी, बायपासचा प्रश्न पुन्हा एकदा कागदोपत्रीच राहणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

शहरातील जाणकारांच्या मते, तेल्हारा शहराची भौगोलिक रचना आणि वाढते शहरीकरण लक्षात घेता बायपास हा केवळ पर्यायी रस्ता नसून भविष्यातील वाहतूक नियोजनाचा अत्यावश्यक भाग आहे. शहराच्या मध्यवर्ती भागातील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी तसेच बाह्य वाहतूक शहराबाहेर वळविण्यासाठी बायपासची आवश्यकता गेल्या अनेक वर्षांपासून व्यक्त केली जात आहे. मात्र प्रशासकीय प्रक्रियेतील विलंब, निधी मंजुरीतील अडथळे आणि समन्वयाचा अभाव यामुळे प्रकल्प रखडत असल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, नागरिकांकडून आता प्रशासनाने बायपास संदर्भातील संपूर्ण स्थिती स्पष्ट करावी, अशी मागणी पुढे येत आहे. सर्वेक्षणाची सद्यस्थिती, संभाव्य मार्ग, जमीन संपादन प्रक्रिया, निधी मंजुरी आणि प्रत्यक्ष कामाच्या प्रारंभाबाबत अधिकृत वेळापत्रक जाहीर करण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेऊन दीर्घकालीन नियोजन करणे आवश्यक आहे. केवळ बैठका आणि आश्वासने यापलीकडे जाऊन प्रत्यक्ष अंमलबजावणीला गती दिली नाही तर आगामी काळात तेल्हारा शहरातील वाहतूक प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १७०**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# वर्धा काँग्रेसमध्ये ‘कोल्हे’ राज; कार्यकर्ते मात्र राजकीय वनवासात

## जिल्हाध्यक्ष निवडीत लॉबीगिरीचा स्फोट; काँग्रेसची संघटना की गटांची दुकानदारी?

**वर्धा/ रवींद्र लाखे**

जिल्ह्यात काँग्रेस पक्ष सध्या विरोधकांशी कमी आणि स्वतःच्याच घरातील गटबाजीशी अधिक झुंजताना दिसत आहे. बाहेर ४७ अंश तापमान असले तरी काँग्रेसच्या अंतर्गत राजकारणात त्याहून अधिक तापलेला पारा पाहायला मिळत आहे. सुनील कोल्हे यांच्या जिल्हाध्यक्षपदी नियुक्तीनंतर काँग्रेसमध्ये असंतोषाचा ज्वालामुखी फुटला असून जिल्हाध्यक्ष जोमात आणि कार्यकर्ते कोमात अशी उपरोधिक चर्चा आता चहाटळ्यांपासून सोशल मीडियापर्यंत रंगू लागली आहे.

सृजन संघटन अभियान च्या नावाखाली राज्यभर मुलाखती, निरीक्षक, बैठका, अभिप्राय आणि कार्यकर्त्यांशी संवादाचा मोठा गाजावाजा करण्यात आला. पण अखेर निर्णय मात्र नेहमीप्रमाणे बंद दाराआडच्या लॉबीगिरीतूनच झाला का? असा प्रश्न आता काँग्रेसच्याच कार्यकर्त्यांनी उपस्थित केला आहे. तीन निरीक्षक आले, मुलाखती झाल्या, शेकडो कार्यकर्त्यांची मते घेतली; पण शेवटी ठरलं ते आधीच ठरलेलं होतं, अशी बोचरी प्रतिक्रिया आता उघडपणे दिली जात आहे. राजकीय वर्तुळात चर्चा अशी आहे की, माजी मंत्री रणजीत कांबळे यांनी जिल्ह्यातील आपले वर्चस्व कायम ठेवण्यासाठीच सुनील कोल्हे यांची वर्णी लावली. प्रदेश नेतृत्वाशी असलेली जवळीक, लॉबीगिरी आणि गटबाजीच्या जोरावर ही नियुक्ती घडवून आणल्याचा आरोप काँग्रेसमधीलच नाराज गट करत आहेत. काँग्रेसमध्ये आता कार्यकर्त्यांपेक्षा गॉडफादर महत्त्वाचे झाले, अशी उपहासात्मक टीका कार्यकर्त्यांतून होत आहे. दरम्यान, सोशल मीडियावर काँग्रेसची अक्षरशः धुलाई सुरू झाली आहे. महिला जिल्हाध्यक्ष अरुणा धोटे यांनी मनोज चांदुरकर यांच्या समर्थनार्थ केलेली पोस्ट, युवक काँग्रेसचे पदाधिकारी शुभम ढोके यांची नाराजी आणि सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष नरेंद्र चाफले यांच्या पोस्टमुळे पक्षातील अंतर्गत धुमसणारा संघर्ष उघड्यावर आला आहे. त्यातच वरिष्ठ नेत्यांनी नव्या जिल्हाध्यक्षांना दिलेल्या शुभेच्छांनी आगीत तेल ओतण्याचे काम केले आहे.

काँग्रेसच्या जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये सर्वाधिक नाराजी दिसत आहे. ‘आम्ही आयुष्यभर झेंडे उचलायचे आणि पदे मात्र गटबाजांना द्यायची, असा संताप अनेकांनी व्यक्त केला. काही कार्यकर्त्यांनी तर काँग्रेसमध्ये संघटना उरली नाही, आता फक्त गटांची दुकानदारी सुरू आहे, अशी जहरी टीका केली. याहून मोठी चर्चा म्हणजे माजी मंत्री रणजीत कांबळे यांच्यावर सत्ताधाऱ्यांशी ‘मैत्रीपूर्ण’ संबंध ठेवल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे काँग्रेसची भूमिका विरोधकाची राहिली आहे की ‘सॉफ्ट सपोर्ट’ची, असा प्रश्न आता काँग्रेसच्याच बैठकीत विचारला जाऊ लागला आहे. भाजपला रोखण्याऐवजी काँग्रेस स्वतःच्या गटबाजीच्या दलदलीत अडकली असल्याची भावना तळागाळात निर्माण झाली आहे. एकीकडे भाजप गावागावात संघटना मजबूत करत आहे, तर दुसरीकडे काँग्रेसमध्ये कोण कुणाचा माणूस? याचाच खेळ रंगला आहे.

आगामी निवडणुकांच्या तोंडावर सुरू असलेला हा संघर्ष पाहता वर्धा काँग्रेस स्वतःच स्वतःचा राजकीय अंत लिहित आहे का, अशी चर्चा आता मतदारांमध्येही सुरू झाली आहे. आता प्रश्न फक्त एकच काँग्रेस खरंच संघटन उभी करणार की गटबाजीच्या आगीत स्वेतःच राख होणार

**घराणेशाहीने काँग्रेस डुबली, तरी वर्ध्यात तोच जुना खेळ**

वर्धा काँग्रेसमध्ये वर्षानुवर्षे सुरू असलेल्या घराणेशाहीच्या राजकारणावर आता कार्यकर्त्यांनीच उघडपणे बोट ठेवण्यास सुरुवात केली आहे.


काँग्रेसचा जनाधार संपला, कार्यकर्ते दूर गेले, पक्ष रसातळाला गेलाष्ठ तरीही काही घराण्यांची मक्तेदारी संपायला तयार नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया तळागाळातून उमटत आहे. जिल्ह्यात राव, मेघे, शेंडे आणि कांबळे गटाचेच राजकारण फिरत राहिले. प्रभारावांनंतर त्यांची मुलगी चारुलता टोकस, रणजीत कांबळे, तर प्रमोद शेंडे यांच्यानंतर शेखर शेंडे आणि दत्ता मेघे यांच्यानंतर सागर मेघे असा घरातूनच वारस तयार करण्याचा राजकीय पॅटर्न काँग्रेसमध्ये कायम राहिला. त्यामुळे सामान्य कार्यकर्त्यांना केवळ झेंडे उचलण्यापुरतेच मर्यादित ठेवण्यात आल्याची भावना आता तीव्र झाली आहे. काँग्रेसमध्ये आता कार्यकर्त्यांपेक्षा आडनाव मोठं झालं आहे, अशी बोचरी टीका नाराज कार्यकर्ते करत आहेत. पक्षात नवीन चेहऱ्यांना संधी देण्याऐवजी पुन्हा त्याच घराण्यांच्या भोवती सत्ता फिरत असल्याने काँग्रेसची अवस्था दिवसेंदिवस दयनीय होत चालल्याचे बोलले जात आहे. आता मात्र तळागाळातील कार्यकर्ते थेट प्रश्न करत आहेत, वर्धा काँग्रेस घराणेशाहीच्या विळख्यातून बाहेर पडणार की पुन्हा त्याच कुटुंबांच्या राजकारणात पक्ष गाडला जाणार.

# कर वसूल जोरात, पण घंटागाडी कोमात!

**वर्धा/जनमाध्यम**

शहरात स्वच्छतेचा पूर्णपणे बोजवारा उडाला असून अनेक प्रभागांत घंटागाड्या गायब झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत अभियान’अंतर्गत कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेली घंटागाडी योजना आता भ्रष्टाचाराच्या कचऱ्यात गाडली गेल्याची चर्चा शहरभर रंगली आहे. नागरिकांकडून दरवर्षी ३५० ते ७५० रुपयांपर्यंत स्वच्छता कर वसूल केला जातो, मात्र प्रत्यक्षात कचरा उचलण्यासाठी घंटागाडीच येत नसल्याने शहरभर घाणीचे साम्राज्य पसरले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांच्या स्वच्छ भारत अभियानाचा मोठा गाजावाजा करत वर्धा नगरपालिकेने घराघरांतून ओला-सुका कचरा संकलनाची योजना सुरू केली होती. गाडीवाला आया घरसे कचरा निकाल या गाण्याने सकाळी शहर दणाणायचे. नागरिक हातात हिरव्या-निळ्या बादल्या घेऊन घंटागाडीची वाट पाहायचे. मात्र आता ना गाडीचा भोंगा, ना कचरा संकलन! अनेक प्रभागांत दिवसनदिवस घंटागाडीच फिरकत नसल्याने नागरिकांनी रस्त्यावर, नाल्यांत आणि रिकाम्या जागांवर कचरा टाकण्यास सुरुवात केली आहे. परिणामी शहरातील



**घंटागाडीचा घोटाळा, कचऱ्यात गुदमरले वर्धा**

गल्ल्या, चौक, नाले आणि कचराकुंड्या घाणीने ओसंडून वाहत आहेत. दुर्गंधीने नागरिकांचे जगणे मुश्किल झाले असून डास, माश्या आणि रोगराईचा धोका वाढला आहे. मार्केट भागाची परिस्थिती तर अधिकच बिकट झाली आहे. नियमाप्रमाणे शहरात दररोज २० घंटागाड्या फिरणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात अवघ्या दहा गाड्या रस्त्यावर उतरतात. अनेक गाड्यांचे भोंगे बंद, काही गाड्यांत चालक नाही तर काहींना सहाय्यक नाही. घंटागाड्यांची नियमित धुलाई व सर्व्हिसिंगही होत नसल्याने गाड्यांतून असह्य दुर्गंधी पसरते. महिलांना नाकाला कपडा बांधून कचरा टाकावा लागत आहे. याहून गंभीर बाब म्हणजे कंत्राटदारांची लाखो रुपयांची बिले मात्र नियमीतपणे काढली जात असल्याचा आरोप होत आहे. जुन्या कंत्राटदाराने नवीन घंटागाड्याच भंगारात काढल्याची चर्चा असताना मजुरांचे वेतन आणि भविष्यनिर्वाह निधीचे लाखो रुपये बुडाल्याचाही आरोप पुढे आला आहे. तरीही नगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून कोणतीही कठोर कारवाई होत नसल्याने अर्थपूर्ण व्यवहार झाल्याची कुजबुज शहरात सुरू झाली आहे. प्रभाग क्रमांक १३ मधील झावरा जीन, कृष्णनगर, पोद्दार बगीचा, गुरुद्वारा, जैन मंदिर, एसटी डेपो, रेल्वे स्टेशन, बजाज चौक आणि मोहता जिन परिसरात नियमित घंटागाडी न आल्यास टेम्पोभर कचरा मुख्याधिका ऱ्यांच्या दारात टाकू, असा थेट इशारा नगरसेवक यशवंत झाडे यांनी दिला आहे. स्वच्छतेच्या नावावर कोट्यवधी रुपये खर्च झाले, कर नागरिकांनी भरला पण शहर मात्र कचऱ्याच्या विळख्यात अडकले. त्यामुळे ‘स्वच्छ वर्धा’चे स्वप्न दाखवणारे प्रशासन आता जनतेच्या रोषाच्या भोवऱ्यात सापडले आहे. जनतेचा पैसा लुटून शहर कचऱ्यात ढकललं - यशवंत झाडे नागरिक नियमित कर भरत आहेत, मग त्यांना सेवा का मिळत नाही? घंटागाडी योजना ही स्वच्छतेसाठी होती की कंत्राटदार पोसण्यासाठी, असा प्रश्न आता जनतेला पडला आहे. शहरात सर्वत्र कचऱ्याचे ढिग साचले असून प्रशासन झोपेचे सोंग घेत आहे. प्रभागात तातडीने नियमित घंटागाडी सुरू झाली नाही तर आंदोलन छेडू आणि टेम्पोभर कचरा नगरपालिकेत नेऊन टाकू, असा संतप्त इशारा नगरसेवक यशवंत झाडे यांनी दिला.

# मोबाईलच्या विळख्यात बालपण

## अभ्यासासाठी ‘डिजिटल संचारबंदी’ची हाक



**साहूर/जनमाध्यम**

कोरोना काळात ऑनलाइन शिक्षणासाठी विद्यार्थ्यांच्या हातात आलेला मोबाईल आता त्यांच्या भवितव्यालाच ग्रहण लावत असल्याची चिंता ग्रामीण भागातील पालकांनी व्यक्त केली आहे. मोबाईल व टीव्हीच्या वाढत्या वापरामुळे विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे अक्षम्य दुर्लक्ष होत असून मुलांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी सायंकाळच्या अभ्यासाच्या वेळेत मोबाईल आणि टीव्हीवर बंदी घालावी, अशी मागणी साहूर व परिसरातील त्रस्त पालकांनी केली आहे.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी दिवस-रात्र मोबाईलला चिकटून राहत असल्याने अभ्यास, वाचन, मैदानी खेळ आणि सामाजिक संस्कार यापासून दूर जात असल्याचे चित्र आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, असे सांगत पालकांनी शिक्षणाला पुन्हा प्राधान्य देण्यासाठी ग्रामपंचायत प्रशासनाने पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. सायंकाळी ठरावीक वेळेत विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासच करावा, पालकांनीही मुलांच्या हातातून मोबाईल दूर ठेवून त्यांच्याकडून अभ्यास करून घ्यावा, यासाठी ग्रामपंचायतीने कडक नियमावली तयार करावी, अशी मागणी होत आहे. दरम्यान, अमरावती जिल्ह्या तील पिंपळखुटा गावातील उपक्रमाचा दाखला देत साहूरमधील पालकांनी प्रेरणादायी उदाहरण पुढे केले आहे. त्या गावात दररोज सायंकाळी सात वाजता सायरन वाजवून मोबाईल आणि टीव्ही बंद करण्याची सामूहिक शिस्त सुरू करण्यात आली आहे. सायरननंतर विद्यार्थी अभ्यासाला बसतात आणि ग्रामस्थही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देतात.

मोबाईलच्या नादात भरकटणाऱ्या पिढीला अभ्यासाची दिशा देण्यासाठी गावपातळीवर कठोर निर्णय घेण्याची वेळ आली आहे, असे मत अनेक सुशिक्षित पालकांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, एकाग्रता आणि अभ्यासाची ओढ निर्माण करण्या साठी साहूर परिसरातही असा उपक्रम राबवावा, अशी जोरदार मागणी आता पुढे येत आहे.

### शिवीगाळचा जाब विचारताच युवकावर हल्ला

**समुद्रपूर -** तालुक्यातील जाम येथील डॉ. आंबेडकर वॉर्डमध्ये शिवीगाळ थांबविण्यास सांगितल्याच्या कारणावरून युवकाला काठीने मारहाण करण्यात आल्याची घटना उघडकीस आली. या प्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. रोशन भाऊराव लामसोंगे यांच्या तक्रारीनुसार, त्यांच्या घराशेजारी राहणारा अनिल खुळसंगे हा त्यांच्या भावाला वारंवार टोमणे मारत होता. यावेळी शिवीगाळ का करता, अशी विचारणा केल्याने अनिल खुळसंगे, सुनिल खुळसंगे व निरज शेडमाके यांनी संगनमत करून रोशन यांच्यावर काठीने हल्ला केला. या मारहाणीत रोशन जखमी झाले. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

# नंदोरी चौक की मृत्यू चौक?

**हिंगणघाट/जनमाध्यम**

शहरातील नंदोरी चौक पुन्हा एकदा अतिक्रमणाच्या मुद्द्यावरून पेटला असून नागरिकांनी प्रशासन आणि लोकप्रतिनिधींना थेट धारेवर धरले आहे. कोरोना काळात तात्पुरत्या स्वरूपात देण्यात आलेली भाजी विक्रेत्यांची परवानगी पुढे कायमस्वरूपी अतिक्रमणात बदलली आणि गेल्या पाच वर्षांत या भागात अक्षरशः वाहतुकीचा मृत्यूचा सापळाच तयार झाला होता. आता अतिक्रमण हटवल्यानंतर नागरिकांनी सुटकेचा श्वास घेतला असला तरी पुन्हा अतिक्रमण झाले आणि जीवितहानी झाली तर जबाबदार कोण असा प्रश्न जनतेने उपस्थित केला आहे.

कोरोना महामारीच्या काळात गर्दी टाळण्यासाठी नंदोरी चौक आणि आंबेडकर शाळेसमोर काही विक्रेत्यांना तात्पुरती दुकाने लावण्यास परवानगी देण्यात आली होती. त्यावेळी स्थानिक आमदार, तत्कालीन नगराध्यक्ष आणि प्रशासनाने समन्वय साधत हा निर्णय घेतला होता. मात्र, आंबेडकर शाळेसमोरील रस्ता आधीच अरुंद आणि वन-वे असल्याने पुढे हीच तात्पुरती व्यवस्था नागरिकांच्या जीवावर उठणारी ठरली. गेल्या पाच वर्षांत अतिक्रमणाने इतके विक्राळ रूप धारण केले की शाळकरी मुले, कॉलेज विद्यार्थी, ट्युशनला जाणारे युवक, पालक आणि ज्येष्ठ नागरिकांना रोज ट्रॅफिक जामच्या नरकयातना सहन कराव्या लागत होत्या. रस्त्याच्या कडेला पायी चालणाऱ्यांनाही जागा उरली नव्हती. मोठ्या वाहनांच्या धडकेत अपघात होण्याची भीती कायम डोक्यावर होती. तरीही प्रशासन आणि लोकप्रतिनिधी केवळ बघ्याची भूमिका घेत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

विशेष म्हणजे अतिक्रमण हटवण्याऐवजी काही दिवसांपूर्वी प्रशासनाने येथील बस थांबाच बंद करण्याचा निर्णय घेतला होता. पोलिसांच्या सूचनेवरून डेपो व्यवस्थापनाने घेतलेल्या या निर्णयामुळे जनतेत तीव्र संताप उसळला. अतिक्रमण हटवण्याऐवजी जनतेचीच गैरसोय का असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित करत आंदोलनाचा इशारा दिला होता. अखेर वाढता रोष लक्षात घेत प्रशासनाला झोपेतून जाग आली आणि नुकतेच अतिक्रमण हटवून रस्ता मोकळा करण्यात आला. दरम्यान, हिंगणघाट शहर व परिसरात अलीकडेच झालेल्या भीषण अपघातांत आई-वडिलांसह मुलीचा मृत्यू झाला, तर दुसऱ्या दुर्घटनेत आणखी नागरिकांचा बळी गेला. या घटनांमुळे शहर हादरले असताना नंदोरी चौकातील अतिक्रमणाचा मुद्दा आणखी गंभीर बनला आहे. मुठभर लोकांच्या आर्थिक आणि राजकीय स्वार्थासाठी हजारो नागरिकांच्या जीवाशी खेळ सुरू आहे का असा प्रश्न आता उघडपणे विचारला जात आहे. स्थानिक नागरिकांनी स्पष्ट शब्दांत इशारा दिला आहे की, नंदोरी चौकात पुन्हा अतिक्रमण दिसल्यास ती प्रशासनाची थेट निष्काळजीपणा मानली जाईल. नगर परिषद, पोलिस प्रशासन, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नगराध्यक्ष यांनी आता कायमस्वरूपी कठोर भूमिका घेतली नाही तर भविष्यातील दुर्घटनांना तेच जबाबदार राहतील. मुठभर लोकांचा नफा महत्त्वाचा की हजारो विद्यार्थ्यांचे प्राण हा प्रश्न आता हिंगणघाटकरांच्या तोंडी आहे. नंदोरी चौकातील रस्ता सध्या मोकळा झाला असला तरी जनतेची नजर आता प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे लागली आहे.

# नव्या घरात वृद्धाची गळफास घेऊन आत्महत्या

**सेलू/ जनमाध्यम**

तालुक्यातील केळझर येथे ६८ वर्षीय वृद्धाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना रविवारी दुपारच्या सुमारास उघडकीस आली. रायबा कुंबरे (वय ६८) असे मृत वृद्धाचे नाव असून, या घटनेमुळे केळझरसह परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. आत्महत्येमागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून सेलू पोलीस पुढील तपास करीत आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, रायबा कुंबरे यांनी नुकतेच नवीन घर बांधले होते. मात्र गृहप्रवेश अद्याप झाला नसल्याने ते त्या घरात एकटेच राहत होते. रविवारी दुपारी साडेचार ते पाच वाजताच्या दरम्यान घरात कोणीही नसताना त्यांनी गळफास घेऊन जीवनयात्रा संपविल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. दरम्यान, एक शेजारी काही कामानिमित्त त्यांच्या घरी गेला असता दरवाजा उघडताच रायबा कुंबरे हे छताला गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसून आले. हा प्रकार पाहताच परिसरात एकच खळबळ उडाली. गावकऱ्यांनी तत्काळ सेलू पोलिसांना माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच सेलू पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी सेलू ग्रामीण रुग्णालयात रवाना करण्यात आला. रायबा कुंबरे यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सून आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या अकस्मात निधनामुळे कुंबरे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण केळझर गाव शोकमग्न झाले आहे. आत्महत्येमागचे कारण शोधण्याचे काम पोलीस करीत आहेत.



## भरधाव दुचाकीची धडक;

**हिंगणघाट -** शहरातील अब्दुल्ला हाइट समोरील मार्गावर भरधाव दुचाकीने समोरील दुचाकीला जोरदार धडक दिल्याने युवक गंभीर जखमी झाला. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे. पियुष अभय कोथळे असे जखमी युवकाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, एमएच-३२-सीएच-८८०२ क्रमांकाच्या दुचाकीने वेगात येत एमएच-३२-एक्स-५८६२ क्रमांकाच्या दुचाकीला मागून धडक दिली. धडक इतकी जबर होती की पियुष गंभीर जखमी झाले. परिसरातील नागरिकांनी तत्काळ मदत करत त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले. शहरात वाढत्या वेगवान वाहनचालकांमुळे अपघातांच्या घटना वाढत असल्याने नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे. पुढील तपास हिंगणघाट पोलीस करीत आहेत.

## युवकाची तलवारीच्या जोरावर दहशत

**वर्धा -** रामनगर परिसरात तलवार घेऊन दहशत माजविणाऱ्या युवकाला पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून धारदार तलवार जप्त करण्यात आली आहे. या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. किस्ना बाबाराव वाडगुळे असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांना आरोपी परिसरात तलवार घेऊन फिरत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार रामनगर पोलिसांनी तत्काळ कारवाई करत त्याला ताब्यात घेतले. आरोपीकडून एक तलवार जप्त करण्यात आली .

# आचारसंहितेचा फटका!

## ‘तीर्थ दर्शन योजना’ची बौद्ध गया यात्रा स्थगित

**सेलू/ जनमाध्यम**

राज्य शासनाच्या ‘मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजने’अंतर्गत नागपूरहून २५ मे रोजी निघणारी बौद्ध गया येथील महाबोधी मंदिराची विशेष यात्रा ऐनवेळी स्थगित करण्यात आली आहे. विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर १८ मेपासून लागू झालेल्या आदर्श आचारसंहितेमुळे प्रशासनाने हा निर्णय घेतला. त्यामुळे निवड झालेल्या १५० ज्येष्ठ लाभार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेतून ज्येष्ठ नागरिकांना देशातील प्रमुख तीर्थक्षेत्रांचे दर्शन घडवून आध्यात्मिक समाधान देण्याचा शासनाचा उद्देश आहे. त्यानुसार बौद्ध गया येथील महाबोधी मंदिरासाठी विशेष रेल्वे सेवेद्वारे यात्रा आयोजित करण्यात आली होती. सर्व तयारी पूर्ण झाल्यानंतर अचानक आचारसंहिता लागू झाल्याने ही यात्रा तात्पुरती थांबवावी लागली. समाज कल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्तांनी पात्र लाभार्थ्यांना संयम बाळगण्याचे आवाहन केले असून, यात्रेची नवीन तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. दरम्यान, अनेक ज्येष्ठ नागरिकांनी यात्रेसाठी आवश्यक तयारी पूर्ण केली होती. काहींनी वैद्यकीय तपासणी, प्रवासाची बांधाबांध आणि अन्य नियोजनही केले होते. त्यामुळे ऐनवेळी यात्रा रद्द झाल्याने लाभार्थ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. राज्यात निवडणुकीची आचारसंहिता लागू होताच विविध शासकीय कार्यक्रमांवर निर्बंध आले असून, ‘मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना’ही त्याला अपवाद ठरलेली नाही. प्रशासनाकडून आता आचारसंहिता संपल्यानंतर नव्या तारखेची घोषणा करण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# ‘स्मार्ट मीटर’: वीज ग्राहकांचा विश्वासू आणि हक्काचा सोबती


**वर्धा/जनमाध्यम**

महाराष्ट्राच्या ऊर्जा क्षेत्राला आधुनिकतेची आणि प्रगतीची नवी दिशा देत, महावितरणतर्फे संपूर्ण राज्यात ‘स्मार्ट मीटर’ बसविण्याची महत्त्वाकांक्षी मोहीम अत्यंत वेगाने आणि यशस्वीपणे राबविली जात आहे. ग्राहकांना अधिक सक्षम, पारदर्शक, जलद आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची सेवा देण्याच्या उत्कृष्ट उद्देशाने सुरू झालेला हा उपक्रम राज्याच्या ऊर्जाक्षेत्रातील एक क्रांतिकारी पाऊल ठरत आहे. सुरुवातीचा किरकोळ संभ्रम आणि शंका दूर सारून, जागरूक ग्राहक आता या अत्यंत फायदेशीर आणि आधुनिक तंत्रज्ञानाचे उत्स्फूर्त आणि सकारात्मकतेने स्वागत करत आहेत.

ग्राहकांच्या या वाढत्या विश्वासामुळेच या मोहिमेने अल्पावधीतच एक मोठा आणि ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. आजच्या घडीस संपूर्ण महाराष्ट्रात तब्बल १ कोटी ७ लाखांवर ग्राहकांनी हे स्मार्ट मीटर आनंदाने स्वीकारले असून ते यशस्वीपणे बसविण्यात आले आहेत. नागपूर परिमंडलाचा विशेष विचार केल्यास, नागपूर जिल्ह्यात सुमारे ५ लाख ५५ हजार, तर वर्धा जिल्ह्यातील १ लाख ४० हजार ग्राहकांनी या डिजिटल सुविधेचा लाभ घेण्यास सुरुवात करून आधुनिकतेकडे पाऊल टाकले आहे.

पारंपरिक मीटरच्या तुलनेत हे नवीन स्मार्ट मीटर तंत्रज्ञानाच्या दृष्टीने अत्यंत प्रगत, अचूक आणि सुरक्षित आहेत. हे मीटर्स थेट महावितरणच्या मुख्य केंद्रीय प्रणालीशी (सेंट्रल सर्वर) जोडलेले असल्यामुळे दरमहा ठरलेल्या निश्चित तारखेला, कोणत्याही मानवी हस्तक्षेपाशिवाय अचूक रीडिंग डिजिटल पद्धतीने आपोआप नोंदवले जाते.

परिणामी, चुकीच्या किंवा अंदाजे वीज बिलांची जुनी समस्या आता मुळापासून पूर्णपणे संपुष्टात आली आहे. ग्राहकांना वेळेवर आणि १०० टक्के अचूक बिले मिळत असल्याने, सर्वसामान्य नागरिकांना आपल्या कौटुंबिक बजेटचे आगाऊ नियोजन करणे आता अधिक सोपे झाले आहे. या प्रगत तंत्रज्ञानाचे सर्वात मोठे आणि



मुख्य आकर्षण म्हणजे महावितरणच्या अधिकृत मोबाईल ॲपद्वारे ग्राहकांना मिळणारा ‘रिअल-टाइम’ म्हणजेच तात्काळ वीज वापराचा डेटा होय. ग्राहक आता आपल्या मोबाईल स्क्रीनवर दररोज, अगदी दर तासाला किती वीज वापरली जात आहे, हे कुठेही न जाता घरी बसून एका क्लिकवर सहज पाहू शकत आहेत. यामुळे ग्राहकांना आपल्या वीज वापराच्या सवयींमध्ये सकारात्मक बदल करून पैशांची मोठी बचत करणे सहज शक्य झाले आहेतसेच, मीटर बदलल्यामुळे वीज दरात किंवा प्रति युनिट दरात कोणताही वाढीव बदल झालेला नाही.

‘महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने’ ठरवून दिलेलेच अधिकृत दर यासाठी लागू राहणार आहेत. या सर्व फायद्यांशिवाय, स्मार्ट मीटर वापरणाऱ्या ग्राहकांसाठी लागू असलेल्या टीओडी वीज दरांमुळे सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंतच्या वीज वापरामध्ये तब्बल ८५ पैसे प्रति युनिटची घसघशीत सवलत देखील ग्राहकांना मिळत आहे. हे मीटर पूर्वीप्रमाणेच ‘पोस्टपेड’ स्वरूपातच कार्यरत राहणार आहेत, त्यामुळे ग्राहकांनी मीटरबाबत पसरणाऱ्या कोणत्याही चुकीच्या अफवांवर किंवा भ्रामक माहितीवर अजिबात विश्वास ठेवू नये.

वीज पुरवठ्याची गुणवत्ता आणि दर्जा अधिक उंचावण्यातही हे स्मार्ट मीटर्स मैलाचा दगड ठरत आहेत. परिसरातील वीज पुरवठ्यात किंवा ट्रान्सफॉर्मरमध्ये काही तांत्रिक बिघाड झाल्यास, त्याची ऑटोमॅटिक माहिती महावितरणच्या नियंत्रण कक्षाला (कंट्रोल रूम) तात्काळ आणि आपोआप मिळते. यामुळे भविष्यात ग्राहकांचा तक्रार करण्याचा वेळ वाचेल, महावितरणची यंत्रणा स्वतःहून सक्रिय होईल आणि नागरिकांना अखंडित तसेच दर्जेदार वीज पुरवठा मिळेल.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - १७८

आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१

फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८

**ई-मेल**-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# ‘देव तारी त्याला कोण मारी’ची प्रचिती

## चंद्रभागा नदीत कोसळला ट्रक

**चांदूर रेल्वे प्रतिनिधी :-** तालुक्यातील घुईखेड जवळ सोमवारी नागपूर - छत्रपती संभाजी नगर हायवेवर घडलेल्या एका भीषण अपघाताने संपूर्ण परिसर हादरून गेला. या घटनेनंतर श्रद्धा आणि आश्चर्य यांची एकच चर्चा सुरू झाली आहे. चंद्रभागा नदीवरील पुलाचा कठडा तोडून एक भरधाव ट्रक थेट नदीपात्रात कोसळला. या घटनेत चालकाला साधे खरचटलेही नाही! विशेष म्हणजे हा अपघात ज्या ठिकाणी घडला, त्या नदीपात्र परिसरातच श्री संत बेंडोजी महाराज यांच्या संजीवन समाधीच्या पादुकांची आषाढी एकादशीला आरती केली जाते. त्यामुळे अनेक भाविक या घटनेकडे दैवी चमत्कार म्हणून पाहत आहेत. माहितीनुसार, ट्रक



पुलावरून खाली पडताना सुमारे ३० ते ३५ फूट खोल नदीपात्रात कोसळला. अपघात इतका भीषण होता की, ट्रकचा अक्षरशः चेंदामेंदा झाला. पुलाचा कठडा तुटून ट्रक थेट खाली आदळल्याने घटनास्थळी काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र या भीषण दुर्घटनेत सर्वात आश्चर्याची बाब म्हणजे ट्रक चालक पूर्णपणे बचावला.

एवढ्या मोठ्या अपघातात चालकाला साधे खरचटले सुद्धा नाही. त्याने उपस्थित नागरिक आणि ग्रामस्थ आश्चर्यचकित झाले. अपघातानंतर स्वतः चालकानेही माझा जीव वाचला, तो फक्त श्री संत बेंडोजी महाराजांच्या कृपेनेच अशी भावना व्यक्त केली. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिक, भाविक आणि ग्रामस्थांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. अनेकांनी या घटनेला चमत्कारिक बचाव असे संबोधले. श्री संत बेंडोजी महाराजांच्या संजीवन समाधी स्थळाबद्दल परिसरात मोठी श्रद्धा असून, या ठिकाणी अनेक भाविक दर्शनासाठी येत असतात. त्यामुळे या अपघातानंतर भक्तांमध्ये अधिक श्रद्धेचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, स्थानिक प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेत ट्रक बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू केले. पुलाच्या सुरक्षिततेबाबतही आता प्रश्न उपस्थित होत असून, संबंधित विभागाने पुलाची तातडीने दुरुस्ती करावी अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

# तामिळनाडूतून हरवलेली महिला अंजनगावात पोलिसांनी केले कुटुंबियांच्या स्वाधीन


**अंजनगाव सुर्जी प्रतिनिधी :-** कर्तव्यदक्षता, संवेदनशीलता आणि आधुनिक तांत्रिक तपास यांचा सुंदर संगम घडवत अंजनगाव सुर्जी पोलिसांनी तमिळनाडूतून हरवलेल्या एका मानसिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या महिलेचा शोध घेऊन तिला सुखरूपपणे तिच्या कुटुंबीयांच्या ताब्यात दिले. या घटनेमुळे पोलिसांच्या मानवतावादी भूमिकेचे सर्वत्र कौतुक होत आहे. १२ मे २०२६ रोजी परतवाडा रोड परिसरात एक अनोळखी महिला रस्त्यावर भटकताना आढळून आली होती. डायल ११२ वरून मिळालेल्या माहितीनंतर अंजनगाव सुर्जी पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत महिलेला सुरक्षित ताब्यात घेतले. सुरवातीला महिलेकडे कोणतीही ओळखपत्रे नसल्याने तिची ओळख पटविणे मोठे आव्हान ठरत होते. विशेष म्हणजे, महिलेला फक्त तामिळ भाषा समजत असल्यामुळे संवाद साधण्यात अडचणी निर्माण होत होत्या. मात्र पोलिसांनी हार न मानता दुभाषीच्या मदतीने महिलेशी संवाद साधला. चौकशीत तिने आपले नाव के. भार्ग्यम असून वडिलांचे नाव एस. कलियाप्पन असल्याचे सांगितले. ती तामिळनाडू राज्यातील वेलुपुरम जिल्ह्यातील असल्याची प्राथमिक माहिती मिळाली. पोलिसांनी संयम आणि चिकाटी कायम ठेवत तपास सुरू ठेवला. तपासादरम्यान १८ मे २०२६ रोजी तामिळनाडूतील वेलुपुरम जिल्ह्यात संबंधित महिलेबाबत मिसिंग तक्रार दाखल असल्याची महत्त्वपूर्ण माहिती समोर आली. त्यानंतर जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधून



स्थानिक पोलिसांच्या मदतीने महिलेच्या नातेवाईकांचा शोध घेण्यात आला. अखेर २३ मे रोजी महिलेचे भाऊ के. राजशेखरन आणि के. भास्करन अंजनगाव सुर्जी पोलिस ठाण्यात दाखल झाले. अनेक दिवसांनंतर आपल्या भावांना पाहताच महिलेच्या डोळ्यात अश्रू तरळले. तिने दोघांना ओळखून तेच आपले भाऊ असल्याचे सांगितले. उपस्थित पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठीही हा क्षण अत्यंत भावनिक ठरला. सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून महिलेला तिच्या भावांच्या ताब्यात सुखरूप सोपविण्यात आले. कुटुंबीयांनी अंजनगाव सुर्जी पोलिसांचे मनापासून आभार मानले. ही उल्लेखनीय कारवाई पोलिस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलिस अधीक्षक तोटावाड, उपविभागीय पोलिस अधिकारी मनीष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार सूरज बोंडे व सहाय्यक पोलिस निरीक्षक विनोद धाडसे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# व्याघ्र प्रकल्पाकडून बांधकाम विभागाचा मार्ग बंद

## चार ग्रामपंचायत न्यायालयात जाणार!



**धारणी प्रतिनिधी :** १० वर्षापूर्वी मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील अकोट-धुळघाट-खंडवा रेल्वेमार्ग बंद करण्यात आल्यावरही कोणतीच पर्यायी व्यवस्था करण्यात आलेली नव्हती. येथील आदिवासी बारुखेडा मार्गे हिवरखेड-अकोट पोहचत होते. आता मात्र बारुखेडा मार्ग अडवून व्याघ्रने पर्यायी थातूर-मातूर मार्ग दाखवल्याने संतापाची लाट पसरलेली आहे. हा मार्ग बांधकाम विभागाचा असूनही व्याघ्र प्रकल्पाने एकतर्फी कारवाई करून वहिवाटीच्या मूळ अधिकारावर गदा आणलेली आहे. परिसरातील चार ग्रामपंचायती या विरोधात न्यायालयात जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

धारणी ते अकोट, तेल्हारा, अकोला व शेगाव जाण्यासाठी मीटरगेज रेल्वे लाईन उपयोगी होती. १० वर्षापूर्वी ब्रॉडगेजची परवानगी व्याघ्र प्रकल्पाने दिलेली नव्हती. यामुळे ४० गावांचा संपर्क खंडित झालेला होता. पर्यायी व्यवस्था किंवा पर्यायी मार्ग पण उपलब्ध करून देण्यात आलेला नव्हता. बारुखेडा मार्गे वान नदीच्या पुलावरून आदिवासी प्रवास करत होते. आता मात्र, सात दिवसापूर्वी बारुखेडा मार्गावर काटे, लाकडी फाटा टाकून रस्ता अडविण्यात आल्याने लोक संतापलेले आहेत. सध्या एका कोरड्या नाल्यातून कसा-बसा पर्यायी मार्ग देण्यात आलेला आहे. मात्र पावसाळ्यात तो पण बंद होईल.

भाजपाचे धोंडीबा मुंडे यांनी याविषयी व्याघ्र प्रकल्पाच्या कारवाई विरुद्ध बंड पुकारलेले आहे. कोणत्याही खोदकाम किंवा विकासकामात अडथळा करणाऱ्या व्याघ्र प्रकल्पाने पर्यायी मार्गाची परवानगी कशी घेतली, यावर मुंडे यांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे.

आता पावसाळ्यात हिवरखेड मार्ग पूर्णतः बंद होणार आहे. यामुळे राणीगाव, धुळघाट रेल्वे, गोलाई, जामपानी, कंजोलीचे नागरिक सरळ न्यायालयात दाद मागणची शक्यता आहे. विशेष असे की, व्याघ्रने ब्रॉडगेज लाईनची परवानगी नाकारल्यानंतर धारणी-अकोटसाठी दुसरा रस्ता देण्यात आलेला नव्हता. अनेक समस्यांना तोंड देत लोक प्रवास करत होते. आता मात्र, रस्ता बंद केल्याने एकच असंतोष खदखदत आहे.

# बाविशी संस्थानला आ.प्रवीण तायडे यांची सदिच्छा भेट

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी बिलनपुऱ्यातील स्वातंत्र्यवीर सावरकर नगर परिसरातील बाविशी संस्थानला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी संस्थानमधील उजव्या सोंडेच्या गणपतीचे भक्तिभावाने दर्शन घेत परिसरातील नागरिकांच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली.

आमदार तायडे यांच्या आगमनावेळी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण



झाले होते. संस्थेच्या वतीने संचालक ॲड. मुकेश पांगारकर यांनी आमदार प्रवीण तायडे यांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत व सत्कार केला. यावेळी संस्थेच्या कार्याची माहिती देण्यात आली तसेच सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक उपक्रमांबाबत चर्चा करण्यात आली.

बाविशी संस्थान परिसरातील विविध विकासकामांबाबतही यावेळी सकारात्मक चर्चा झाली. आमदार तायडे यांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत भविष्यात आवश्यक सहकार्य करण्याची ग्वाही दिली. कार्यक्रमाला स्थानिक नागरिक, पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वच्छतेच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह

## पावसाळा तोंडावर तरी शहरातील नाल्यात कचऱ्याचे ढिगारे

**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** शहरातून वाहणारा बेग नाल्यामध्ये कचऱ्याचे ढिगारे प्लास्टिक व गाळने भरून आहे. पावसाळा अगदी जवळ पंधरा दिवसांवर येऊन ठेपला तरी सुद्धा या नाल्यामध्ये असलेला कचरा प्लास्टिक उचलून नाला साफ करण्यात आला नसल्याने नगरपंचायतच्या स्वच्छता विभागाचे नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. या नाल्यांमध्ये साचलेल्या कचऱ्याचे ढिगाऱ्याची विल्हेवाट पावसाळ्यापूर्वी होणे गरजेचे असून सुद्धा



स्थानिक नगरपंचायत चा स्वच्छता विभाग उदासीन असल्याचे दिसून येते. शहरात असलेल्या आयटीआय पासून वाहणाऱ्या या नाल्यांमध्ये अनेक ठिकाणी कचरा प्लास्टिक व गाळ जमा आहे. विशेष म्हणजे नवदुर्गा पतसंस्थेच्या समोरील मुख्य रोडवरील नागरिकांची वर्दळ असलेल्या पुला जवळ नाल्यात सुकलेली झाड कचरा प्लास्टिक व गाळ मोठ्या प्रमाणात पडून आहे. त्यामुळे पावसाचे पाणी वाहून जाण्यास अडथळा निर्माण होण्याची शक्यता असून पावसाळा अगदी जवळ येऊन सुद्धा या समस्येची अद्यापही दखल घेण्यात आली नसल्याने नगरपंचायत च्या स्वच्छता विभागाचे नियोजन व कार्यपद्धती वेळ काढू उदासीन धोरण असल्याचे दिसून येते. स्वच्छतेवर शासन महिन्याकाठी लाखो रुपये खर्च करते तरीसुद्धा शहरातील गल्लीबोळात सांडपाणी वाहून जाणाऱ्या नाल्या गच्च भरून आहे. यावरून शहराच्या दर्शनीय भागातच स्वच्छतेवर लक्ष दिल्या जाते काय असा प्रश्न नागरिका मध्ये उपस्थित होत आहे.

---

### तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

क्र. रामाक्र/२२८/एमआरसी-८१/डोंगरयावली/२०२५-२०२६

**जाहीरनामा**

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **सपना बाबाराव भाकरे**, रा.**डोंगरयावली**, ता.मोर्शी यांनी त्यांचे जन्माची नोंद ग्रामपंचायत **डोंगरयावली** ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.**डोंगरयावली** येथील जन्म/मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय खानापूर येथे स्वतःचे जन्म दिनांक **१५.०१.१९९५** रोजीचे जन्माची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेव वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करणत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

---

### तहसिलदार चांदूर बाजार यांचे कार्यालय

क्र.प्रस्तु-१/अ.का/जाहीर नोटीस प्रसिध्द/कावि-४५८/२०२६ — दि.२२.०५.२०२६

**जाहीरनामा**

ज्याअर्थी या महसूल न्यायालयात रा.मा.क्र./ /५९(२९)/ शिरजगांव कसबा/२०२५-२६ प्रकरणात अर्जदार **विद्या शामसुंदर राठी**, रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे शेत मौजा शिरजगांव कसबा २ सर्व्हे नं. गट नं.२१४३ क्षेत्र २.०७ हे.आर पो.ख.०.६ हे.आर एकुण क्षेत्र २.१३ हे.आर भोगवटदार वर्ग-१, या शेतीचे ७/१२ मधील इतर अधिकारात साधे कूल **शामजी गणाजी सुने** ही नोंद कमी करुन मिळण्याबाबतचे प्रकरण या महसूल न्यायालयात दाखल केले आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांचे आत आक्षेप वा हरकती दाखल कराव्यात दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिनांक २२.०५.२०२६

शिक्का

**स्वा/-**
**(मनोज सोनार)**
**तहसीलदार, चांदूर बाजार**
**जि.अमरावती**

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

### चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 75/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.बालकनाथ चॅरिटेबल ट्रस्ट, आठवडी बाजार, निंभा ता. भातकुली, जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री.गजानन मधुकरराव लकडे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - काही नाही**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

**तहसीलदार चांदूर बाजार यांचे कार्यालय**
**(जन्म मृत्यू प्रमाणपत्र शाखा)**
E-mail Id : tah.chandurbz@gmail.com
क्र./स.म.अ./कावि-४०७/२०२६ — दिनांक २५.०५.२०२६

**जाहीरनामा**

**अर्जदार -** १. सै.जाफर अली सै.रसुल
रा.तळेगांव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत तळेगांव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**

याद्वारे गावातील सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **सै.जाफर अली सै.रसुल**, रा.तळेगांव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती यांनी स्वतःचे जन्म दिनांक ०९.०३.१९५७ चा राहत्या घरी झाला परंतु त्यांचे जन्माची कार्यालय ग्रामपंचायत तळेगांव मोहना, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे नोंद करण्यात आली नाही. जन्माची नोंद जन्म मृत्यू कार्यालय ग्रामपंचायत तळेगांव मोहना पंचायत समिती चांदूर बाजार, जि.अमरावती हद्दीमध्ये झालेला असल्यामुळे जन्म नोंदणी करण्याबाबत अर्ज व ग्रामपंचायत तळेगांव मोहना यांचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केलेला आहे.

वरील जन्माची नोंद करुन देण्यास कोणत्याही व्यक्तिस अगर संस्थेस कोणाला काही आक्षेप/हरकती असतील तर त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याचे आत आपला आक्षेप/हरकती लेखी स्वरुपात या कार्यालयामध्ये दाखल कराव्यात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप वा हरकतींना ग्राह्य धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दि.**२५.०५.२०२६** रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

शिक्का

तहसीलदार
तथा तालुका दंडाधिकारी,
चांदुर बाजार

---

**तहसीलदार चांदूर बाजार यांचे कार्यालय**
**(जन्म मृत्यू प्रमाणपत्र शाखा)**
E-mail Id : tah.chandurbz@gmail.com
क्र./स.म.अ./कावि-४०८/२०२६ — दिनांक २५.०५.२०२६

**जाहीरनामा**

**अर्जदार -** १. नाजेराबी मोहम्मद आजम
रा.करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार- निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत करजगांव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती**

याद्वारे गावातील सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, **नाजेराबी मोहम्मद आजम**, रा.**करजगांव**, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती यांनी स्वतःचे जन्म दिनांक **०१.०७.१९६०** चा राहत्या घरी झाला परंतु त्यांचे जन्माची कार्यालय ग्रामपंचायत **करजगांव**, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे नोंद करण्यात आली नाही. जन्माची नोंद जन्म मृत्यू कार्यालय ग्रामपंचायत **करजगांव**, पंचायत समिती चांदूर बाजार, जि.अमरावती हद्दीमध्ये झालेला असल्यामुळे जन्म नोंदणी करण्याबाबत अर्ज व ग्रामपंचायत **करजगांव**, यांचा प्रस्ताव या कार्यालयात दाखल केलेला आहे.

वरील जन्माची नोंद करुन देण्यास कोणत्याही व्यक्तिस अगर संस्थेस कोणाला काही आक्षेप/हरकती असतील तर त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याचे आत आपला आक्षेप/हरकती लेखी स्वरुपात या कार्यालयामध्ये दाखल करावयात. मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेप वा हरकतींना ग्राह्य धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर जाहीरनामा आज दि.**२५.०५.२०२६** रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी प्रसिध्द करण्यात येत आहे.

शिक्का

तहसीलदार
तथा तालुका दंडाधिकारी,
चांदुर बाजार

---

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक

आज दि.................. रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती** निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **जाकीर खॉं युनूस खॉं** अर्जात नमूद जन्म दिनांक **०५.०७.१९६७** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **जन्म नोंदीबाबत अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) सदर जन्म नोंदीबाबत माहिती नसल्यामुळे तसेच अज्ञान यामुळे नोंद करु शकलो नाही.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद ए.मदने (सरपंच) | १) शिवानंद ए.मदने (सरपंच) |
| २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) | २) श्री.अब्दुल हाफिज शे.रसूल (उपसरपंच) |
| ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) | ३) श्री.सागर रविंद्र शिरभाते (तं.मु.अ.) |
| ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) श्री.गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अनुश्री रो.जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) | ५) अनुश्री रो.जयसिंगपुरे (ग्रा.पं.सदस्य) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**

---

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

### चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक**
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

---

**नियाजी एज्युकेशन सोसायटी अमरावती द्वारा संचालित**
**नियाजी उर्दु माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय**
**हबीब नगर नं.२, असीर कॉलनी, अमरावती**
**(अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त अनुदानित शाळा)**

## पाहिजेत

| अ. क्र. | पदाचे नांव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | माध्यम | अनुदानाचा प्रकार |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | शिक्षण सेवक वर्ग ६ ते ८ टी.ई.टी./ सी.टी.ई.टी. पेपर-२ पास | ०१ | B.A.B.Sc/ D.Ed. B.Ed. | उर्दु | १०० टक्के अनुदानित |
| ०२ | विशेष शिक्षक वर्ग ९ ते १० | ०१ | B.A.B.Sc/ BP.Ed. | उर्दु | विना अनुदानित |

दिनांक ३१.०५.२०२६ रविवार रोजी मूळ प्रमाणपत्रासह छायांकित प्रती स्व-खर्चाने नियाजी उर्दु माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, हबीब नगर नं.२, असीर कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती चे कार्यालयात दुपारी ३ ते ६ वाजता मुलाखतीकरीता उपस्थित रहावे.

**सचिव,**
**नियाजी एज्युकेशन सोसायटी,**
**अमरावती**

**अध्यक्ष,**
**नियाजी एज्युकेशन सोसायटी,**
**अमरावती**

---

**मा.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.५५/२०२६ — ने.ता.११.०६.२०२६
**रामदास पवार + ५ विरुध्द निरंक**

**अर्जदार :**
१. रामदास कनिराम पवार,
२. रमेश कनिराम पवार,
३. पंचफुला पांडुरंग राठोड,
नं.१ ते ३ रा.टाकळी गीलबा, पो.पिंपरी निपाणी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. निर्मला मधुकर राठोड, रा.घोटा, ता.तिवसा, जि.अमरावती
५. कांता दिलीप चव्हाण, रा.लोणाडी, ता.नेरपरसोपंत, जि.यवतमाळ
६. मिराबाई रमेश राठोड, रा.सिंदोड, पो.ब्राम्हणवाडा, ता.नेरपरसोपंत, जि.यवतमाळ

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी मयत **कणीराम मेडसिंग पवार** यांचा मृत्यू दि.**२१.०७.२०२०** रोजी टाकळी गीलबा, पो.पिंपरी निपाणी, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे मरण पावले आहेत. **कणीराम** यांची पत्नी **नामे हाजीबाई कणीराम पवार** यांचा मृत्यू दि.**०९.०९.२०१८** रोजी टाकळी गीलबा, पो.पिंपरी निपाणी, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे मरण पावले आहेत. मयत यांचे अर्जदार नं.१ व २ ही मुले आहे. व अर्जदार नं.३ ते ६ या विवाहित मुली आहेत. मयतांचे अर्जदार हेच वर्ग-१ चे कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२० फेब्रुवारी २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

---

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९७६/२०२६
**शब्बीर हुसेन -वि- निरंक**
पुढील ता.२३.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Shabbir Akhter Husain
Age 56 Yrs. Occu.: Advocate
R/o In side Nagpuri Gate, Bohara Masjid, Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Akhter Husain Mulla Ibrahim हे दिनांक 04.10.2020 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. तसेच मयत Husainabai Mulla Akhter Husain हे दिनांक 02.10.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाल्या. अर्जदार Shabbir Akhter Husain यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Shabbir Akhter Husain वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **११.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

---

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.
संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २५७
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# वाढत्या उष्णतेमुळे संत्रा फळांची प्रचंड गळती

## झाडे सुकू लागल्याने बळीराजा हवालदिल, पंचनामे करून मदत देण्याची मागणी

**अमरावती/का.प्र.**
विदर्भाचा 'कॅलिफोर्निया' म्हणून ओळखला जाणारा अमरावती जिल्हा सध्या भीषण उष्णतेच्या लाटेचा सामना करत आहे. यंदाच्या उन्हाळ्यात तापमानाने ४६ अंशांचा ओलांडल्यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. चांदूर बाजार तालुक्यातील करजगाव परिसरासह अचलपूर, मोर्शी आणि वरुड पट्ट्यात सलग वाढत्या उष्णतेमुळे संत्रा बागांमधील फळांची मोठ्या प्रमाणावर गळती सुरू झाली असून, शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होण्याची भीती निर्माण झाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून तापमान हे ४३ ते ४६ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत असल्याने संत्रा झाडांवर प्रचंड ताण निर्माण झाला आहे. तीव्र उन्हामुळे झाडांमधील आर्द्रता झपाट्याने कमी होत असून, फळांचा नैसर्गिक विकास पूर्णपणे थांबला आहे. परिणामी, लहान व मध्यम आकाराची संत्रा फळे झाडावरून खाली पडत आहेत. काही ठिकाणी फळांवर डाग



पडणे, साल कोरडी होणे तसेच फळे आकसण्याचे प्रमाण वाढले आहे. विशेष म्हणजे उष्णतेमुळे केवळ फळगळतीच होत नसून अनेक जुनी संत्रा झाडे देखील आता सुकू लागली आहेत.यंदा आधीच फळधारणा कमी प्रमाणात झाली होती, त्यातच आता सुरू झालेल्या या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे नियोजन कोलमडले आहे. अनेक शेतकऱ्यांनी संत्रा बागा जगवण्यासाठी ठिबक सिंचन, महागडी औषध फवारणी आणि खतांवर लाखो रुपयांचा खर्च केला आहे. मात्र डोळ्यादेखत फळे जमिनीवर पडताना पाहून बळीराजा हवालदिल झाला आहे.

### काय म्हणतात कृषी तज्ञ

सतत वाढते तापमान आणि उष्ण वाऱ्यांमुळे झाडांमधील पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होते. ज्यामुळे झाडे फळे टिकवून ठेवण्यास असमर्थ ठरतात. या उष्णतेच्या लाटेमुळे केवळ उत्पादनातच घट होणार नाही, तर स्थानिक कृषी अर्थव्यवस्थेवरही याचे दूरगामी परिणाम होण्याची शक्यता तज्ञांनी व्यक्त केली आहे.

### शासनाने लक्ष द्यावे

संत्रा हे आमचे प्रमुख नगदी पीक आहे. यंदा उन्हाने बागा होरपळून निघत आहेत. शासनाने याकडे दुर्लक्ष न करता महसूल व कृषी विभागातर्फे तातडीने नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करावेत आणि आर्थिक मदत जाहीर करावी,' अशी आर्त साद संत्रा उत्पादक शेतकऱ्यांनी घातली आहे.

## बडनेऱ्यात आज कँडल मार्च तर बुधवारी धम्म मेळावा

**अमरावती/का.प्र.**
तथागत गौतम बुद्ध यांची जयंती तसेच त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त भारतीय बौद्ध महासभा शहर शाखा बडनेरा व तालुका शाखा नांदगाव खंडेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने २६ मे रोजी सायंकाळी ७ वाजता भव्य कँडल मार्च तर २७ मे रोजी दुपारी १ वाजता धम्म मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमासाठी भदंत शाक्यपुत्र राहुल प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष प्रा. प्रकाश बोरकर राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून भदंत नागसेन, भदंत धम्मसार, भदंत सिलवंसलंकरा, ज्येष्ठ केंद्रीय शिक्षक डॉ. युवराज मोरे, मुकेश सरदार, संगीता सरदार, माया धांडे, प्रमिला शेंडे, गणपत तिडके, विद्या वानखडे, प्रा. डॉ. रमेश बडगे, मुरलीधर रायबोर्डे, प्रकाश बनसोड, विलास साखरे या मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कपिल मंडळ बुद्ध विहार, अशोक नगर नवी वस्ती बडनेरा येथे होणाऱ्या दोन्ही कार्यक्रमांना मोठ्या संख्येने धम्मबंधू-भगिनींनी सहभागी व्हावे, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभेने केले आहे. उपस्थित राहावे, असे आवाहन आर. के. भटकर, मुकुंद मेश्राम, मालती मेश्राम, विलास नागदिवे, विजय बागडे, बाळू बनसोड, गोवर्धन रामटेके, हरणदास सहारे, देवानंद बडगे, अरुण मेश्राम, साहेबराव मोहोळ, अशोकराव बनसोडे, अरुण शेंडे, वंदना रहाटे, शिला देशभ्रतार, रंजना भालेकर, पुष्पा बोरकर, सुमन राऊत, जया खंडारे, वर्षा खंडारे, अरुणा बनसोड, शालिनी काळपांडे, छाया बनसोडे, जया गावंडे, सतीश गोपनारायण, शुद्धधन मोहोळ, गौरव धवणे, दीपक खडसे, सिद्धार्थ कीर्तक, अमोल मेश्राम, विकास बागडे, अश्वदीप खंडारे, लोवकेश कोटगळे, धम्मदीप धदर यांच्यासह पदाधिकारी, महिला व पुरुष शाखा, भारतीय बौद्ध महासभा, बडनेरा व नांदगाव खंडेश्वर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## कत्तलीसाठी जाणाऱ्या आठ जनावरांची सुटका

**लेहेगाव/वार्ताहर**
शिरखेड पोलिसांनी सोमवारी सकाळी धाडसी कारवाई करत कत्तलीसाठी निर्दयीपणे कोंबून नेल्या जात असलेल्या आठ जनावरांची सुटका केली. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून वाहन चालक फरार झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्य प्रदेशकडून येणाऱ्या एका झायलो वाहनातून जनावरांची अवैध वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती लेहेगाव पोलिस चौकीला मिळाली. त्यानंतर शिरखेड पोलीस ठाण्याचे ठाणेदार ईश्वर वर्गे यांच्या मार्गदर्शनाखाली लेहेगाव चौकात नाकाबंदी करण्यात आली.नाकाबंदी दरम्यान पोलिसांनी संशयित झायलो वाहन क्रमांक क्रमांक एम.एच ०५ बि.जे.झिरो ०९५५ थांबवून तपासणी केली असता, वाहनात आठ जनावरे अत्यंत निर्दयी पद्धतीने कोंबून ठेवलेली आढळून आली. पोलिसांनी तत्काळ सर्व जनावरांची सुटका केली. या कारवाईदरम्यान वाहन चालक घटनास्थळावरून



फरार झाला. मात्र पोलिसांनी फाजील अन्सार अहमद (वय २६, रा. नकासापुरा, अमरावती) याला ताब्यात घेत अटक केली आहे. या प्रकरणाचा अधिक तपास केल्यास मोठ्या गोवंश तस्करी रॅकेटचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.ही कारवाई पोलीस हेड कॉन्स्टेबल गजानन तिजारे, पोलीस कॉन्स्टेबल योगेश पुडकर, अमित राऊत, वैभव घोगरे, नितेश आसोलकर, मयूर कापडे, गीतेश जाधव तसेच लेहेगावचे पोलीस पाटील नितीन जाधव यांच्या पथकाने केली.आठ जनावरांचे प्राण वाचवण्यात यश आल्याने शिरखेड पोलिसांचे परिसरात कौतुक होत आहे.

## ११ कोटींच्या निधीतुन शहरात नवीन ट्रान्सफार्मर बसविण्याच्या कामांना आला वेग-आ.सुलभ खोडके

**अमरावती/का.प्र.**
अमरावती शहरी भागात महावितरण संबधित कामांकरिता जिल्हा नियोजन समिती मार्फत मिळणारा निधी अपुरा असल्याने शहराचा वाढता विस्तार व विजेची वाढती मागणी लक्षात घेता आ.सुलभा खोडके यांनी शासनाच्या निधीतून महावितरण संदर्भातील ११ कोटींची कामे मागील १४ ऑक्टोबर २०२४ रोजी मंजूर करून आणली. तांत्रिक बाबींच्या पूर्ततेनंतर आता महावितरणच्या प्रत्येक उपकेंद्र अंतर्गत ८३ ठिकाणी विद्युत डी.पी.ची क्षमता वाढ व नवीन ट्रान्सफार्मर बसविण्याच्या कामांना महावितरण कडून सुरुवात झाली आहे. ज्यामध्ये २०० केव्हीए असलेल्या ट्रान्सफार्मर वरून ३१५ केव्हीए पर्यंत विस्तारीकरण व क्षमता वाढ करण्याच्या कामांना वेग आला असल्याने आता लवकरच वीज ग्राहकांना विद्युत व्होल्टेज आणि ओव्हरलोडिंगचे अडथळे दूर करून अखंडित वीजपुरवठाची सुविधा मिळणार आहे. गेल्या काही वर्षांपासून अमरावती शहरात विद्युत होल्टेज व ओव्हरलोडिंग मुळे वीज पुरवठा खंडित होण्याच्या समस्यांनी नागरिक हैराण झाले आहे. काही वेळा करिता विद्युत पुरवठा बंद झाला तर महावितरण कर्मचाऱ्यांना नागरिकांच्या रोषाला सुद्धा सामोरे जावे लागत होते. त्या पार्श्वभूमीवर आ. सुलभा खोडके यांनी आपल्या मागील पंचवार्षिक काळात महावितरण प्रशासनासोबत वारंवार बैठक घेऊन हि समस्या मार्गी लावण्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर वाढवून प्रभावी उपायोजना करण्याची सूचना केली. त्यावेळी शहरात महावितरणची कामे करण्यासाठी शासनाकडून कुठलाही निधी मिळत नसून जिल्हा नियोजन समिती मार्फत मिळणारा निधी हा ग्रामीण व शहरी असा एकत्रिक निधीची तरतूद असल्याने प्रामुख्याने शहरीभागात महावितरण संदर्भातील नवीन कामे करतांना पर्याप्त निधी अभावी अडचणी येत असल्याचे समोर आले होते. शासनाच्या वतीने मागील १४ ऑक्टोबर २०२४ रोजी शासन निर्णय जारी करून नागरी स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविण्यासाठी आ. सुलभा खोडके यांनी सुचविलेल्या ४० कोटींच्या कामांना मंजुरी प्रदान केली. निधी अशा एकूण ११ कोटींच्या निधीतून महावितरण अंतर्गत नवीन डीपी बसविणे, डी.पी. ची क्षमता वाढविणे, नवीन विद्युत पोल लावणे, विद्युत पोल दुसरीकडे हलविणे, विद्युत केबल लावणे अशी कामे समाविष्ट करण्यात आली. या बद्दल सर्व शहरवासीयांनी आ. सुलभा संजय खोडके यांचे अभिनंदन केले आहे.



## विद्यापीठ संचालित मॉडेल डिग्री कॉलेजच्या विद्यार्थिनीची उंच भरारी
## वैष्णवी चौथे हिने एकाच वेळी चार परीक्षेत यश संपादित करुन रचला इतिहास

**अमरावती/का.प्र.**
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ संचालित बुलढाणा येथील मॉडेल डिग्री कॉलेजची विद्यार्थिनी वैष्णवी रामभाऊ चौथे हिने सरळ सेवा परीक्षेत उज्वल यश संपादन करुन महाविद्यालयाच्या तसेच पर्यायाने विद्यापीठाच्या यशात मानाचा तुरा रोवला. वैष्णवी चौथे हिने एकाच वेळी चार ठिकाणी परीक्षेत यश संपादन करुन एक इतिहास रचला असून त्यापैकी मुंबई उच्च न्यायालयात वरीष्ठ लघुलेखक या पदावर रुजू होणे तिने पसंत केले. त्यासोबतच डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला, धर्मदाय विभाग, मुंबई आणि



वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई या ठिकाणी हायर ग्रेड असल्याने लघुलेखक म्हणून एकाच वेळी तिची चारही ठिकाणी निवड झाली होती. कष्टाला जिद्द, चिकाटी, मेहनत, योग्य मार्गदर्शन आणि सातत्याची जोड मिळाल्यास नक्कीच यशाला गवसणी घालता येते, हे तिने सिद्ध केले.

अतिशय सामान्य कुटुंबातून प्रतिकूल परिस्थितीवर मात करून प्राथमिक शिक्षण झेडपी शाळेत झालेले असतानाही वैष्णवी हिने यशाचे शिखर गाठले आहे. तिच्या या यशाबद्दल मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ.ए.आर. म्हळसने आणि इतर प्राध्यापकांनी तिचा सत्कार करून तिला याप्रसंगी शुभेच्छा दिल्यात. सोबतच तिच्या यशाची पायाभरणी करणाऱ्या आई-वडिलांचा देखील यावेळी सत्कार करण्यात आला. वैष्णवी हिने संपादित केलेल्या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे व मॉडेल डिग्री कॉलेजचे मानद संचालक डॉ.ए.आर. म्हळसने यांनी तिचे अभिनंदन करुन तिला पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्यात. वैष्णवीने तिच्या यशाचे श्रेय आई-वडील, मॉडेल डिग्री कॉलेजचे मार्गदर्शक, प्राध्यापक, महाविद्यालयामध्ये घेतल्या जाणाऱ्या स्पर्धा परीक्षेचे शिक्षक यांना दिले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. भांडक्कर यांनी केले.

## शंकर चव्हाण यांचा सेवापूर्ती निमित्त सन्मान



**अमरावती-** श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या अध्यापक विद्यालयातील १९९०-९२ च्या मित्रपरिवाराच्या स्नेह मिलन सोहळ्यात अतिशय शांत, विनम्र व सौम्य स्वभावाचे शंकर कचरुजी चव्हाण यांचा सेवापूर्ती निमित्त विशेष सन्मान करण्यात आला. मित्र परिवारातील ज्येष्ठ शिक्षक सतीश गुजरकर, लातूर येथील आदर्श शिक्षक दत्तात्रय गिरी व अरुणा बनारसे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ, भेटवस्तू व सन्मानपत्र प्रदान करून त्यांच्या प्रदीर्घ शैक्षणिक सेवेकरिता त्यांना गौरविण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन शिक्षक नेते अनिल पिंपळे यांनी केले. कार्यक्रमास राजश्री व उदय देशपांडे, नीलिमा व राजेंद्र खोडे, अंजली चौधरी, अर्चना मेटे, धनंजय केचे, नितीन रसे, अतुल खारकर, दिलीप सदार, सुधीर वर्हेकर, उमेश उदापुरे, गणेश फुटाणे, सुरेश चिमणकर इत्यादी सर्व मित्र परिवारांची आवर्जून उपस्थिती होती.

## ऑल इंडिया स्टूडेंट फेडरेशनच्या वतीने एक दिवसीय वैचारीक शिबीर उत्साहात

**चांदूर रेल्व/वार्ताहर**
ऑल इंडिया स्टूडेंट फेडरेशन (एआयएसएफ) चांदूर रेल्वे तालुका शाखेच्या वतीने एक दिवसीय वैचारीक शिबीर प्रा. शिवदास उताणे स्मृती सभागृह,चांदूर रेल्वे येथे आयोजित करण्यात आले होते.

यावेळी सुनिल मेटकर यांनी विविध विषयांवर भाष्य करताना सांगितले की,विद्यार्थ्यानी विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवून शिक्षण घेतले पाहिजे. समाजामधील अंधश्रद्धा निर्मूलन करणे, बुद्धीप्रामाण्यवादी, सामाजिक समस्या यावर चर्चा करणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी सांगीतले, शिक्षणाचे खासगीकरण ही संकल्पना भविष्यात सर्व सामान्य लोकांना



शक्य होणार नाही,शिक्षण क्षेत्रात सुधारणा व्हावी म्हणून शिक्षणाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले पाहिजे.समाज शिक्षित तर देश शिक्षित. अनेक जुन्या चालीरीती व सामाजिक परंपरा यावर विचार करून शिक्षण घेतले पाहिजे असे मेटेकर यांनी सांगितले. प्रा. ओमप्रकाश पाखरे यांनी,शहीद भगतसिंह व त्यांचे असंख्य क्रांतिकारी सहकारी त्यांच्या जीवनावर आधारित पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकात त्यांनी अनेक ऐतिहासिक घटना व प्रसंग मांडले असुन त्याचे विस्तृत विश्लेषण केले आहे. आजचा युवक हा मोबाईल मध्ये गर्क झाला असून स्वतःचे आयुष्य बदलून टाकले आहे. आजच्या युवकांना प्रेरणा देण्यासाठी भगतसिंह हाच आइकॉन बनला पाहिजे असे प्रतिपादन पाखरे यांनी यावेळी केले.या शिबिरात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना शिवाजी कोण होता? शहीद भगतसिंग यांच्या जीवनावर आधारित पुस्तक विनामूल्य दिले. एआयएसएफ च्या राज्य सचिव प्रतिक्षा ढोके यांनी आज मराठी शाळा वाचवण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले आणि याकरीता विद्यार्थी व पालकांनी सहभाग नोंदवला पाहिजे असे यावेळी प्रतिक्षा ढोके यांनी सांगितले. प्रास्ताविक राम जोशी यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन सतिश चौधरी यांनी केले. तर आभार भूषण नाचवणकर यांनी मानले. यावेळी राम जोशी,पुंडलिक मेश्राम, केशव फुंडे, विनोद जोशी, हेमंत टाले आदी मान्यवर उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

### २७ मे रोजी पदवीचे शिक्षण घेणाऱ्यासाठी विशेष शिबिर

येत्या २७ मे रोजी दुपारी १२ ते ४ वाजता पर्यंत स्नातक भाग १,२,३,व सामाजिक क्षेत्रात समाजवाद, धर्मनिरपेक्षता,यावर विश्वास ठेवून असणाऱ्या युवक व युवती व महिला व पुरुष यांच्या करिता विशेष शिबीर आयोजित करण्यात आले आहे,या शिबिराला पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने हजर राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

## संक्षिप्त

### गोठ्याला आग लागुन हजार रुपयाचे नुकसान

**शिराळा-** येथील वार्ड नंबर ६ मधील ईक्लास जागेवर बांधलेल्या



गोठ्याला आग लागुन पासष्ट हजार रु नुकसान झाले आहे. सदर गोठा निरंजन वानखडे यांचा आहे. त्यामध्ये दोन टाली कुटार , एक बैल लाकुडफाटा जळुन खाक झाले. त्यामध्ये निरंजन वानखडे यांचे अंदाजे ६५ हजार रु नुकसान झाले आहे. शिराळा येथील तलाठी यांनी पंचनामा केला आहे.तरी शासनाने अमरावती तहशिलदार यांनी दखल घेऊन नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी निरंजन वानखडे यांनी केली आहे.



### गुरुकुल येथे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबीर उत्साहात

**अमरावती-** गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था अमरावती व वॉरीअर्स स्पोर्ट्स अँड मल्टीपर्पज अकादमी अमरावती द्वारा उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण गुरुकुल - २०२६ वर्ष ११ वे चे आयोजन करण्यात आले होते. शिबिरात विद्यार्थ्यांना कराटे, लाठी काठी, बालसंस्कार, योगासन, धनुर्विद्या, आर्ट अँड क्राफ्ट, चित्रकला आदी विषयांचे प्रशिक्षण देण्यात आले होते.शिबिराच्या निरोप समारंभाकार्यक्रमा प्रसंगी गुरुकुल बहुउद्देशीय शिक्षण संस्था अमरावतीचे अध्यक्ष तुषार भारतीय, वॉरीअर्स स्पोर्ट्स अँड मल्टीपर्पज अकादमी अमरावतीचे सचिव व शिबिराचे आयोजक सेन्सेई उमेश भा. मोवळे, चेतन वाटणकर, कराटे प्रशिक्षक विशाल चव्हाण, आशिष वाघमारे, लाठी काठी प्रशिक्षक पिंकी प्रजापती, बालसंस्कार व योगासन शिक्षिका छाया जंगले, धनुर्विद्या पवन तांबट, आर्ट अँड क्राफ्ट शीतल गुप्ता व चित्रकला अखिलेश काळमेघ आदीच्या उपस्थित कार्यक्रम झाला.शिबिरात उत्कृष्ट प्रशिक्षण प्राप्त करणारे विद्यार्थी मुलांमध्ये मनन वासानी प्रथम, अधिराज क्षीरसागर द्वितीय, तनिष्क मोवळे तृतीय व मुलींमधे अद्विका ठाकरे प्रथम, शिवांशी देशमुख द्वितीय, नीरजा देशपांडे यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. तसेच सर्व विद्यार्थी यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. शिबिराच्या यशस्वीतेकरीता आदेश इंगळे, सागर मेश्राम, आयुष चौधरी, कृष्णा वाघमारे, अर्णवी प्रजापती, गौरी कोंडे, पदम माहुलकर यांनी परिश्रम घेतले.



### तलवारबाजी उन्हाळी शिबिराचे उद्घाटन

**अमरावती-** श्री.दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित डॉ. बाबासाहेब आंबेडकर तक्षशिला महाविद्यालय, लोटस इंग्लिश स्कूल व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, अमरावती जिल्हा तलवारबाजी संघटना आणि अमरावती जिल्हा क्रीडा संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने कोलंबिया सेमिनार हॉल येथे तलवारबाजी उन्हाळी शिबिराचे भव्य उद्घाटन उत्साहपूर्ण वातावरणात झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. कमलाकर पायास, सचिव श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून डॉ. सचिन पंडित, प्रशासकीय अधिकारी यांनी दीपप्रज्वलन करून शिबिराचे उद्घाटन केले.कार्यक्रमामध्ये अनिल इंगळे,यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच संगीता येवतीकर, सचिव अमरावती जिल्हा तलवारबाजी संघटना आणि स्वाती बाळापुरे, शारीरिक शिक्षिका-मनीबाई गुजराती ज्युनिअर कॉलेज यांची प्रमुख उपस्थिती लाभली. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना क्रीडा क्षेत्रातील संधी, नियमित सरावाचे महत्त्व आणि विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासामध्ये खेळाचे असलेले महत्त्व अधोरेखित केले.या शिबिराचे आयोजन डॉ. सुनील कुमार, फिजिकल डायरेक्टर डॉ. बाबासाहेब आंबेडकर तक्षशिला महाविद्यालय आणि आदेश डोंगरे, उपप्राचार्य लोटस इंग्लिश स्कूल व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय यांनी केले.शिबिरामध्ये अमरावती जिल्ह्यातील प्रशिक्षक राज रतन कांबळे, अजिंक्य वानखडे, सुमित शिरसाट, श्रेयश गवली आणि प्रथमेश सिंग हे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला असून परिसरात आनंदाचे व क्रीडामय वातावरण निर्माण झाले आहे.कार्यक्रमास शिक्षक, पालक, क्रीडाप्रेमी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### २ जून ला 'डाक अदालत'चे आयोजन

**अमरावती-** भारतीय डाक खात्याच्या वतीने अमरावती विभागातील



ग्राहकांच्या प्रलंबित तक्रारींचे निवारण करण्यासाठी सोमवार, दि. २ जून रोजी सकाळी ११ वाजता प्रवर अधीक्षक डाकघर कार्यालयात 'डाक अदालत' आयोजित करण्यात आले आहे.या डाक अदालतीमध्ये प्रामुख्याने स्पीड पोस्ट, नोंदणीकृत पार्सल, काऊंटर सेवा, बचत बँक खाते आणि मनीऑर्डर यांसारख्या सेवांशी संबंधित तक्रारी विचारात घेतल्या जातील. विशेषतः अशा तक्रारी, ज्यांचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झाले नसेल किंवा ज्यांना विभागाकडून समाधानकारक उत्तर मिळाले नसेल, अशा प्रकरणांची दखल येथे घेतली जाणार आहे.

तक्रारदारांनी आपला अर्ज सादर करताना त्यामध्ये मूळ तक्रार केल्याची तारीख, संबंधित अधिकाऱ्याचे नाव व पद, आणि तक्रारीचा संपूर्ण तपशील नमूद करणे आवश्यक आहे. हे अर्ज प्रवर अधीक्षक डाकघर, अमरावती विभाग, अमरावती - ४४४६०२' यांच्या नावे पाठवावेत. सर्व संबंधित अर्ज १ जूनपूर्वी कार्यालयात पोहोचणे अनिवार्य आहे, असे प्रवर अधीक्षक डाकघर यांनी कळविले आहे.

# पहिल्याच दिवशी १६ नामांकनाची उचल

## प्रवीण पोटे, बबलू देशमुख, विरेंद्र जगताप,अनुराधा पोटे यांचे अर्ज

### विधान परिषद निवडणूक





**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र विधान परिषद निवडणुकीची अधिसूचना जारी होताच पहिल्याच दिवशी अमरावतीमध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. सोमवारपासून सुरू झालेल्या या प्रक्रियेत भाजप, काँग्रेस आणि इतर पक्षांच्या प्रमुख दावेदारांसह एकूण १६ नामांकन अर्ज उचलण्यात आले आहेत. यामध्ये भाजपचे माजी मंत्री प्रवीण पोटे, अनुराधा पोटे तर काँग्रेसकडून माजी आमदार वीरेंद्र जगताप आणि बबलू देशमुख यांच्या नावाचा समावेश आहे. दोन्ही बाजूने तगडे पक्षीय बलाबल आणि मतदारांची जुळवाजुळव पाहता, ही निवडणूक अत्यंत चुरशीची आणि रोमांचक होणार असल्याचे स्पष्ट चिन्हे आहेत.

पहिल्याच दिवशी निवडणुकीचे वातावरण तापले आहे. माजी मंत्री प्रवीण पोटे यांचे पीए अमोल मुकुंद काळे यांनी प्रवीण पोटेंसाठी तीन आणि अनुराधा पोटे यांच्यासाठी दोन नामांकन उचलले. भाजपा शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे सुद्धा गेल्या काही दिवसापासून विधान परिषद निवडणुकीसाठी उत्सुक दिसत आहे. ते मतदारांपर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न करत आहे पण सध्या तरी त्यांनी नामांकन उचलले नाही. या निवडणुकीत काँग्रेसही आपला जोर लावत आहे. आपसी मतभेद विसरून काँग्रेस निवडणुकीच्या कामाला लागलेली (पान २ वर)

**■ भाजपाकडे २२७ मतदार-**
भाजपा जवळ २२७ मतदार आहे. त्यामध्ये भाजपाचे १५०, राकाँपा अजित पवार ३३, युवा स्वाभिमान २६, शिंदे सेना १८ अशी स्थिती आहे. या निवडणुकीत युवा स्वाभिमान पार्टी आपला उमेदवार रणसंग्राममध्ये उतरविण्याची तयारी करत आहे.

**■ काँग्रेस जवळ २२६ मतदार-**
विधान परिषद निवडणुकीसाठी काँग्रेस जवळ २२६ मतदारांचे समिकरण जुळत आहे. काँग्रेसचे १२०, उद्धव सेना २१, राकाँपा शरद पवार ११, एमआयएम १६ बसपा ३, वंचित आघाडी ७, समाजवादी पार्टीचे दोन, प्रहार चे २१, अपक्ष २५ असे २२६ मतदार काँग्रेसकडे आहे. बच्चू कडू शिंदे सेनेमध्ये सहभागी झाल्यामुळे हे समीकरण बिघडण्याची शक्यता नकारता नाही येत.

# नाहरकत प्रमाणपत्रासाठी ६० हजारांची लाच घेताना ग्रामसेवकासह लिपिक जाळ्यात

## लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची वाडेगाव ग्रामपंचायतीत कारवाई



**अकोला/प्रतिनिधीः-** ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र (NOC) देण्यासाठी तब्बल १ लाख रुपयांची लाच मागणाऱ्या ग्रामसेवकासह लिपिकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (ACB) पथकाने रंगेहात पकडल्याची खळबळजनक घटना रविवारी वाडेगाव, ता. बाळापूर येथे उघडकीस आली. तडजोडीनंतर ६० हजार रुपयांची लाच स्वीकारताना ही कारवाई करण्यात आली.

या प्रकरणातील आरोपींमध्ये ग्रामपंचायत वाडेगाव येथील ग्रामसेवक (ग्रामपंचायत अधिकारी) योगेश तोताराम कापकर (रा. वंजारीपुरा, आलेगाव ता. पातूर) तसेच लिपिक सुभाष रामकृष्ण सरप (रा. वाडेगाव, ता. बाळापूर) यांचा समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदाराच्या लहान भावास 'वैभव वाईन अँन्ड बिअर शॉप' सुरू करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या नाहरकत प्रमाणपत्राची आवश्यकता होती. यासाठी तक्रारदाराने ग्रामसेवक योगेश कापकर यांची भेट घेतली असता, त्यांनी प्रमाणपत्र देण्यासाठी १ लाख रुपयांची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने ८ मे २०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला येथे तक्रार दाखल केली. त्यानंतर १३ मे रोजी करण्यात आलेल्या पडताळणीदरम्यान आरोपीने तडजोडीअंती ६० हजार रुपये स्वीकारण्याचे मान्य केल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, १६ मे रोजी ग्रामपंचायत कार्यालयात सापळा रचण्यात आला होता. त्यावेळी ग्रामसेवक कापकर यांनी लाचेची रक्कम लिपिक सुभाष सरप (पान २ वर)

# केंद्र व राज्य सरकारच्या हुकूमशाही विरोधात युवक काँग्रेसचा एल्गार

## धामणगाव रेल्वे येथे पेट्रोलियम मंत्र्यांचा पुतळा जाळून तीव्र आक्रोश!

### महासचिव परीक्षित जगताप यांच्या नेतृत्वात निघाला 'भव्य न्याय मोर्चा'



**धामणगाव रेल्वे/प्रतिनिधीः-** केंद्र आणि राज्य सरकारच्या गलिच्छ, शेतकरी विरोधी आणि विद्यार्थी विरोधी धोरणांचा जाहीर धिक्कार करण्यासाठी आज धामणगाव रेल्वे येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस व युवक काँग्रेसच्या वतीने 'भव्य न्याय आंदोलन' छेडण्यात आले. निघालेल्या या धडक मोर्चाने संपूर्ण धामणगाव रेल्वे शहर दणाणून सोडले.

सरकारच्या शेतकरी विरोधी आणि महागाई वाढवणाऱ्या धोरणांवर प्रचंड रोष व्यक्त करत, आंदोलकांनी भर चौकात केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या पुतळ्याचे जाहीर दहन केले. 'केंद्र सरकारचे करायचे काय, खाली डोके वर पाय', 'धर्मेंद्र प्रधान राजीनामा द्या' अशा (पान २ वर)

# अंजनगाव सुर्जी पालिकेच्या ढिसाळ कारभारामुळे दोन दुकाने व घर खाक

## लाखोंचे नुकसान, नागरिकांसह लोकप्रतिनिधींचा संताप



### पालिकेची गाडी पोहोचली आग विझल्यावर! तीन चालकांपैकी एक नगराध्यक्षांच्या दिमतीला

**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-** शहरातील डीपी रोडवर असलेल्या डॉ.आर बी बहादुरे माजी सहायक पशुधन विकास अधिकारी यांच्या घरात असलेल्या वृंदावन डेअरी आणि नियती सोलर रूफटॉप सर्व्हिस या दुकानांना दि.२५ दुपारी १ वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. वृंदावन डेअरीमधील डीप फ्रीझरच्या कॉम्प्रेसरचा स्फोट झाल्याने ही आग लागल्याचे किंवा शॉर्ट सर्कीटने ही (पान २ वर)

# जनगणना कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे महिलेचा जीव वाचला

## आजोबांचा दोन दिवसांपूर्वीच मृत्यू, वृद्ध आजी बेशुद्ध



**अमरावती/प्रतिनिधीः-** जनगणनेचे काम करत असताना प्रगणकांच्या सतर्कतेमुळे एका वृद्ध महिलेचा जीव वाचल्याची घटना वार्ड क्रमांक १९, सर्कल क्रमांक ३, ब्लॉक क्रमांक १५ येथे घडली.

जनगणनेचे काम सुरू असताना ब्लॉक क्रमांक १५ च्या प्रगणक वैशाली प्रशांत नालसे या आपल्या कार्यासाठी संबंधित घरात पोहोचल्या. त्यांच्यासोबत ब्लॉक क्रमांक १६ चे प्रगणक मनोज नेताजी वाकोडे तसेच सुपरवायझर केशव नरेंद्र पंचारिया हेही उपस्थित होते. घराचा दरवाजा ठोठावून व आवाज देऊनही कोणताही प्रतिसाद मिळत नव्हता.

शेजाऱ्यांकडे चौकशी केली असता, त्या घरात वृद्ध आजी-आजोबा दोघेच राहत असून आजोबांची तब्येत नेहमीच खराब असते व आजी रोज सकाळी फिरायला जात असल्याची माहिती मिळाली. (पान २ वर)

# खल्लार पोलिसांचे पथसंचलन



**खल्लार/प्रतिनिधीः-** दि. २७ मे रोजी बकरी ईद सणानिमित्य खल्लार पोलिस स्टेशन हद्दीतील कसबेगव्हाण येथे उपविभागीय पोलीस अधिकारी,दर्यापूर यांच्या मार्गदर्शनात संवेदनशील भागातून तसेच गावातील मुख्य रस्त्यावरुन पथसंचलन करण्यात आले.

यामध्ये पोलिस स्टेशन येवदा येथील १ (पान २ वर)

# मंदिरातील तळ्याच्या वादातून वाढोणा रामनाथ पेटले

### हिंसक वळण; आठ जण जखमी



**अमरावती/प्रतिनिधीः-** रामनाथ स्वामी संस्थानाच्या वर्चस्वाच्या जुन्या वादाने शनिवारी रात्री वाढोणा रामनाथ गावात पुन्हा डोके वर काढले. मंदिर परिसरातील तळ्याची साफसफाई करताना झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर काही मिनिटांतच तुफान हाणामारीत झाले. या घटनेत दोन्ही गटांतील आठ जण जखमी झाले असून गावात तणावपूर्ण शांतता निर्माण झाली आहे.

मंगरूळ चव्हाळा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वाढोणा रामनाथ येथे रामनाथ स्वामी संस्थानाच्या मालकी व वर्चस्वावरून गेल्या अनेक वर्षांपासून दोन गटांमध्ये वाद सुरू आहे. यासंदर्भातील प्रकरण सध्या (पान २ वर)

### जिल्ह्यात भीषण अपघातांची मालिका

# वेगवेगळ्या घटनांमध्ये तिघांचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात शनिवारी व रविवारी घडलेल्या तीन वेगवेगळ्या अपघातांमध्ये तिघांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे. शिरजगाव कसबा, मोर्शी आणि फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यांच्या हद्दीत या घटना घडल्या असून संबंधित वाहनचालकांविरुद्ध गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

पहिली घटना शिरजगाव कसबा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पाळा रोडवर २४ मे रोजी घडली. भरधाव ट्रॅव्हल्सने

### ट्रॅव्हल्स, टिप्पर आणि राँग साईडने आलेल्या दुचाकीची धडक




दुचाकीला जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा (पान २ वर)

# १०० दिवसांचा ॲक्शन प्लॅन की फक्त घोषणांचा पाऊस?

## नगरपरिषदेतच घाणीचे साम्राज्य, महिलांच्या सुरक्षेचे दावेही हवेत?



**यवतमाळ/प्रतिनिधीः-** यवतमाळ नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांनी पदभार स्वीकारताच शहराच्या विकासासाठी १०० दिवसांचा ॲक्शन मोड जाहीर करत महिला सुरक्षेला प्राधान्य, 'एक शहर–एक ॲप', स्वच्छ शहर, तक्रार निवारण यंत्रणा, सीसीटीव्ही, वाहतूक सुधारणा अशा अनेक महत्त्वाकांक्षी घोषणांचा धडाका लावला. मात्र या मोठ्या घोषणांच्या पार्श्वभूमीवर खुद्द नगरपरिषदेची वस्तुस्थिती पाहता या आराखड्याच्या अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. पदभार स्वीकारल्यानंतर घेतलेल्या पत्रकार परिषदेत नगराध्यक्षांनी हा आराखडा पारदर्शक, वेळबद्ध आणि नागरिककेंद्रित असल्याचे सांगितले. शहरातील अतिसंवेदनशील भागांमध्ये सीसीटीव्ही व्यवस्था, महिला व मुलींच्या सुरक्षेसाठी विशेष उपाययोजना, 'एक शहर–एक ॲप'द्वारे तक्रार निवारण, २४ तासांत (पान २ वर)

# वारंवारच्या वीजखंडितचा संताप; विद्युत भवनावर शिवसैनिकांचा हल्लाबोल



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील सततच्या वीजखंडितीमुळे संतप्त झालेल्या शिवसैनिकांनी विद्युत भवनावर धडक देत जोरदार आंदोलन केले. अचानक झालेल्या या आंदोलनामुळे काही काळ परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या प्रकरणी गाडगेनगर पोलिसांनी शिवसैनिकांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

२५ मे रोजी सकाळच्या सुमारास शिवसैनिकांचा समूह विद्युत भवनासमोर जमा झाला. शहरातील वारंवार खंडित होणाऱ्या विज पुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त असून, त्याविरोधात आंदोलन करण्यात आल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले. आंदोलनादरम्यान शासन आणि महावितरणविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. (पान २ वर)

# ईकरा शाळेला शॉर्ट सर्किटमुळे आग, दस्तऐवज जळून खाक



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील जहानपूर रोड वरील असलेल्या ईकरा शाळेमध्ये आज (दि.२५)अचानक आग लागल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. आगीमध्ये शाळेतील महत्त्वाचे दस्तऐवज, फर्निचर तसेच इतर शैक्षणिक साहित्य मोठ्या प्रमाणात जळून खाक झाल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेत अग्निशमन दलाला पाचारण केले. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. सुदैवाने (पान २ वर)

### दर्यापूर शहराने घेतला मोकळा श्वास

# अतिक्रमण हटविल्याने' कही खुशी कही गम 'चे वातावरण



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरात प्रशासनाने राबविलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे मुख्य रस्ते व बाजारपेठ परिसर मोकळा झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. अनेक वर्षांपासून रस्त्यालगत वाढलेल्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी, पादचाऱ्यांची गैरसोय आणि अपघातांचा धोका वाढला होता. कारवाईनंतर शहराने जणू मोकळा श्वास घेतल्याची (पान २ वर)

